म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय इति
दा. क्र. 94902

नागेश विनायक बापट कृत

# पानिपतची मोहीम

संक्षिप्त आवृत्ति

संक्षेप : पांडुरंग रामचंद्र ढमढेरे, एम्.ए.

IRBK-0115972
IRBK-0115972

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणें २

६१·२७४ ८७२
३०१३७५
७१·०५

कै. नागेश विनायक बापट कृत

# पानिपतची मोहीम

संक्षिप्त आवृत्ति

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
बा. क्र. ७४५८२ नों दि.
वि.

संक्षेप : पांडुरंग रामचंद्र ढमढेरे, एम्.ए.

अनुक्रम ३०२०
विभाग
क्रमांक २३०८
नों. दि.

IRBK-0115972

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणें २

प्रकाशक :
**अ. अं. कुलकर्णी**
कॉन्टिनेन्ट्ल, प्रकाशन
टिळक रोड, पुणें २

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन
प्रथमावृत्ति नोव्हेंबर १९५८
किंमत : दीड रुपया फक्त

मुद्रक :
**हरि महादेव गद्रे**
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार, पुणें २

# परिचय

पानिपत येथें झालेलें मराठे-गिलचे यांजमधील रोमहर्षण युद्ध हा मराठ्यांच्या इतिहासामधील एक अद्‌भुतरम्य प्रसंग आहे. पानिपत म्हटलें कीं दुःख व अभिमान या दोनच भावना मनांत उद्‌भवतात. अनेक वीर व करुणरसात्मक बनाव या प्रसंगीं घडले कीं, ज्यांचें वर्णन कल्पित कथांपेक्षांहि चित्ताकर्षक वाटावे. त्या प्रसंगाच्यावेळच्या बखरी व हकीकती आज उपलब्ध आहेत. त्या वाचतांना जसा वीरश्रीचा गौरव दृष्टीस पडेल तसाच अखेरीस करुणरसाचा कडेलोट होऊन हृदय विरघळून जाईल !

मराठी वाङ्मयाचें सुवर्णयुग ज्याला म्हणतां येईल अशा १८९०।९२ सालीं मराठींत अनेक उत्तम ग्रंथांची भर पडली. त्याच सुमारास कै. नागेश विनायक बापट यांनीं ही पानिपतची मोहीम नांवाची एक कादंबरी लिहिली तिला अपूर्व लोकप्रियता मिळाली. कै. बापट यांनीं दुसरीहि—**बाजीराव पेशवे-चरित्र, छत्रपति संभाजीमहाराज-चरित्र, राजगुरु दादोजी कोंडदेव व शिवाजीमहाराज** अशीं पुस्तकें लिहिलीं. पण त्यांना या कादंबरीइतकी लोकप्रियता मिळूं शकली नाहीं. कै. बापट हे प्रथम धारवाडला शिक्षणखात्यांत नोकरीस होते व त्यानंतर बडोद्यास श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचेकडे नोकरीनिमित्त राहिले. याखेरीज या ग्रंथकाराची माहिती फारशी मिळत नाहीं. **पानिपतची मोहीम** ची पहिली आवृत्ति १८९७ सालीं दामोदर सावळाराम आणि मंडळी यांनीं प्रसिद्ध केली होती. त्याची द्वितीयावृत्ति सरस-वाङ्मयरत्नमालेचे श्री. पांगळ यांनीं १९२५ मध्यें प्रसिद्ध केली होती. हल्लीं याच्या प्रति फारच तुरळक मिळतात.

'**पानिपतची मोहीम**' प्रसिद्ध होण्यापूर्वीं श्री. जोरवेकर यांनीं '**लालन दि वैरागन**' या इंग्लिश कादंबरीचें भाषांतर '**लालन वैरागीण**' या नांवानें प्रसिद्ध केलें होतें. श्री. बापट यांनींहि कादंबरीस त्याच इंग्लिश कादंबरीचा कथाभाग घेऊन त्यांत बखरी, कै. साने यांच्या काव्येतिहास संग्रहांत प्रसिद्ध झालेल्या हकीकती व पत्रव्यवहार यांची भर घातली व एक

नवीनच कादंबरी निर्माण केली. ऐतिहासिक विषयाची अशा प्रकारची अभिनव मांडणी प्रथम याच कादंबरींत आढळते. ग्रंथकर्त्यानें कादंबरींतील कांहीं भाग १८९९ सालीं पुणें येथें वसंत व्याख्यानमालेंत वाचून दाखविले व त्यांचा न्या. रानडे प्रभृति पुढाऱ्यांनीं गौरव केला. सामान्य लोकांच्या तर या कादंबरीवर उड्या पडत इतकी अपूर्व लोकप्रियता यांनीं मिळविली. ऐतिहासिक कादंबरी म्हणजे इतिहास नव्हे याचीहि जाणीव कै. बापट यांनीं पूर्णपणें मनांत वागवून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. तत्कालीन सामाजिक स्थितीचें साधारणपणें अचूक चित्र त्यांनीं काढलें आहे. लालननें आपल्या प्रियकराच्या शोधार्थ देशभर पर्यटन केलें तें वर्णन या दृष्टीनें वाचनीय आहे.

कादंबरी प्रसिद्ध झाली त्या सुमारास स्वदेशाभिमानाची प्रचंड लाट उसळली होती. प्राचीन वैभवाबद्दल आग्रहानें प्रतिपादन चाललें होतें. साने, खरे, राजवाडे, पारसनीस यांचा मूळ इतिहाससाधनें प्रसिद्ध करण्याचा जोराचा प्रयत्न चालला होता. त्यामुळें उत्पन्न झालेल्या उज्ज्वल देशप्रीतीचा कढ या कादंबरींत भरपूर पहाण्यास मिळतो. बापट यांची कादंबरी वीर-रसात्मक आहे. त्यांत उत्कट अभिमान व आपल्या पूर्वजांचे पराक्रम गाण्याची अनिवार हौस पूर्णपणें दिसून येते. पानिपत प्रकरणावर लिहिली गेलेली दुसरी एक कादंबरी कै. चिं. वि. वैद्य यांची **दुर्दैवी रंगू** ज्यांनीं वाचली असेल त्यांना हें खास पटेल. 'रंगू' त करुणरस व 'वैषम्यविषाद' परि-पूर्ण आहे तर 'मोहिमेंत' दरबारचीं वर्णनें, सैन्याच्या कवायतींचीं वर्णनें खच्चून भरलीं आहेत.

मूळ कादंबरी साडेसहाशें पानांची. ती या दिवसांत छापून काढणें अशक्यप्रायच. परंतु इतकी उत्कट व भव्य कादंबरी संक्षिप्तरूपानें कां होईना उपलब्ध असावी याच हेतूनें मीं हें संक्षिप्तीकरण केलें आहे. संक्षिप्त करतांनाहि कादंबरी मूळ लेखकाच्या शब्दांतच ठेवण्याची दक्षता ठेवली आहे. ही छोटी कादंबरी वाचल्यानंतर वाचकांस मूळ कादंबरी मिळवून वाचण्यास प्रवृत्त करावें एवढाच संक्षिप्तीकरणाचा हेतु आहे.

—संक्षेपक

म. ग्रं. सं. पुणे. वाचनालय शाखा.
95 ९०१ ... ३०२०६८
संग्रहालय, अनुक्रम ३०२०६८ ... २३६४ नों. दि. ८-७-५१ वाचनालय पुणे.

## प्रकरण पहिलें :

कुरुक्षेत्रावर प्रभात झाली होती. अरुणोदय होऊन आकाशांत व पृथ्वीतलावर एकच आरक्त प्रभा पसरली होती. त्यांत गुलाबाचा मनोहर रक्तिमा व कमलाची शुभ्रता यांचें नयनरम्य संमेलन झालें होतें. प्रभातसूचक मंद सुगंध सुशीतल वारा वाहूं लागला होता.

मोठ्या पहांटे उठून कोणी मराठेवीर शुचिर्भूत होऊन रोजच्या सांप्रदायाप्रमाणें रणस्तंभाकडे द्वंद्वयुद्धासाठीं जमूं लागले होते; तर कोणी पुराणप्रसिद्ध भारतीय तीर्थामध्यें स्नानें करूं लागले होते. कोणी कर्मठ ब्राह्मणवीर अर्घ्यजल घेऊन सूर्यमंडलाकडे दृष्टि लावून उभे होते.

त्याच वेळीं एका उथळ ओढ्याच्या कांठाकांठानें दोन अगडबंब शरिराचे यवन टेहेळणी करीत होते. त्यांची शरीरयष्टि चांगली धिप्पाड होती. डोळे खोल व मांजरासारखे घारे, भिवया दाट व केंसाळ व दाढी केरसुणीसारखी वाढलेली होती. एकाच्या अंगांत अफगाण पद्धतीची बकऱ्याच्या कातड्याची बंडी व सैलसर मांडचोळणा होता. पायांत जोड्याऐवजीं लांकडी संदल घातले होते. व त्यावरून लोकरीचे जाड बंद बांधले होते. डोक्यावर मळकासा पोलादी टोप असून त्याच्या जाळीदार भागानें गर्दन व दोन्ही खांदे झांकून गेले होते. दुसऱ्यानें अंगरख्याच्या आंतून जुनें पोलादी बख्तर चढविलें होतें. त्यांच्या पायांत मात्र लाल रंगाचा जोडा असून तो बोटाकडे निमुळता होत गेला होता व वर गुडघ्यापर्यंत येऊन पोंचला होता. त्यांचीं शरीरें हत्यारांनीं नुसतीं फुलून गेलीं होतीं. हात दीड हात ...टकी सुरे, दारूगोळा भरलेलीं ४ तोसदानें व शिंगें चामड्यांनीं कमरेला बांधून टाकलीं

होतीं. आंखूड व बांकदार इराणी तलवारी कमरेला लटकावल्या असून पाठी-वर ढाली होत्या. महिना महिना आंघोळ न केल्यामुळें व अंगावरील कपड्यांना पांचसहा महिने तरी पाणी न लागल्यामुळें माजलेल्या बोकडासारखा त्यांच्या अंगाला दुर्गंध येत होता.

ते ओढ्याच्या कडेकडेनें चाललेले असतानांच त्यांस एक तरुणी पुढें जातांना दिसली. त्यासरशीं पुढें होऊन त्यांनीं तिला हटकलें, " क्यंव् खूप-सूरत, कहां जाती है ? " दुसरा लगेच म्हणाला, " मेरे प्यारी, यहां किस तऱ्हेसे आई ? "

तरुणीचें वय सोळासतरा वर्षांचें असावें. ती अंगानें सडपातळ, ठेंगणी ठुसकी, निमगोरी होती. कपाळ चांगलें लांबरुंद, केश काळे व लांबसडक असून ते पाठीवर मोकळेच सोडले होते. डोळे फार मोठे नसले तरी पाणीदार होते. गाल व ओठही लुसलुशीत दिसत होते. ओठाखालीं हनुवटीवर एक काळा बारीकसा तीळ होता. एकंदरींत तिला पहातांच माणसाचें मन प्रसन्न व्हावें असेंच तिचें रूप होतें. तिनें अंगांत पायघोळ भगवी कफनी व त्यावरून एक पोकळसा अंगरखा घातला होता. डोक्यावर उभी कानटोपी भगवीच होती. पायांत लोखंडी वाळा, हातांत तारेंत ओंवलेल्या मण्यांच्या मणगट्या, गळ्यांत कांच व हस्तीदंत यांचे मणी असून जें अंग उघडें दिसत होतें त्यावर राख फासली होती. हातांत काळया रंगाची गुळगुळीत छडी असून तिच्या मुठीला घुंगरांचा झुबका होता. पाठीवर झोळी व बीन होतें. तिचें नांव होतें लालन !

अशा वेषानें ती हळूहळू जात असतांना त्या सुंदोपसुंदांनीं तिला वाटेंत गांठलें. त्यांना पहातांच तिचा चेहरा उतरला. तिच्या डोळ्यांपुढें अंधारी आली व कांपरें सुटलें. सकाळची थंडीची वेळ असूनही भयानें तिच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला. तिला पाहून त्या दोन काळपुरुषांना हर्ष-वायुच होतो कीं काय इतक्या मोठ्यानें ते खद्खदून हंसूं लागले. व तिच्या-मागें धांवले. त्याबरोबर ती मट्दिशीं खालींच बसली. तिला आपल्या छडीचें व बिनाचेंही भान राहिलें नाहीं. ती दीन स्वरानें म्हणाली; " जी साहेब ! माफ करो. मुझकू छोडो । मैं एक कंगाल बैरागन हूं ।इस बीन बजाके मैं इश्वर

उधर घूमती हूं । पेटके वास्ते भीक मांगके गुजरन करती हूं । ऐसी भीक मांगनेवालीकू कौन बहाद्दर सतायेगा ? ''

त्या रानटी दांडग्यांनीं तिच्या विनंतीकडे लक्ष दिलें नाहीं. दुसऱ्या कोणीं तिची अजीजी व बैरागिणीचा वेष पाहून सोडून दिलें असतें. हिंदु जातीची एक तरणी ज्वान काफर पोरगी अल्लाच्या मेहेरनजरेनें आपल्याला अकस्मात् मिळाली इतक्यानेंच त्या रांगड्यांना आनंदीआनंद झाला. शिकार साधली खरी, परंतु शिकारीच्या मालकीसंबंधानें त्या दोघांत तंटा उपस्थित झाला. त्या दोघांपैकीं एकानें त्या अनाथ अबलेचा हात धरून तिला उभें केलें व " प्यारी, खामोष रहो '' असें म्हणत उजव्या हातावर आपली बंदूक तोलून धरून डाव्या हातानें तिची हनुवटी वर करून तिची खूपसूरत न्याहा- ळून पाहिली. शिकार छानदार सांपडली आहे असें पाहून तो आपल्या सोबत्यास म्हणाला, " अबदुल कादर, जिलानीके फझलसे अपने को मेवा तो खूप अच्छा मिला है... एक महिना झाला या मुलखांत एकदांही स्त्रीसौंदर्य पहावयास मिळालें नव्हतें. जनानखाना बाळगण्याची आपल्या बादशहाची परवानगीच नाहीं; नाहीं तर मीं तिला ठेवून घेतली असती. देवाच्या मनांत होतें म्हणून हें स्त्रीरत्न मला मिळालें आहे. एखाद्या अमि- रास विकून टाकून चांगला लभ्यांश करून घ्यावा झालें. ''

आपल्या सोबत्यानें तिच्या सौंदर्याची तारीफ केली व तिला विकून टाकण्याचेंही बोलत आहे त्यामुळें दुसऱ्याच्या मनांत साहजिकच मत्सरबुद्धि उत्पन्न झाली. पैशाच्या लोभानें त्याच्याही तोंडाला पाणी सुटलें. तो मनांतच जळफळूं लागला, व तोंड वाईट करीत म्हणाला, "लष्करांत बाईमाणसाला आणण्याची मनाई आहे हें विसरलास वाटतें ? बादशहाच्या कडक कायद्यास अमीरसुद्धां घाबरतात; आपण तर काय गरीब शिपाई ! त्यांच्या आज्ञा आपल्याला कडक शिस्तीनेंच पाळाव्या लागणार ! आपण काय करूं शकणार ? उद्यांची सोय करण्याच्या भरांत आज आपल्या पदरांत पडणारी रोटी दवड- ण्याचा वेडेपणा करूं नकोस. ही गोष्ट कांहीं शहाणपणाची नाहीं. आणि उद्यांची बात कशाला ? या लढाईंत कोण जगणार आणि कोण मरणार हें कोणी सांगूं शकेल का ? ''

हें बोलणें ऐकत असतांनाच चोहोंकडे पहात खुदायार म्हणाला,

'अरे, ही जागा बरी अडोशाची आहे. तूं जरा दूर जा. मी या तरुणीस प्रथम हात लावला आहे. म्हणून माझाच तिच्यावर हक्क आहे.'

अबदुल कादर या गुरकावण्यानें मुळींच दबला नाहीं. पाऊलभर पुढेंच सरून तो म्हणाला, "अरे वा यार! खुदानें ही चीज आपल्या दोघांसाठींच तयार केली आहे. तुझा जास्त हक्क व माझा कमी असें थोडेंच आहे? शिवाय तिच्यावर माझी नजर प्रथम गेली आहे हें तूं विसरूं नकोस. तूंच जरा बाजूला हो."

कादरचें हें मग्रूरीचें बोलणें ऐकतांच खुदायारनें तिला डाव्या हातानें घट्ट धरून ठेविलें व उजव्या हातानें तो कादरशीं भांडूं लागला. ती तरुणी बिचारी घाबरून गेली. तिचें सर्वांग थरथर कांपूं लागलें. खुदायारची बंदूक व सुरा एकमेकांत गुंतून त्याला अडथळा होऊं लागला. त्याबरोबर त्याचा राग अनावर झाला. पण मोठ्या कष्टानें त्यानें राग आवरून धरला. शेवटीं तो म्हणाला, 'ही औरत माझी आहे. मी सोडणार नाहीं तिला.' अबदुल कादरही आपला हक्क सोडावयास तयार होईना. शेवटीं त्यालाच विवेक सुचून तो म्हणाला, "खुदायार, लढाईशिवाय या प्रश्नाचा निकाल लावण्यास एकच मार्ग आहे. आपण एकीबेकी करूं या. याउपर खुदाची मर्जी असेल तसें होईल."

खरें म्हणजे त्या वेळीं खुदायारचा संताप अनावर झाला होता. क्षणभर स्तब्ध राहून त्यानें आपला राग आवरला व तो म्हणाला, "एका स्त्रीसाठीं दोन मुसलमान भाईनीं एकमेकांशीं भांडावें हें मलाही पसंत नाहीं. तूं म्हणतोच आहेस तर एकीबेकी करून आपण निकाल लावूं या."

दोघांचा एक विचार झाल्यावर कादरनें आपल्या तोसदानांतून मूठभर गोळ्या काढल्या व हात वर करून म्हणाला, "एकी या दोकी?" खुदायारनें अल्लाचें स्मरण करून "एकी" असें उत्तर दिलें.

त्यांचें खेळणें चालू असतानांच ओढ्याच्या वरच्या बाजूच्या मैदानांत घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं येऊं लागला. त्याबरोबर दाऊदनें गोळ्या तोसदानांत टाकल्या आणि ओढ्याच्या ओघळींत लपून बसला. जरा वेळ गेल्यावर टेहेळणीसाठीं त्यानें मान वर करून कोण येत आहे हें तो पाहूं लागला. त्याला जें दृश्य दिसलें, त्यामुळें तो झटकन् मागें वळला व आपल्या

सोबत्यास इशारा करीत म्हणाला, " खुदायार, पळ लवकर. बादशहाची स्वारी याच रस्त्यानें येत आहे. "

कादरचे शब्द कानांवर पडतांच खुदायारचें धाबें दणाणलें व हातांतील तरुणीस फरफर ओढीत नेऊन पळूं लागला. पठाण लोक लुटीचा लाग कधीं सोडणार नाहींत. त्यास खुदायार कसा अपवाद असेल ? ओढून नेतांना त्या तरुणीचें बीन व छडी खालीं पडलीं तीं कादरनें उचलून घेतलीं व त्या दोघांच्या मागोमाग धांवूं लागला. वांकणावर आल्यानंतर आपणाबरोबर तिलाही ओणवें चालण्यास लावलें. थोडें अंतर असेंच गेल्यावर पांचदहा घोडेस्वार उंची पोषाख केलेले संपूर्णपणें हत्यारबंद असे आपल्या सरदाराबरोबर चाल-लेले त्यांना दिसले. वांकणांतच थांबून ते स्वार बरेच पुढें गेले असें पाहिल्यावर ते दोघे कसेतरी मोठ्या शर्तीनें हातांतील शिकार न सोडतां छावणीजवळ आले. आजचा दिवस त्या तरुणीला आपल्या राहुटींत लपवून ठेवण्याचा त्यांचा निश्चय झाला.

पुढें गेलेले स्वार थबकून उभे राहिले, व पूर्वेस दूरवर नजर टाकून पाहूं लागले. त्या बाजूस मराठ्यांची छावणी होती. त्यांत कांहीं हालचाल दिसते कीं काय याचा अंदाज घेतल्यानंतर ते दिसेनासे झाले.

● ● ●

## प्रकरण दुसरें :

त्या तरुणीस त्या दोन पठाणांनीं ओढीत फरफटत दुराणीच्या छावणींत नेलें. त्या छावणीस बाहेरच्या बाजूनें संरक्षणासाठीं मोठमोठीं झाडें तोडून आडवीं लावलीं होतीं. त्यांतच मधून मधून तोफांची व बंदुकांची फैर झाडण्यास सोईचें व्हावें म्हणून झरोके ठेवले होते. व थोडथोड्या अंतरा-वर बुरुजाच्या आकाराचे अर्धचंद्राकार लांकडी उंचवटे टेहेळणीसाठीं ठेविले होते. छावणीच्या पुढच्या अंगाला हजारों निशाणें व बावटे फडकत होते. छावणींत डाव्या अंगाला एक किरमिजी रंगाचा बिचवा ठोकला होता. त्याच्यावर सिताफळाच्या आकाराचा एक सोनेरी कळस चमकत होता. बिचव्यासमोर हिरवा झेंडा फडकत होता. झेंड्याजवळच एक मोठी घंटा

टांगून ठेवली होती व त्याच्या आसपास वीस-पंचवीस शिपाई असून त्यांचे घोडेही शेजारींच टाणबंद करून ठेवले होते. एक पहारेवाला शिपाई हातांत तोडा पेटवलेली बंदूक घेऊन पहारा करीत फिरत होता. आंतला मनुष्य बाहेर व बाहेरचा मनुष्य आंत जाऊं लागला कीं तो त्याला हटकीत असे व पूर्ण तपास केल्याशिवाय सोडीत नसे.

या दरवाजाच्या चौकीवर लालन व तिला पकडणारे शिपाई घेऊन पोहोंचले. खुदायार आणि अबदुल कादर तिचे दंड धरून तिला ओढीतच होते. पहाऱ्यावरील शिपाई त्यांच्या माहितीचा होता. त्यानें त्यांस आंत सोडलें. परंतु दुसरे जे शिपाई होते त्यांतील एक जण पुढें होऊन म्हणाला, " ए बदमाश ! कोणीकडे चालला ? ही औरत कोण ? कुणाच्या हुकुमानें हिला छावणींत नेत आहां? " दुसरा म्हणाला, " ही शिकार तुम्हीं कोठें पैदा केली ? थंडीच्या दिवसांत फारच उपयोगी पडेल हं ! "

कादर म्हणाला, " शिकार तर खरीच ! पण ती आमच्यासाठींच आहे. " त्यांचें बोलणें ऐकून तिसरा एक शिपाई डोळे मिचकावीत म्हणाला, " अरे यार ! एक तीळ सात भावांत वांटून घ्यावा अशी एक म्हण आहे. ".

तेवढ्यांत कादर पुढें होत म्हणाला, " चल, हो एकीकडे, बऱ्या बोलानें, माझी वाट सोड. "

त्यांची बोलाचाली ऐकून इतरही बरेच शिपाई तेथें गोळा झाले व त्यांच्यांत भांडणच सुरू झालें. त्या भांडणांत लालनला उचलून न्यावें म्हणून कोणी तिचे हात ओढूं लागले. त्यासरशीं ती पटकन् खालीं बसली व तिनें मनांतल्या मनांत देवाचा धांवा सुरू केला.

या गलबल्याकडे चौकीवरील अमलदाराचें लक्ष गेलें. लकडीशिवाय मकडी वळत नाहीं हीच म्हण त्याची आवडती असावी. कारण हातांतील परशु फिरवीतच तो त्या गर्दींत शिरला तेव्हां कोठें तो गलबला शांत झाला. कादरनें पुढें होऊन आपली हकीकत सांगितली व ही शिकार माझ्या हातांतून काढून घेण्यासाठीं हे सर्व बदमाश माझ्या पाठीमागें लागले आहेत व भांडत आहेत असें म्हणून स्वस्थ बसला. कादर आपली हकीकत सांगत असतांना लुत्फखान--तो चौकीवरील अमलदार—लालनकडे टक लावून पहात होता व त्याची हकीकत पूर्ण होण्याआधींच कांहींतरी

लटपट करून तिला हस्तगत करण्याचा विचार करीत होता. कादरचें बोलणें संपतांच तो भानावर आला व म्हणाला, " अबदुल कादर ! मोठ्या लढाई-नंतरच लूट माफ असते. आतांची वेळ कांहीं तशी नाहीं. रयतेला लष्करी शिपायांनीं पीडा देऊन गांजूं नये असा शहाचा सक्त हुकूम आहे. तूं या औरतीला छावणींत आणलेंस हाच मुळीं मुळांतच मोटा गुन्हा आहे. ही गोष्ट जर शहाच्या कानांवर गेली तर तो तुझी चामडी लोळविल्याशिवाय रहाणार नाहीं. " कादर म्हणाला, " ही एक कंगाल काफर औरत आहे. जिहादचा पुकारा झाल्यावर काफरांच्या बायका पळवून आणावयास परवानगी लागत नाहीं मीं त्यांत काय गैरशिस्त केलें आहे तर शहा मला शिक्षा करील ? "

हें उत्तर ऐकून लुतुफखान स्तब्ध झाला. परंतु स्त्रीचा मोह अनावर होऊन पुन्हां एकदां कादरला धमकावणीच्या स्वरांत म्हणाला, " छावणींत स्त्रियांना आणावयाची बंदी आहे, हें तूं विसरलास वाटतें ? या चौकीवरील मीं मुख्य अधिकारी आहें. तू तिला माझ्या परवानगीशिवाय आंत नेशील तर खबरदार ! "

खुदायार इतका वेळ गप्प बसला होता. लुतुफखान व कादर यांच्या भांडणाचा निकाल कसा लागतो इकडे त्याचें सर्व लक्ष होतें. कादरला तो दाद देणार नाहीं असें त्यास वाटलें. इतक्यांत कादर रागानें भडकून गेला व लुतुफखानास म्हणाला, " बादशहाचे नियम व कानून आम्हां गरिबां-साठींच आहेत वाटतें ? आणि म्हणूनच तुम्हां सरदारांचा व अमिरांचा इतके दिवस निभाव लागला. आम्ही शिपाई लोक आहोंत म्हणूनच तुमची अमिरी टिकून आहे हें विसरूं नका, सरदारसाहेब ! नाहींतर केव्हांच तुम्हांला या काफरांनीं खाऊन टाकलें असतें. लढाईच्या वेळेस आम्ही तुमच्यासाठीं शिर कापून देण्यास तयार असतों, तर अशा प्रसंगीं तुम्हीं आम्हांस एवढी सव-लत दिलीच पाहिजे. "

त्याचें बोलणें संपण्यापूर्वीच लुतुफखान व खुदायार या दोघांनीं मिळून त्याच्यावर झडप घातली व त्याचे दोन्ही हात पकडले. तेव्हां हात सोडवून घेण्यासाठीं तो झटपटत असतांना म्हणाला, " बरें तर खानसाहेब ! अल्लाची

कसम, मी तिला आजची रात्र ठेवून घेऊन उद्यां तुमच्याकडे पोंचती करतों. मग तर झालें ना ? ”

त्या तिघांची झटपट सुरू झाली त्याबरोबर लालन मोकळी सुटली. लुतुफखान अधिकारी असल्यामुळें आपण त्यालाच शरण गेलों तर या सुंदोपसुंदांच्या कचाट्यांतून सुटून जाऊं, असा विचार तिच्या मनांत आला. म्हणून ती त्यांस मोठ्या अदबीनें म्हणाली, “ साहेब ! मी गरीब गाय आहें. या वाघांच्या जबड्यांतून मला सोडवा. ” लुतुफखानास आयतेंच निमित्त सांपडलें. त्यानें लगेच तिचा पक्ष धरला. हें पहातांच एवींतेवीं ही स्त्री आपणांस मिळत नाहीं, याची त्या दोघा शिपायांची खात्री पटली व मला नाहीं तर तुलाही नाहीं असा त्राग्याचा विचार करून ते दोघेही खंजीर उपसून तिला मारण्यासाठीं धांवले. इतक्यांत “ रस्ता सोडा ! पैस ! पैस ! असा रागीट व अधिकारवाणीनें युक्त असा शब्द त्या सर्वांच्या कानीं पडला, म्हणून ते वळून पहातात तोंच चार शिपाई घोडेस्वार व भालदारचोपदार त्यांच्या दृष्टीस पडले.

अबदुल कादर व खुदायार ओढ्याच्या वांकणांत एकीबेकी करीत असतांना त्यांस जे घोडेस्वार दिसले होते तेच घोडेस्वार आतां छावणींत परत आले होते. व त्यांच्यांत खुद्द अहमदशहा अबदाली पण होता. अहमदशहाची दाढी आंखूड व पिळदार होती. त्यांतच त्याच्या लांब व कल्लेदार मिशांचे केस मिसळून गेले होते. शहाचे डोळे मोठे व चांगलेच पाणीदार होते. डोक्यावर लाल रंगाची टोपी असून त्यावरूनच काश्मिरी शाल लपेटलेली होती. अंगरखा चांगला पायघोळ असून त्यावरूनच गळाभर हिऱ्यामोत्यांचे सर घातले होते. त्याचा घोडाही अतिशय तजेल असून उभा राहिला असतांना खुरांनीं जमीन उकरीत होता. शहाच्या उजव्या बाजूस अयोध्येचा नबाब सुजा उद्दौला होता. त्याचें वय जरी पन्नाशीच्या पुढें होतें तरी चेहरा उमदा व तेजस्वी होता. त्यानें डोक्यावर पांढरी पगडी घातली असून अंगावरील झग्यावर सोनेरी कलाबतूची नक्षी काढली होती. अहमदशहाच्या डाव्या बाजूस अमीर–उल्–उमराव नजीबखान रोहिला होता. नजीब मोठा लढवय्या व क्रूर शत्रु म्हणून प्रसिद्ध होता. ती त्याची प्रसिद्धि सार्थ होती हें तेव्हांच कळत असे. त्या सर्वांच्या मागें बरेलीचा नबाब हफीज

रहिमतखान होता. हा कृष्णकारस्थानी व अघोरकर्मी म्हणून प्रसिद्धीस आला होता.

या सर्वांपुढें चोपदार आदब पुकारीत व हातांतील छडीनें इशारत देत बादशहास वाट करून देत चालला होता. त्यास पहातांना आपल्या टोळक्याचे आपोआपच दोन भाग झाले.

खुद्द शहाची स्वारी पाहिल्याबरोबर सगळीकडे सामसूम झालें. त्या गर्दीमध्यें एक स्त्री उभी आहे असें पहातांच शहानें क्रुद्ध मुद्रेनेंच विचारलें, " खानसाहेब, कसली दंगल चालली आहे ? "

लुतुफखान–" खाविंद... "

शहा मध्येंच रागावून म्हणाला, " तुमच्या चौकीवर एवढी धामधूम आणि गडबड ! किती शरमेची गोष्ट ! ! "

लुतुफखान—" या हरामखोरांच्या तंट्याचा निकाल लावीत होतों. इतक्यांत आपली स्वारी आली. "

अहमदशहानें करड्या नजरेनें त्या भांडखोरांकडे पाहिलें. त्याबरोबर सर्वांनीं आपल्या माना खालीं घातल्या.

" या गडबडीचें कारण समजलों. " शहा पुढें म्हणाला, " ही छोकरीच ना ? आमच्या छावणींत स्त्रिया आणण्याची बंदी असतांना माझा हुकूम मोडणारा कोण आहे, त्याला प्रथम माझ्यापुढें आणा. "

शहाचा हुकूम होतांच अबदुल कादर व खुदायार या दोघांच्या मुसक्या आवळून त्यांना शहापुढें उभें केलें. लालन त्यांच्या तावडींतून मुक्त झाली होती, तिलाही शहाचेपुढें उभें केलें. शहा व त्याच्या सरदारांची ती उग्र रूपें पाहून ती भयानें अर्धमेली झाली होती.

" ए बदमाश ! तुम्ही रात्रीं कोठें होतां ? ही काफीर छोकरी तुम्हीं कोठून पैदा केली ? "

कादर मान खालीं घालून म्हणाला, " खुदावंत ! आम्ही बदमाष नाहीं. आम्ही युसुफझाई पठाण आहोंत. ही छोकरी आम्हांस रस्त्यांत भेटली. काफर औरत म्हणून तिला कैद करून आणलें आहे. एका नाल्यांतून ती लपत छपत छावणीकडे येत होती. म्हणून आम्हांस वाटलें ती हेर असावी. म्हणून... "

लुतुफखान हा जबाब ऐकतांच चपापला. शहा एवढा धूर्त व अनुभवी ! तो देखील क्षणभर स्तब्धच झाला. त्याला एकदां वाटलें कीं, वरिष्ठ अमलदारांची नजर चुकवून आपली वासना तृप्त करून घेण्यासाठीं ही आणली असेल. परंतु मराठ्यांनींही पुरुष हेर पाठविला तर मारून टाकतील म्हणून कदाचित् हिलाच हेरागिरी करण्यास पाठविलें नसेल कशावरून ? शहानें शेवटीं विचारिलें, " मग ही वर्दी तूं अमलदाराकडे कां दिली नाहींस ? त्या वेळीं काय निमित्त सांगितलेंस ? " लुतुफखानास एवढें निमित्त पुरे झालें. तो मध्येंच तोंड घालून म्हणाला, " मीं हिला महमदी धर्मप्रमाणें पकडून आणलें आहे. हिला आजच्या दिवस माझ्याजवळ राहूं द्या, उद्यां हवे तर तुम्हांस विकत देईन, असा याचा जबाब आहे. " हें ऐकतांच शहा फारच संतापला.

आपल्या शिपायांनीं एक अपराध छपविण्यासाठीं तीन अपराध केले. खोटें बोलला, लष्कराचा कायदा मोडला आणि वरिष्ठ अधिकाऱ्यास लांच देण्याचा प्रयत्न केला. त्यांना कडक शासन करूनच शिस्त टिकविली पाहिजे. असा विचार करून शहा लुतुफखानास म्हणाला, " लुतुफखान, यांच्या हातापायांत बेड्या ठोकून यांना वजीरसाहेबाकडे रवाना करा. त्यांना दोन दिवस खोड्यांत घालून अन्नपाणी न देतां उघड्या पाठीवर रोज ५० कोरडे ओढा. आमचा लष्करी कायदा मोडला असतां काय शासन होतें हें लष्करच्या लोकांना जाहीर झालें पाहिजे. "

ही शिक्षा ऐकतांच त्या युसुफझाई पठाणांनीं मनांतल्या मनांत दांतओठ खाल्ले. लुतुफखानाच्या शिपायांनीं त्यांना दूर नेल्यानंतर शहाची दृष्टि धरून आणलेल्या तरुणीकडे गेली. त्याची कडक न्यायवृत्ति पाहून लालनला बराच धीर आला होता. मान खालीं करून दोन्ही हात जोडून ती म्हणाली,

" मी एक कंगाल हिंदु औरत आहें. आमचे वाली एक आपण आणि दुसरा भगवान् ! छावणींत हिंडून, गाणें गाऊन व बीन वाजवून मी पोट भरतें आणि आमचे हिंदुस्थानी शिपाई कधीं त्रास देत नाहींत. पोटाला चतकोर भाकर मिळते, जुनीं वस्त्रें किंवा कधीं कधीं पैसा दोन पैसे धर्म मिळतो. त्या शिपाई लोकांचीच ही छावणी असेल असें समजून मी येत होतें. तों रस्ता चुकलें. या शिपायांनीं मला धरून आणलें व वाटेंतही माझे हाल केले.

३०२०६

आतां मी आपल्या चरणापाशीं शरण आलें आहें. माझें रक्षण करण्यास आपण समर्थ आहां. " असें म्हणत ती शहाच्या पायांजवळ गेली व त्याला वंदन केलें.

शहाला तिची भाषा कळत नव्हती. तरी एकंदर हावभावांवरून तिचा मतलब त्याच्या ध्यानांत आला. सुजा उद्दौल्यासही तिचें बोलणें पूर्णपणें कळलें नव्हतें. नजीबखानास तिची भाषा कळली असावी. त्यानें तिच्या भाषणाचा गोषवारा सांगितल्यावर त्याच्यामार्फतच शहानें तिची उलटतपासणी केली.

नजीबखानामार्फत शहानें लालनला विचारलें, " त्या शिपायांनीं तुजवर बलात्कार किंवा जुलूम केला का ? "

" नाहीं हुजूर. आपला हुकूम तोडील असा जबरदस्त कोणी नाहीं. "

" नजीबखान, तिला गायला, वाजवायला येतें तर तिचा एखादा चुटका आपण ऐकूं या. तिला थोडें बिनावर गायला सांगा. "

लालनला शहाच्या बोलण्याचा आशय कळल्यावर ती शहाच्या घोड्या-समोर बसली व बीन जुळवून घेऊन घोड्याच्या खुराला हात लावून तिनें बिनाच्या तारा छेडण्यास सुरवात केली. एक भक्तिपर पद म्हटलें व कांहीं शृंगारपर गझल व ठुंबऱ्याही गायल्या. त्या नादब्रह्माला मोहित होऊन तिच्या भोंवतीं लोकांचा गराडा पडला. लुतुफखान तर आधींच आपक्र झाला होता तिचें गाणें ऐकून तो अधिकच वेडा झाला. शेवटची चीज म्हणून झाल्यावर तिनें बीन खालीं ठेविलें व " आई, बाबा तुम्ही कोठें असाल बरें ! ' बेटा कांहींही कर, पण बदकर्म करूं नकोस म्हणजे परमेश्वर तुला सर्व संकटांतून तारून नेईल ' असा तुमचा उपदेश आजपर्यंत तरी फळास आला आहे पुढेंही माझी अब्रू सुरक्षित राहो, असाच आशीर्वाद द्या. " असें म्हणत मोठ्या कष्टानें अश्रु आवरत शहाला म्हणाली, " खाविंद, माझी सुटका करा, येवढीच माझी विनंती आहे. "

शहानें सुजा उद्दौल्यास विचारलें, " हिचा निकाल काय करावयाचा ? "

सुजानें सल्ला दिली, हिला छावणीबाहेर काढून द्या. तें ऐकून लुतुफखान अतिशय अस्वस्थ झाला. तो म्हणाला, " गनिमांकडून बातमी काढण्यासाठीं ही कशावरून आली नसेल ? एकदोन दिवस तिला ठेवून घेऊन मी तपास

करीन. कांहीं बातमी मिळाली तर आपणांस जाहीर करीन. मगच तिचा हुजुरांनीं निकाल लावावा."

शहा विलक्षण पाताळयंत्री व धूर्त होता. लुतुफखानाच्या चेहऱ्यावरून त्याच्या मनांत काय घोळत आहे हें त्याला लगेच कळून चुकलें. परंतु त्याचा यत्किंचितही सुगावा लागूं न देतां तो मोठ्या गंभीर स्वरानें म्हणाला, "लुतुफखान, तसें करण्याचें कारण दिसत नाहीं. ती हेर नाहीं अशी माझी पक्की खात्री झाली आहे. तिला लवकर छावणीबाहेर काढून द्या. तिच्यावर कोणी जुलूम जबरदस्ती करीत नाहीं असा बंदोबस्त करा. तिच्या अंगाला कोणीं बोटही लावल्याचें मला कळलें तर तो हातच कलम करून टाकण्यांत येईल असेंही जाहीर करा."

सुजा उदौल्यानें लालन जावयास निघाली असें पहातांच शहास सुचविलें "तिला आपल्याकडून कांहीं खैरात मिळाली पाहिजे. नाहींतर ती मराठ्याकडे जाऊन आपली बदनामी करील."

हें ऐकतांच शहानें तिला ओंजळभर मोहोरा देण्याचा हुकूम केला. "राजा बोले दळ हाले." शहाच्या देणगीप्रमाणें प्रत्येकानें तिला कांहींना कांहीं दिलें. वस्त्रें, पुतळ्या, मोहोरा, सोन्याचें कडें, गोफ इत्यादि वस्तूंची तिच्यापुढें क्षणार्धांत रासच पडली.

• • •

# प्रकरण तिसरें :

शहा निघून गेल्यावर लुतुफखान व लालन दोघेच तेथें राहिलीं. लुतुफखान चांगला देखणा व तरुण होता. अब्दालीच्याच पोपलझाई कुळांतील तो असल्यामुळें शहाची त्याच्यावर मर्जी होती. खानदान घराण्यांतील व शहाचा आवडता म्हणून छावणींतील अमीरउमरावही त्याला मानीत असत. छावणींतील चौकी पहारे पहाण्याचें काम त्याचेकडे असे. लुतुफखानास वाटलें, आपली ही प्रतिष्ठा लालनला कळली म्हणजे आपणास लवकर वश होईल. तिला सौम्य उपायांनींच वश करून घेण्याच्या इराद्यानें तो म्हणाला—

" शहानें तुला मजकडे सोंपविलेलें तूं पाहिलेंसच. आतां तुझा काय हुकूम आहे ? "

लालन हात जोडून म्हणाली--" मी कंगाल बटीक आपल्यासारख्या थोर सरदारांना काय हुकूम करणार ? "

" तुझी इच्छा म्हणजेच हुकूम आहे. मी तुझा बंदा गुलाम आहें. माझे प्राण तुझ्या ठिकाणीं गुंतून राहिले आहेत. "

" माझी इच्छा काय आहे ती मीं शहांना सांगितलेली तुम्हीं ऐकलीतच. मराठ्यांच्या छावणीजवळ मला नेऊन सोडा, एवढीच माझी मागणी आहे. याला तुम्ही इच्छा म्हणा कीं हुकूम म्हणा. "

" लालन, तुझ्या जाण्यांत अडथळे किती आहेत ! युद्धाच्या वातावरणाचे रस्ते अगदीं शून्य असतात. तुझ्याजवळ खैरातीची दौलत जमली आहे. लुटारूंनीं तुला गांठलें आणि तुझ्या जिवाला त्यांनीं कांहीं अपाय केला तर ? आजचा दिवस तूं मजजवळ रहा. नंतरही तुझी मर्जी असली तर रहा नाहींतर मी तुला मराठ्यांच्या छावणींत पोंचती करीन. मग तर झाले ना ? "

" पण आजच पोंचवितां येणार नाहीं का ? शहांची परवानगी मिळाली आहें. मग उशीर कशाला ? " मजसारख्या कंगाल भिकारणीबरोबर आपण कशाला येतां ? मजबरोबर एखादा विश्वासू मनुष्य दिलात तरी चालेल. "

लुतुफखान तिचें बोलणें ऐकून पाण्यांत पडलेल्या ढेकळाप्रमाणें विरघळून गेला. परंतु मनांतील आशा आतां स्पष्ट शब्दांत कळवावी म्हणून तो म्हणाला, " पहा बुवा ! माझ्या मनांत तूं आज जावें असें नाहीं. शहाकडून मिळालेल्या खैरातींत आणखी कांहीं भर घालून तुझी रवानगी करावी अशी माझी इच्छा आहे. मी खूप होऊन तुझाही फायदा होईल. "

" सरदारसाहेब, दीन अनाथ बटकीविषयीं आपल्या मनांत दुष्ट वासना उत्पन्न होणें आपणांस शोभत नाहीं. आपलें वर्तन परमेश्वरास कसें मान्य होईल ? वाटेंत लूट होईल म्हणून सांगतां त्या खैरातीविषयीं मला कांहीं वाटत नाहीं. माती आणि सोनें मला सारखेंच आहे. नाहींतरी ही खैरात मी डोक्यावर घेऊन जाऊं तरी कोठें ? मला भाकरीचा तुकडा परमेश्वरकृपेनें मिळतो आहे

तेवढा वस आहे. आपल्या लोकांत जाऊन पडण्यासाठीं माझें सर्वस्व नेलें तरी चालेल. खरेंच, एखादा कोणी मला आतांच मराठ्यांच्या छावणींत नेऊन सोडील तर त्याला मी खैरातीचा अर्धा भाग मोठ्या खुषीनें देईन."

तिचें हें निश्चयात्मक भाषण ऐकून लुतुफखानाची त्रेधा उडाली. त्याला काय करावें आणि काय बोलावें हें कांहीं सुचेना. शहाचा हुकूम मोडून तिच्यावर अत्याचार करण्यास त्याचें मन धजावेना. धरलें तर डसतें, सोडलें तर पळतें, अशी त्याची अवस्था झाली. फिरून एक वेळ प्रयत्न करून पहावा म्हणून तो म्हणाला, "प्यारी! तुझ्या सौंदर्यावर मी लुब्ध झालों आहें, म्हणून तूं आजचा दिवस मजपाशीं रहावें अशी माझी फार इच्छा आहे. ज्या सुखाची लज्जत तुला आजपावेतों ठाऊक नाहीं त्या सुखाची प्राप्ति मी तुला करून देईन. कसेंही करून आजचा दिवस रहाच. मी खानदान कुलांतील आहें. शिवाय माझ्या धनदौलतीची मालकीण होशील असें करीन."

लालनच्या मनावर याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. वृक्ष अनेक असले तरी ज्यावर वसंताची नजर फिरते तेवढेच सपुष्प व सफल होतात. इतर नाहीं!

लुतुफखानाचें बोलणें संपतांच लालनच्या डोळ्यांतून असहाय्य क्रोधाच्या अश्रुधारा वाहूं लागल्या. रागानें तिचे डोळे लाल झाले, व चित्तवृत्तीही विलक्षण झाली. जरा तीव्र स्वरानेंच ती म्हणाली, "साहेब! माझी मस्करी चालविली आहे तुम्हीं. अबलेची विटंबना करणें तुम्हांस शोभत नाहीं."

लुतुफखानही तिचें बोलणें ऐकून जरा चमकलाच. तो म्हणाला, "अरे अल्ला! तोबा! तोबा! कुराणावर हात ठेवून मी सांगतों, माझ्या बोलण्यांत विटंबनेचा लवलेशही नाहीं."

"खानसाहेब! गुन्हा माफ करा. मी हिंदु जातीची अबला कुमारी. तुमची जात वेगळी, माझी वेगळी! तुमच्यासारख्या उमरावाच्या आश्रयाला राहण्याची माझी योग्यता नाहीं. मी भटकत फिरणारी दरवेसण! तुमची बरोबरी कशी करतां येईल?"

"अँः त्यांत काय आहे? राजाच्या राणीला शिंगें का असतात? तो म्हणेल ती राणी. तुझ्या मनांत काय वेड भरलें आहे कोणास ठाऊक!

तूं कंगाल दरवेसण. माझा कां तिरस्कार करतेस ? मी कुरूप नाहीं, म्हातारा नाहीं, भिकारी नाहीं कीं नीच कुलांतील नाहीं. मी तुला कां आवडत नाहीं, तें स्पष्ट सांग. तुझ्या मर्जीविरुद्ध मी तुला येथें ठेवून घेईन इतका बेवकूब मी नाहीं."

लुतुफखानाचें तें कामातुर भाषण ऐकून लालन कांहींच बोलली नाहीं. तिनें फक्त हात जोडले व दृष्टि खालीं लावून ती उभी राहिली.

"ठीक आहे. तुझी मर्जी नसेल तर आग्रह काय उपयोग? शहानें केलेला हुकूम अमलांत आणलाच पाहिजे. त्यांचा हुकूम झाला नसता तर...तर...

नंतर "झमरूड, अरे झमरूड, इकडे ये" असें त्यानें मोठ्यानें पुकारलें.

लुतुफखानाची हांक ऐकून हातांतील सोटा गरगर फिरवीत एक शिद्दी पुढें झाला. जाड ओठ, अरुंद कपाळपट्टी, पांढरेशुभ्र वर आलेले दांत पाहून कोणासही हा मानवेतर प्राणी वाटला असता. सर्वांग काळें असलें तरी डोक्याचे व दाढीमिश्यांचे केस भुरे होते. तंगड्या धनुकलीसारख्या फेंगड्या होत्या. तो जवळ येतांच लुतुफखानानें त्याच्या कानांत कांहींतरी निरोप सांगितला व नंतर मोठ्यानें म्हणाला, "झमरूड, मुखबीर बिरबल जाटाला जाऊन सांग कीं, एका हिंदु स्त्रीला मराठ्यांच्या छावणीमध्यें पोंचती करावयाची आहे. कांहीं स्वार घेऊन तूंही जा. ती आज रात्रीं कोठें मुक्काम करते यांची मला वर्दी दे."

झमरूड निघून गेल्यानंतर लुतुफखान मनाशींच म्हणाला, "काय चिंता आहे. ? जेथें जाईल तेथून खेंचून आणीन, सोडणार नाहीं."

छावणींतून लालनची निघून जाण्याची सर्व तयारी झाली. जाते वेळीं तरी ती मान वर करून आपणांकडे बघेल अशी लुतुफखानाला मोठी आशा वाटत होती. तीही त्याची आशा व्यर्थ झाली. लालन नम्रपणानें खालीं मान घालून जी एकदां उभी राहिली होती ती तिनें मान वर केलीच नाहीं. तिच्या भोंवतीं जंगली शिपायांचा वेढा पडला होता त्याचीहि ती दखल घेत नव्हती.

लालनबरोबर पाठवावयाचे शिपाई तयार होऊन आल्यानंतर लुतुफखान त्यांच्या म्होरक्यास म्हणाला, 'दोस्त महंमद, तूं आणि तुझे शिपाई या

औरतेस मराठ्यांचे छावणीपर्यंत पोंचविण्यास जा. लढाई दंगलीचा प्रसंग आणूं नका. हिला सांडणीवर हिची चीजवस्त नीट संभाळून घेऊन बसवा. आणि ही जें बक्षीस आपखुषीनें देईल तेवढेंच घ्या. हिच्या केसालाही धक्का लागला तर शहा तुमचें डोकें उडवील हें ध्यानांत धरा."

दोस्तमहंमद सांडणी तयार करण्यासाठीं गेला तरी लुतुफखान लालनच्या आसपास खेपा मारीत राहिला.

सांडणी आल्यावर तिला खालीं बसविण्यांत आलें. तिच्या मागच्या अंगावर लालन चढली. पाठीवर टेंगळास धरून बसली. लुतुफखानानें एका पिशवींत तिचें सर्व सामान भरलें व ती पिशवी सलित्यांत घालण्यासाठीं सारवानाजवळ दिली. सांडणीच्या पाठीवर सलिते दोरांनीं आवळून टाकिले होते. तिच्यांत तिची छडी व बीन अडकवून दिलें. याप्रमाणें त्यांची स्वारी तयार झाल्यावर सांडणी उठून उभी राहिली. उठून उभी रहातांना गुडगुड शब्द करीत व मान कमानीप्रमाणें वेळावीत सांडणी इकडे तिकडे पाहूं लागली. शेवटीं लालन आतां नक्की जाणार अशी लुतुफखानाची खात्री पटल्यावर तो म्हणाला—"प्यारी! एकूण तूं चाललीस अं! इन्शाल्ला अल्ला तुझें संरक्षण करो. त्याचीच कृपा असेल तर तूं पुन्हां माझ्याकडे येशील."

लालन लवून त्याला सलाम करीत म्हणाली, "मी भगवान् किसनजीला मागणें मागतें कीं, मला पुन्हां इकडे येण्याची बुद्धि देऊं नकोस. खुदावंत बादशहांनीं उदार होऊन मला या दुष्टांच्या हांतून सोडविली ही त्यांनीं मज-वर मोठी दया केली आहे. त्यांना मार्कंडेयाचें आयुष्य मिळूं दे. त्यांची बढती कर. प्रार्थना करण्याखेरीज आपल्या हातांत काय आहे?"

लुतुफखानाच्या प्रेमाचा निकाल लागला. लालननें त्याला अदबशीर पण खरमरीत जबाब दिल्यापासून त्याची चर्या उतरून गेली होती, ती झमरूद-च्या कानांत निरोप सांगितल्यावर बरीच सुधारली होती. लालन निघाली तेव्हां तर त्याचा चेहरा स्मित, ललित व गुलजार दिसत होता.

लालन व तिच्याबरोबरचे लोक शेंदोनशें कदम चालून जातात न जातात तोंच एक धटिंगण शिपाई धांवत येऊन त्यानें दोस्त महंमदच्या हातांत गुड-गुडी दिली. त्याच वेळीं दुसरा एक मनुष्य पाठीमागून येऊन लुतुफखानास

धक्का देऊन झपाट्यानें पुढें निघून गेला. लुतुफखान हा आधींच कोपिष्ट पठाण. त्यांत तो संतापलेला--अशा वेळीं धक्का देणारास कलम करण्यासाठीं त्यानें तरवारीस हात घातला तोंच त्याला तो मनुष्य दिसला. त्याचा हात थबकून मागें ओढल्यासारखा झाला. एवढ्या मोठ्या तोलाच्या सरदारानें मारण्यासाठीं उगारलेला हात मागें घेतला तो मनुष्य एक कंगाल, काळाकभिन्न, कमरेंत वांकलेला जाठ होता. त्याच्या मिशा वाढलेल्या असून अंगावरील कपड्यांनाहि ठिगळें दिलेलीं होतीं. खांद्यावर एक कावड असून त्याच्या दोन्ही बाजूंस दोन बोंचकीं लोंबत होतीं. त्यानें जातां जातां लुतुफखानास धक्का दिल्यानंतर कांहींतरी खूण केली, आणि म्हणूनच त्याचा उगारलेला हात मागें झाला होता.

याप्रमाणें तें सर्व लटांबर चालूं लागलें. नंतर लुतुफखान स्वतःशींच म्हणाला, " या खुदा ! या मंडळीबरोबर हा लंगडा बिरबल कसा चालूं शकेल कोण जाणे !

पण त्याची ती शंका चुकीची होती.

• • •

## प्रकरण ४ थें :

गिलचे व मराठे यांच्या छावण्यांच्या दरम्यान एक जुना अश्वत्थ वृक्ष होता. त्यासभोंवतीं मैदान पसरलें होतें. त्या वृक्षाजवळच कोणी धर्मात्म्यानें एक लहानशी सराई बांधून एक विहीरहि बांधून ठेविली होती. दिल्लीहून कर्नोळाकडे जाणारे प्रवासी येथेंच मुक्काम करीत असत.

याच मैदानावर मराठ्यांनीं एक रणस्तंभ उभारला होता. तेथें गिलचे व मराठे यांच्या रोज भेटी होत असत. व एकमेकांच्या सल्ल्यानें द्वंद्वयुद्धेंही होत असत. धर्मशाळेंत राहावें, विहिरीचें गोड पाणी प्यावें, खुषी लागेल तेथपर्यंत आराम करावा, कोणीं कोणास हरकत करूं नये आणि मर्जीस येईल त्या वेळीं छावणीस निघून जावें असा प्रकार तेथें नित्य चालू होता. छावण्यांच्या आसपास परस्परांत चकमकी व कटकटी होत असत. परंतु

रणस्तंभाजवळ जी शिस्त एकदां बांधली गेली त्याला दोन्ही पक्षांकडून कधीं हरकत घेतली गेली नाहीं. या ठिकाणींच दोन्ही छावण्यांत दोस्त असलेल्यांचा गुप्त पत्रव्यवहार चालत असे. खऱ्या मित्रभावानें कोण चालतात व आंतून फितूर असून हितशत्रुत्वाची वर्तणूक कोण करीत आहे याचीहि वार्ता येथेंच लागत असे. कैद्यांची अदलाबदल, दंडवसुली करून कैदी मुक्त करणें, असे प्रकार येथेंच चालत असत. छावण्या बरेच दिवस जवळजवळच पडून राहिल्यामुळें शेंकडों मसलती, लबाड्या चालू असल्याचें भाऊसाहेब व अबदाली यांना माहीत होतें. परंतु ते प्रकार बंद न करतां चालू रहाण्यांतच आपला फायदा आहे अशी दोघांची समजूत होती.

या ठिकाणीं लालन व तिला पोंचवावयास आलेले शिपाई येऊन पोंचले. त्या वेळीं सूर्य अगदीं डोक्यावर आला होता. बिरबल जाठ त्या शिपायांबरोबर चालण्याचा प्रयत्न करी. तो मागें रेंगाळत राहिला म्हणजे शिपाईमंडळी त्याची थट्टामस्करी करीत किंवा मागें राहिल्याबद्दल शिवीगाळहि करीत. ती सर्व सोसून तो दोस्तमहंमदची विनवणी करी व म्हणे, " मिय्यासाहेब, मी म्हातारा आहें, मला संभाळून न्या. त्याची ती घोड्यासारखी तुरुतुरु चाल पाहून मंडळींची करमणूक होत असे व त्याची थट्टा करीत का होईना त्याला ते बरोबर घेऊन जात असत.

दोस्तमहंमद सर्वांच्या आघाडीस चालला होता. डोळ्यवर आडवा हात ठेवून दूर नजर लावून तो कोणी मराठे पिंपळाजवळ नाहींत असें म्हणत आहे तोंच तिकडून त्याला एक स्वारांची टोळी,येतांना दिसली. त्या टोळींतील घोडे चपळ व सडसडीत होते. स्वारांच्या डोक्यावर रंगीबेरंगी कंगणीदार पगड्या होत्या. हातांतील उंच उंच भाले पाहून ती टोळी मराठ्यांची आहे अशी त्याची खात्री झाली. व सर्वांच्या पुढें जाऊन त्यानें आपल्या खिशांतून रुमाल काढला व डोक्याकर गरगरां फिरविला. हातरुमाल फडकत असल्याचें पाहून मराठे जागचे जागीं थबकले. त्यांचा म्होरक्या मात्र आपला घोडा उडवीत पुढें झाला. त्या घोड्याचा वेग व चपळाई पाहून अफगाण सैनिकांनीं आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. आपला घोडा नागमोड चालवीत व भाला गरगर फिरवीत तो मोठ्या वेगानें पुढें येत होता. त्या घोड्याचा व शिपायांचा आवेश पाहून एक शिपाई म्हणाला, " काय शानदार घोडा

आहे नाहीं ? " दुसरा म्हणाला, " स्वारहि काय फांकडा व उमदा आहे !"

मराठा सरदार जवळ येऊन पोंचतांच लालन आपल्याशींच कांहीं तरी पुटपुटली. दोस्तमहंमदला तें अर्धवट ऐकूं गेलें. तो म्हणाला, " छोकरी, तूं काय पुटपुटलीस ? " " छे, छे, मी कांहींच पुटपुटलें नाहीं. " असें जरी लालन म्हणाली तरी तिचा आनंद, आश्चर्य इत्यादि भावनांनीं कावराबावरा चेहेरा त्यानें पाहिला असता तर तिचें म्हणणें किती असत्य आहे हें त्यास पटलें असतें. परंतु त्याची नजर होती मराठा स्वाराच्या ऐटीकडे ! त्यानें लालनच्या उत्तराकडे फारसें लक्ष दिलें नाहीं.

मराठा सरदार एकदम दोस्तमहंमदच्या घोड्यास जाऊन भिडला व म्हणाला, " तुम्ही कोण लोक आहांत ? तुमच्या पेहेरावावरून तुम्ही आमच्या देवांच्या मूर्ति फोडणारे अफगाण दिसतां. " दोस्तमहंमद आपला राग आवरीत म्हणाला, " मी पोपळझाई सरदार लुतुफखान यांच्या फौजेंतील एक अमलदार आहें. " " तर मग तुमच्या सरदाराला जाऊन सांगा कीं, द्वंद्व खेळण्यास या. " दोस्तमहंमद म्हणाला, " तुमचा दर्जा, खानदानी कांहीं कळल्याशिवाय मी काय सांगणार ? " हें त्याचें बोलणें ऐकतांच मराठा सरदारानें आपली सोन्याची मोर्तब अंगठी काढली व त्याला देत म्हणाला, " ही अंगठी त्याला दे म्हणजे त्याला सर्व कांहीं कळेल. पण तुम्ही येथें कां आलां आहांत ? "

दोस्तमहंमदनें त्याला सविस्तर कारण सांगितलें. त्याला तें समर्पक वाटलें नाहीं. त्या दोघांमध्यें जें भाषण झालें तें ऐकून त्या बैरागिणीचा चेहेरा मात्र अगदीं फिरल्यासारखा झाला. तो फरक कोणाच्या लक्षांत येऊं नये म्हणून तिनें तोंडावर हात धरला.

" एका हिंदु स्त्रीला आमच्या छावणीपर्यंत पोंचविण्यास आलां ? अशा बाजारबुणग्या पोरी आमचेकडे शेंकडों आहेत. असलीं निरुपयोगी माणसें कशाला ! असो. करा तिला आमच्या लोकांच्या स्वाधीन." इतकें बोलून त्यानें आपलें घोडें फिरविलें व तो चालूं लागणार तोंच त्यांच्याबरोबर चालत आलेला बिरबल जाट पुढें झाला व घोड्यापुढें आडवा येऊन म्हणाला, " सरकार ! मी एक गरीब मुशाफर आहें. मलाहि तुमच्या छावणींत घेऊन चला. श्रीरामजी तुमचें कल्याण करील. "

मराठा सरदार म्हणाला, " अरे मूर्खा, घोड्याची टाप लागली असती ना ! असा आडवा कां पडतोस ? " जाठ म्हणाला, " अभय असेल तर सांगतों " " कसलें अभय ? काय हवें आहे तुला ? बोल, बोल लवकर. " " तुमचे दोस्त सुरजमल जाठ यांच्या मुलखांतील मी आहें. मुलीचें लग्न ठरविण्यासाठीं कर्नोळकडे गेलों होतों, तो आतां भरतपूरला जाण्यासाठीं माघारीं फिरलों आहें. विलायत्यांच्या छावणींतून मोठ्या मुष्किलीनें पार पडलों आहें. आपल्या छावणींत नेऊन माझा जीव वांचवा म्हणजे मी माझ्या मुलांमाणसांकडे निघून जाईन. "

मराठा सरदारास संशय आला कीं, याचा व दोस्तमहंमदचा कांहीं संबंध असेल काय ? हा गिलच्यांचा हेर आपल्या छावणींत प्रवेश करून घेण्यासाठीं कांहीं तरी बहाणा करीत असावा. त्यानें दोस्तमहंमदकडे निरखून पाहिलें. कांहीं तरी चलबिचल दिसली तर त्यांचा कांहींतरी संकेत असावा असा विचार तो करीत स्तब्ध राहिला. परंतु थोडा वेळ झाला तरी दोस्तमहंमद जाठाविषयीं उदासीनच दिसला. त्याच्या मनांतील हा संशयसंभ्रम पाहून दोस्तमहंमद म्हणाला, " सरदारसाहेब, आमची पण तो अगदीं अशीच अजीजी करीत होता. म्हणून त्याला आणलें म्हणण्यापेक्षां तो आमच्याबरोबर आला तरी आम्हीं दुर्लक्ष केलें. आपण त्याला येथेंच भोंकसून ठार केलेंत तरी आमची कांहीं एक हरकत नाहीं. किंवा हवें तर मीच त्याला तुमचेदेखत उडवून देतों. " दोस्तमहंमदचें हें निर्वाणीचें वाक्य ऐकतांच मराठा सरदार त्या जाठाला म्हणाला, " ही पोरगी आमच्या छावणींत जात आहे. तुला जायचें असेल तर खुशाल तिच्याबरोबर जा. " त्यांची परवानगी मिळतांच जाठ खुष होऊन उभा राहिला. मराठा सरदार व त्याची ती बिजली घोडी धूळ उडवीत निघाली व तींतच दिसेनाशी झाली.

दोस्तमहंमदनें ती बैरागीण व जाठ मराठ्यांच्या ताब्यांत दिलीं. लालन सांडणीवरून एखाद्या सराइताप्रमाणें चट्दिशीं खालीं उतरली व पोंचविण्यास आलेल्या लोकांना बक्षीस देण्याचें कबूल केलें होतें त्याप्रमाणें आपल्या मिळकतींतील अर्धा वांटा त्यांच्या स्वाधीन केला. टोळींतील लोक त्यामुळें खुष होऊन गेले. तिचें हें करणें पाहतांच मराठे स्वारही चकितच झाले. राहि-

लेल्या सामानाचा बोजा तिनें पाठीवर घेतला. छडी व बीन हातांत घेऊन मराठ्यांच्या छावणीकडे जाण्यास ती सिद्ध झाली.

दोस्तमहंमद मराठे स्वारास म्हणाला, " हे तुमचे सरदार आले होते, यांचें नांव मला ' कळेल का हो ? " मराठा स्वार मोठ्या ऐटीनें म्हणाला, हो हो कळेल ना ! हे सरदार म्हणजे आमचे सेनापति श्रीमंत भाऊसाहेब यांचे खास मेहरबानींतिल सरदार व आमच्यासारख्या स्वारांचा कलिजा–महादजीबाबा शिंदे आहेत.

" महादजी शिंदे " हें नांव त्या स्वाराच्या तोंडून निघतांच लालन बैरागीण मनांत चांगलीच चपापली. जणुं कांहीं तिच्या अंगावर वीज कोसळली आहे असेंच तिला वाटलें. ' माझा शोध काढीत हा सरदार इकडे आला असेल का ? ' अशीही शंका तिला आली. ही कल्पना मनांत येतांच तिला आपल्या मनाचें हीनत्व जितक्या तीव्रतेनें जाणवलें तितकें तिला बैरागीण म्हणवून घेण्यांत वाटलें नसतें. तिची ती मुग्ध प्रीतीचीं लक्षणें कोणाच्या नजरेला येण्याआधींच ते सर्व स्वार निरोप घेऊन आपापल्या छावणीकडे जाण्यास निघाले.

लालन मराठे स्वाराबरोबर निघाली. तिला वाटेंतच एक मठ व देऊळ लागलें. तिनें जवळच्या स्वाराला विचारलें, " या मठांत कोण राहतें. रखवालदार वगैरे माणसें असतील ना ?" मराठा म्हणाला, " पुजारी राहातो गांवांत, मठांत एक जख्ख म्हातारी जोगीण राहते. मठाची व देवळाची झाडलोट तीच करते. आमचे लोक तिच्याकडे हमेशा चिलीम ओढावयास जातात. " " माझ्यासारख्या मुशाफीर लोकांना गांवांत कोण ओळखणार? मी येथेंच मठांत उतरावयास जातें. कृपा करून मला तिकडे जाण्याची परवानगी द्या. "

अमलदार म्हणाला, " ठीक आहे. तुझ्या मर्जीस येईल तिकडे जा. मात्र हें लक्षांत ठेव कीं, तूं जात आहेस ती जागा आहे ओसाड ! रात्रीचा मुक्काम करण्याजोगी नाहीं. तूं आमच्या मोर्चेबंदीच्या आंत आलीस तर तुला कसलीच भीति रहाणार नाहीं. शिवाय तेथें रात्रीच्या वेळीं भुतांखेतांच्या चेष्टा होतात म्हणे. "

अं: ! त्याची नाहीं मला भीति वाटत. जें नशिबीं असेल तें होईल.

विलायती भुतांच्या भयांतून सुटलें एवढें पुष्कळ झालें. माझा छळ कोणीं केला तरी त्याला मिळणार तरी काय ? ”

“ तूं भिकारीण असलीस तरी मोठी फटाकडी दिसतेस अं ! ” एवढ्यांत तो जाठ पुढें झाला व म्हणाला, “ साहेब, मीहि तिच्याबरोबरच जातों. जाऊं ना ? ”

तूं जा, रहा, पाहिजे तें कर. ” एवढें बोलून तो जाठाकडे निरखून पाहूं लागला व चपापून लालनकडे वळत म्हणाला, “ पोरी, हा म्हातारा तुझ्या ओळखीचा आहे ना ? ”

“ नाहीं, रावसाहेब. त्याची माझी वाटेंतीलच ओळख. मी त्याची कोण ? मी दक्षिणेकडची खानदेशची. हा इकडचा भरतपूरचा जाठ. आमच्याबरोबर विलायत्यांच्या छावणींतून आला आहे येवढीच त्याची मला माहिती. ”

तिचें बोलणें ऐकतांच त्या मराठा स्वारानें पुन्हा एकदां जाठाकडे निरखून पाहिलें. त्याच्या मनांत कांहीं तरी किंतु येऊन मान हालवीत भालाहि मोठ्या शिताफीनें उगारला व म्हणाला, “ ए गव्हारा, रामोशी, तुला आणण्याचा मला हुकूम नसता तर... तुझी व आमची देवानें पुन्हा भेट करूं नये. जर कांहीं तुझी लुच्चेगिरी माझ्या ध्यानांत आली तर तुझी उचलबांगडी करून झाडाला उलटा टांगून प्राण घेईन. चेहऱ्यावरून तरी हा मोठा बिलंदर दिसत आहे. ए बैरागिणी, याच्यापासून नीट संभाळून रहा. ”

बैरागीण मठाच्या कुंपणांत शिरल्याबरोबर हा तिच्या मागोमाग आंत घुसला. दहावीस पावलें चालून गेल्यानंतर मठाच्या दाराशीं तीं दोघें पोंचलीं.

मठ बराच विस्तीर्ण असून एक मजलीच होता. त्याच्यावरील धाबेंही बरेंच जुनें होतें. दरवाजाच्या दोहों अंगांना खिडक्या असून त्या बऱ्याच उंचावर व लोखंडी गज मारून बंद केलेल्या होत्या. आंत शिरल्याबरोबर चौकांत दोन बाजूला दोन वृंदावनांच्यामधून मठाकडे वाट गेली होती. आंतील चौकांत एक भलें मोठें वडाचें झाड होतें. त्याच्या फांद्या व पारंब्या मंडपासारख्या चौकांत पसरल्या होत्या. त्या झाडाच्या सर्वांत उंच असणाऱ्या शेंड्यावर एक पांढरें निशाण फडफडत होतें.

दरवाजाच्या तीन पायऱ्या चढून जाऊन उंबऱ्यांत पाय ठेवल्याबरोबर

एक जख्ख म्हातारी लालनच्या दृष्टीस पडली. तिच्या केसांची अंबाडी झाली होती. अंगावर सुरकुत्या पडून निबर दोडक्यासारखें तिचें शरीर दिसत होतें. दोन्ही गुडघे उभे करून व त्यांत मान घालून ती खोकत बसली होती. तोंडांत शपथेलाहि दांत दिसत नव्हता. तिनें एक पोकळशी कफनी अंगांत घातली होती. ती नवी असतांना भगवी असावी असें वाटण्याइतपत विटून तिच्यासारखीच जीर्ण झाली होती. लालनची भगवीं वस्त्रें पाहून ती आपल्याच जातीची कोणी बैरागीण आहे असें तिला वाटलें. लालनचें एकूण रूप व वय पाहून ती एखाद्या महंताची मुलगी असेल म्हणून तिला उत्थापन देण्यासाठीं ती काठीवर भार देत उभी राहिली. लालन तिला पाहतांच म्हणाली, " जय सितारामजी ! माताजी, तुला नमस्कार करतें." म्हातारीनें तिला आशीर्वाद दिला. याप्रमाणें दोघींची त्यांच्या संप्रदायाप्रमाणें आलिंगनें झाल्यावर दोघीहि एकमेकींकडे पहात उभ्या राहिल्या. नंतर म्हातारी म्हणाली, " बेटा ! कोण तूं ? कोणाची ? कोठून आलीस ? "

लालन—माताजी, मी रमतीराम जोगीण आहें. रामभजन करून भिक्षा मागतें.

" पण बेटा, तुझ्या पित्याचें व महंताचें नांव नाहीं सांगितलेंस ? तुझेंहि नांव सांगितलें नाहींस ? "

" माताजी, मला लालन म्हणतात. माझा पिता जानकीदासबाबा व महंत रणछोडदास महाराज. हे खानदेशांत बऱ्हाणपुरीं असतात. माताजी, आपलें नांव काय ? "

" मुली, या देहास मोहनप्यारी म्हणतात. माझे महंत वैकुंठवासी होऊन बरींच वर्षें झालीं. माझे गुरु बाबा बालमुकुंददासबाबा वृंदावनास असतात. तूं येथें निःसंकोचपणें रहा बरें ! "

" माताजी, मला रात्रीं राहण्यापुरती जागा पाहिजे. दुसरें कांहीं नको. "

" ये मुली, ये आंत. तुला जागा दाखवितें. पण तुझ्यामागून हा म्हातारा कोण येत आहे ? तुझाच आहे ना ? "

लालननें मागें वळून पाहिलें तों म्हातारा जाठ खांद्यावर कावड घेऊन तुरुतुरु चालत येत असलेला तिला दिसला. मोहनप्यारीच्या प्रश्नाला त्यानेंच

उत्तर दिलें, "माई, मी एक गरीब मुशाफीर आहें. माझ्याही मनांत एक रात्र या मठांत मुक्काम करावा असें आहे; बघ कृपा करून जागा देशील तर..."

"अरे बाबा ! हा मठ मुशाफीर लोकांसाठींच आहे." लालनकडे वळून ती पुढें म्हणाली, "हा तुझ्या चांगल्या ओळखीचा आहे ना?"

"माताजी, त्याची व माझी पूर्वीची ओळख नाहीं. तो भरतपूरचा जाठ आहे इतकेंच मीं आतांपर्यंत ऐकलें आहे."

हा म्हातारा, पाठीला पोंक आलेला कावडवाला म्हातारा मुशाफीर आहे, त्याला जागा देण्यास हरकत नाहीं असा विचार करीत तिनें त्या दोघांना आंत घेतलें व एका सोप्यांत त्यांना जागा दाखविली. तीं दोघेंहि आपापलें सामान ठेवून विहिरीवर जाऊन हातपाय धुऊन आलीं, त्या वेळीं करकरीत तिन्ही सांजा झाल्या होत्या. मोहनप्यारीनें पुढचा दरवाजा लावला व त्या दोघा मुशाफिरांच्या सोईला लागली.

● ● ●

# प्रकरण ५ वें :

मोहनप्यारी व लालन स्वयंपाक करून जेवल्या. जाठाला त्यांच्या हातचें अन्न चालेना म्हणून मोहनप्यारीनें त्याला भांडीं दिलीं. त्यानेंहि तीन दगड मांडून चूल बनविली व डाळचपाती करून तो जेवला. सोप्याच्या भिंतीला एक लहानसा कोनाडा होता, त्यांत पणती होती. म्हातारीनें त्यांत भरपूर तेल घातलें व वात सरसावून थोडासा प्रकाश पडेलसें केलें. अंगणांत कांहीं पणतीचा, कांहीं नक्षत्रांचा असा अंधुकसा प्रकाश पडला होता. त्यामध्यें त्या तिघांनीं बैठक घेतली व तीं गप्पा मारण्यास बसलीं. लालननें आपलें बीन काढून त्याचे स्वर मिळवून घेऊन देवाची वेगवेगळ्या रागांतील भजनें ती त्यांना म्हणून दाखवूं लागली. जाठानें आपल्या बगल पिशवींतून चिलीम काढली व त्यांत तंबाकूचा चुरा भरून त्यावर विझत्या चुलीमधील एक निखारा ठेवला व ओल्या फडक्याची साफी लावून फक्‌फक्‌ करीत धूर काढूं लागला.

त्यानें एक जोराचा दम मारल्याबरोबर झट्दिशीं जाळ निघून तंबाकू चांगली जळूं लागली व त्याची तलफ भागली. त्यामुळें भय्याजी एकदम खूष होऊन गेले.

मोहनप्यारी त्यांच्याशीं गप्पागोष्टी करण्यासाठीं येऊन बसली होती. परंतु लालनची लय बीनांत लागून गेली होती. जाटही तेथेंच बसून कोणत्या तरी विचारांत गढून गेला होता. किंवा त्या बाया बोलल्याशिवाय मध्येंच तोंड घालूं नये म्हणूनही कदाचित् गप्प बसला असेल. शेवटीं मोहनप्यारीनेंच बोलण्यास सुरुवात केली, "मुली, तुला आज फार श्रम झाले असतील तर आतां निजेनास का ?" तिचें बोलणें लालननें ऐकलें नाहीं. म्हणून ती जरा मोठ्यानें पुन्हा म्हणाली, "तुला झोंप येत नाहीं का ? तुला कोणती एवढी चिंता लागली आहे?" स्वप्नांतील मनुष्य एकाएकीं जागें होऊन सांवरून बसतें त्याप्रमाणें तिनें चपापून वर पाहिलें व हातांतील बीन मांडीवर आडवें धरून गडबडीनें ती म्हणाली, "माताजी, मला कांहीं विचारलें ?" म्हातारी पुन्हा म्हणाली, "वाटेच्या श्रमानें थकली आहेस कीं कसली तरी तुला काळजी लागली आहे? तुला झोंप कां येत नाहीं ?"

लालन जरा वेळ स्तब्ध बसली व नंतर म्हणाली, "फार चालण्यानें मी थकून गेलें आहें व चिंताही आहेच. आज माझें डोकें फिरल्यासारखें होऊन गेलें आहे."

म्हातारी काळजीच्या स्वरांत म्हणाली, "त्या विलायत्यांची छावणी जवळ पडली आहे; त्यांनीं तुला पकडून त्रास तर नाही दिला ?"

"तसाच कांहींसा प्रकार ... पण खुद्द बादशहानें मला त्यांचे हातून सोडविलें, नाहींतर त्या अर्बुजांनीं माझें काय केलें असतें कोणास ठाऊक !"

"पण तूं एवढी तरणीताठी मुलगी त्या जंगली लोकांमध्यें गेलीस तरी कशाला ?"

"भीक मागणाऱ्या बैरागिणी लष्करांत फिरत असतात, तशी मीहि फिरत होतें. यांत मीं गैर काय केलें ?"

"बेटा, मी गैर म्हणत नाहीं. पण आपल्या राजाच्या लष्करांत फिरण्याला भीति नसते. विलायती म्हणजे शुद्ध रानांतील जंगली जनावरें."

" मराठ्यांच्या लष्करांतच जाण्याचा माझा इरादा होता. पण वाटेंतच त्या चांडाळांनीं मला गांठलें. "

" पण रस्ता चुकून त्यांच्या छावणीकडे गेलीस कशी ? पानिपतचा रस्ता तुला कोणीहि सांगता. तूं दक्षिणेंतून मराठ्यांच्या लष्कराबरोबर आलीस कीं मागून आलीस ? "

" हा मुलूख मीं कधीं पूर्वी पाहिला नव्हता. दुराणीच्या लष्करावरून नीट जा म्हणजे मराठ्यांची छावणी लागेल असें मागच्या गांववाल्यांनीं सांगितलें त्या धोरणानें मी चाललें होतें. "

" पण मराठ्यांच्या छावणींत तुझें एवढें निकडीचें काम तरी काय ? तुला कांहीं जिव्हाळ्याचीं माणसें नाहींत का ? त्यांनीं तुला इतक्या लांब येऊं तरी कसें दिलें ? का छावणींतल्या एखाद्या गुलजार पुरुषावर मन बसलें आहे म्हणून एवढ्या श्रमांना न जुमानतां इकडे धांवत आली आहेस ?"

मोहनप्यारीचें हें टोंचून बोलणें ऐकून लालन जराशी लाजली. तेव्हां म्हातारी खुर्षीत येऊन पुढें म्हणाली, " मराठ्यांनीं आपलीं मुलें–माणसें बरोबर आणलीं आहेत. मग तुझा प्रियकर सोडून तूं मागें कशी राहिलीस ?"

" माताजी, मी माझ्या जिवाला त्रासून गेलें आहें. असा वैताग आला म्हणजे विरंगुळ्यासाठीं मी आपलें बीन काढून वाजवीत व गात बसतें. गायला-वाजवायला मला माझ्या बाबांनीं शिकविलें म्हणूनच मी वांचलें आहें. गाणें-बजावणें ही एक दैवी कला आहे. ती जनावराला देखील मोहित करते. मग मानवांना तल्लीन करील यांत नवल काय ? शिवाय मनाची एकाग्रता होण्यासहि हें एक उत्कृष्ट साधन आहे. म्हणून ज्या ज्या वेळीं आजच्या-सारखें माझें मन उदास होतें त्या त्या वेळीं मी बीन काढून वाजवीत बसतें. माझ्या वडिलांनीं ही एक अजब चीज देऊन ठेविली आहे. जणुं काय माझ्या कपाळीं पुढें दुःख भोगावयाचें आहे असें भाकित करूनच ही तजवीज त्यांनीं करून ठेवली. "

" बेटा, तुझ्या मनाला करमणूक होत असली तरी त्यानें दुःखें कमी होत नाहींत. दुःख मोकळ्या मनानें सांगण्यानेंच कमी होतें. पोटांत ठेवल्यानें तें दुणावतें. सांगितल्यानें हलकें होतें. मला सांग. पाहीन कांहीं उपाय सुचला तर. "

" माताजी, माझी कर्मकथा बरीच लांबलचक आहे. ती ऐकून तुम्हांस कंटाळा येईल, म्हणून सांगण्यास संकोच वाटतो. "

" मी तुला आईसारखीच आहें. हा बुद्ढा जाठर्हा तुझ्या वडिलां-सारखा आहे. मग संकोच कसला ? "

" तें सगळें खरें. पण असल्या गोष्टीच वडील माणसांपुढें सांगण्यास संकोच वाटतो म्हणून मन कचरतें. दुसरें काय ? "

" हा वेडे ! त्यांत कसला संकोच ? आणि भीति ? वारा लागला नाहीं असें झाड दुनियेंत तरी सांपडेल का ? फार दूर कशाला ? ... मला स्वतःलाच ... पण तें जाऊं दे. लपवून ठेवण्यासारखें नाहीं ना ? मग सांग तर."

इतकें त्यांचें बोलणें झाल्यानंतर तो जाठ उठून गेला व लोटाभर पाणी घेऊन येऊन मुकाट्यानें बाहेर जाऊं लागला. म्हातारीनें त्याला विचा-रलें, " भय्याजी, आतां कोठें निघालास ? " त्यानें न थांबतांच उत्तर दिलें— " जरा जाऊन येतों. लवकरच माघारीं येईन. " म्हातारी त्याला म्हणाली, " दार ओढून घे बरं का. उघडें टाकूं नको. " असें म्हणत म्हणतच ती उठली व दार लावीत म्हणाली, " परत आलास कीं मला हांक मार म्हणजे तुला दार उघडीन." तिनें दार लावलें व कडी-अडसर लावून लालनपाशीं येऊन बसली व म्हणाली, " हं, आतां चालू दे तुझी गोष्ट. "

लालननें आपली हकीकत सांगण्यास सुरवात केली.

• • •

## प्रकरण ६ वें :

माझा पिता जानकीदासबाबा. खानदेशांत तापी नदीला एक वळण आहे. तेथें मठ बांधून राहिला होता. मठापासून थोड्या अंतरावर भिल्ल, गोंड वगैरे लोकांची वस्ती होती. माझा जन्म तेथेंच झाला. जवळच्या एका खेड्यामध्यें होळकरांची चौकी होती. तेथें चोरट्यांचा बंदोबस्त व पैसा वसूल करण्यासाठीं एक जमादार रहात असे. माझी आई माझ्या लहानपणींच वारली. परंतु माझ्या पित्यानें पुन्हा लग्न केलें नाहीं. मी साधारण मोठी

झाल्यावर मठाची झाडलोट, शेणगोटा वगैरे कामें करीत असे, तापी नदीवरून पाणी आणीत असें व घरचा कामधंदा संपला म्हणजे झाडाच्या पारंब्यावर बसून झोंपाळ्यासारखे झोके घेत असें. माझा पिता मोठा रामभक्त व धार्मिक होता. त्यानें चारी धामांच्या यात्रा केल्या होत्या. उत्तम गाणारा व बीन वाजविणारा होता. आसपासच्या खेड्यांतून ब्राह्मणवस्ती नसल्यानें भिल्ल, गोंड लोकांचीं धर्मकार्येंही तोच करीत असे. ते लोक आम्हांला लागणारा दाणा, चारा व दूधदुभतें देत असत. मठांत यात्रेकरूंची व पांथस्थांची नेहमींच रहदारी चालू असे. कोणास शिधा, कोणास चटणीभाकर, कोणाला तांब्याची शिवराई असा दानधर्मही आम्ही ऐपतीप्रमाणें करीत होतों. संध्याकाळचे वेळीं मठांत आसपासची मंडळी जमा व्हावयाची व गाणें–बजावणें व भजन हीं नित्य चालावयाचीं. माझ्या पित्यानें मलाही गाणें–बजावणें व भजनें शिकविलीं. हा क्रम गतवर्षापर्यंत चालू होता. त्या वेळीं मला पंधरावें वर्ष सरून सोळावें वर्ष लागलें होतें.

एक दिवस मठांत पाणी भरण्यासाटीं मी दुपारचीच नदीवर गेलें होतें. उन्हाचे चटके बसण्याची वेळ होती, म्हणून इतर कोणी बायकामुली पाणवठ्यावर नव्हत्या. नदीचें पात्र खोल खडकांत होतें. घागर भरून घेऊन धांपा टाकीत मी वर येऊन पोंचतें न पोंचतें तोंच मठाशीं कोणीतरी हांक मारीत असल्याचा आवाज मीं ऐकला. म्हणून मीं तिकडे नजर टाकली तों लिंबाच्या थंड छायेखालीं एक घोडेस्वार माझ्या दृष्टीस पडला. त्याचा घोडा एका जागीं स्थिर न रहातां एकसारखा हिंडत व फुरफुरत आपल्या टांचेनें माती खणीत होता. स्वाराचा पोशाख अगदीं तंग असून डाव्या बगलेंत भाला, हातांत तीरकामठा व पाठीला भाता बांधलेला होता. कंबरेस नंगी समशेर लटकत होती. यावरून तो कोणीतरी शिकारी असून मठांत विश्रांतीसाठीं आला असेल असें मला वाटलें. त्याचा रंग काळासांवळाच होता. अंगानें चांगला गुटगुटीत व डोळे चांगले मोठे व पाणीदार होते. मी त्याजकडे पहातांच त्यानें जणु काय जादूच फेकिली असें मला झालें. माझें मस्तक भणाणून गेलें, डोक्यांतील शिरा फुगून उडूं लागल्या व काळीज बाहेरच पडतें कीं काय असें झालें. डोक्यावरची घागर डळमळूं लागून मी घेरी येऊन पडणार असेंच मला वाटलें. मी मठाशीं गेलें न गेलें तोंच तो म्हणाला,

" या मठांत कोण रहात असतें ? " मीं म्हटलें, " आम्ही बैरागी लोक. " यावर तो हलक्या स्वरांत म्हणाला, पोरी घाबरूं नको. मी तहानेनें व्याकुळ झालों आहें. मठांत मराठ्यानें पिण्यासारखें स्वच्छ व ताजें गार पाणी असेल तर एक तांब्याभर घेऊन ये. उन्हाच्या तिरपेनें माझें डोकें अगदीं चढलें आहे. माझ्याबरोबरचे लोकही फार दूर राहिले आहेत. नदीची दरड खोल व घोड्यासकट जाण्यासारखी नाहीं. घोडें ठेवून गेलों तर तें कोठें तरी पळून जायचें, फार तुफानी जनावर आहे, दावणीसकट पळत सुटतें. वाटेंत कोठें ज्याचें पाणी चालेल असा कोणी भेटला नाहीं, म्हणून मठाशीं येऊन हांका मारीत होतों."

हें त्याचें बोलणें ऐकून मीं घागर आणली होती. त्यांतीलच तांब्याभर पाणी घेऊन त्याजकडे गेलें. तो स्वार घोड्यावरून खालीं उतरला व डावा गुडघा खालीं टेंकून आपल्या तोंडाशीं ओंजळ धरून बसला. मीं ओंजळींत पाण्याची धार धरली. पाणी पितांना त्याची नजर माझ्या तोंडाकडे होती. तो मजकडे एवढें निरखून कां पहात आहे हें मला कळत नव्हतें. पाणी पिऊन झाल्यावर हात झाडीत तो म्हणाला, " पोरी, मी एक खूणगांठ सांगतों ती ध्यानांत ठेव. तुझ्या डोळ्यांना सांभाळून रहा. भलत्यासलत्यावर नजर ठेवून जाळ्यांत सांपडशील आणि फसशील. संभाळून रहा. माझ्या सांगण्याचा तुला लवकरच प्रत्यय येईल. "

त्याचें हें बोलणें मला कसेंसेंच वाटलें. त्याला काय उत्तर द्यावें हेंच कळेना. शेवटीं मीं इतकेंच म्हटलें, " महाराज, आमच्यासारख्या गरीब लोकांवर आपली दया असावी. "

माझें बोलणें त्यानें ऐकलें न ऐकलेंसें करून तो पुढें म्हणाला, " मला शिकवायला बघतेस काय ? असला अल्लडपणा सोडून दे. बरें, आतां चिलमेला थोडा विस्तव आण पाहूं." मीं त्याला गोंवरीचें एक खांड दिल्यावर त्यानें चिलीम ओढली, व नंतर साफसूफ करून खोगिरांत टाकून घोड्यावर चढतां चढतां तो हंसऱ्या मुद्रेनें म्हणाला, " आज तूं माझ्या-साठीं श्रमलीस. तुझे उपकार मी विसरणार नाहीं. आज मी तुझ्यावर मोहिनीमंत्र टाकून जातों. त्यानें तूं माझ्यामागें शोध काढीत आल्याशिवाय रहाणार नाहींस. हें घे थोडेंसें वाटखर्चाला. प्रवासांत उपयोगी

पडेल. " त्याच्या कंबरेस एक जाळीदार कसा होता, तो त्यानें मजकडे फेंकला आणि घोडा उडवीत हंसत हंसत निघून गेला. तो निघून गेल्या-नंतर त्याच्याकडे मी पहातच राहिलें. त्यानें दिलेला कसा जमिनीवर ओतला तों त्यांत पेशवाई शिक्क्याचे चांदवडी रुपये पन्नास निघाले. ते पहातांच माझ्या आनंदाला सीमाच राहिली नाहीं.

इतकी हकीकत सांगून झाल्यावर लालनचा कंठ दाटून आला व ती आंतल्या आंत स्फुंदूं लागली. म्हातारी मोहनप्यारी तिचें सांत्वन करूं लागली आणि विषय बदलण्याच्या उद्देशानें म्हणाली, " तो म्हातारा जाठ मघां बाहेर गेला आहे तो अजून कसा परत आला नाहीं ? " लालननेंही तेवढयांत आपलें मन आवरलें व ती म्हणाली, " खरेंच, त्याला जाऊनहि आतां बराच वेळ झाला. अजून कसा नाहीं येत ? "

मोहनप्यारी उठून दाराशीं गेली व कानोसा घेऊन दार परत बंद करून परतली. दोघीही उठून झोंपण्याच्या विचारांत होत्या. लालनच्या मनांत शंका–कुशंकांचें जाळें पसरलें. मठांत शिरलेला मनुष्य कोण असावा ? तो एकाएकीं बाहेर गेला तो अजून परत कां आला नाहीं ? " कांहींतरी हें गौड-बंगाल असावें अशी तिला चिंता लागली. मध्यरात्रीच्या चौघड्याचा कर्णा वाजत होता, तोही बंद झाला. दोघी जणींनीं अंथरुणावर अंग टाकलें तरी त्यांस झोंप येईना. म्हातारी आडवी झालेली पुन्हा उठून बसली. तें पाहून लालनही उठून बसली व आपली हकीकत पुढें सांगूं लागली.

त्या दिवसापासून माझें मन अगदीं उदास व खिन्न झालें. अंगांतील टवटवी नाहींशी झाली. शेजारीपाजारी म्हणूं लागले, हिला दृष्टीचा झपाटा लागला. तेथें गोंड जातीची एक माझी मैत्रीण होती. तिच्याजवळच फक्त मी माझ्या मनांतील दुःख ओकून टाकलें. तिनेंहि सांगितलें, 'तुला त्या पुरुषाची दृष्ट लागली आहे. तो भेटल्याशिवाय तुझी मनोव्याधि बरी व्हाव-याची नाहीं. या रोगाला दुसरें औषध नाहीं.' तिचें म्हणणें मला हळूहळू खरें वाटूं लागलें. त्याच्या पुनर्दर्शनाची मला अनिवार ओढ लागली. मला स्वप्नांतही तो पुरुष दिसूं लागला. मला आपल्या घोड्यावर पुढें घेऊन बसला आहे, मीं त्याला घट्ट धरलें आहे, अशी नाना प्रकारचीं स्वप्नें मला पडूं लागलीं. स्वप्नांतून जागें होऊन डोळे उघडून पाहूं लागावें तों कांहीं नाहीं,

सगळें खोटें. तापी नदीच्या तीरावर एकटें जाऊन बसावें, डोळे मिटून त्याची कृष्णमूर्ति डोळ्यांपुढें आणावी. ती प्रत्यक्ष भासमान न होई, म्हणून घळघळां रडावें, रानांतून भ्रमिष्टासारखें हिंडावें. असेंच चाळे मी करूं लागलें. माझ्या पित्याला माझी ही वृत्ति पाहून फार काळजी वाटूं लागली. कर्णोपकर्णी त्याला खरा प्रकार कळला. त्याबरोबर तो माझ्या लग्नाच्या तयारीस लागला. एका रात्रीं माझा पिता आणि जमादार गप्पा मारीत बसले होते. त्यांना वाटलें, मला झोंप लागली आहे; पण मी जागीच होतें व त्यांचें बोलणें ऐकत होतें. माझा पिता जमादारास सांगत होता, ' एलिचपुरास माझ्या मुलीजोगा एक मुलगा आहे. मी जाऊन लग्न ठरवून येतों.' दुसऱ्या दिवशीं तो गांवास जाण्यास निघाला तेव्हां मला म्हणाला, ' लालन, मला परत येण्यास कांहीं दिवस लागतील. संभाळून रहा. पाटील आणि जमादार यांना तुझ्यावर लक्ष ठेवण्यास सांगितलेंच आहे. '

माझा पिता आतां मला कोणाच्या तरी गळ्यांत बांधणार हें खास ठरलें. एकदां लग्न लागलें कीं ग्रंथच आटोपला. मनानें वरलेला पुरुष या जन्मीं कसला मिळतो. यांतून सुटका तरी कशी करून घ्यावी ? डोकें आपटून प्राण द्यावा कीं अफू खावी कीं मठ सोडून वाट फुटेल तिकडे पळून जावें ? शेव-टचा उपायच मीं पसंत केला. राजपूत राजकन्यांच्या कथा चारण, भाट सांगत असत, त्यांतही असेंच सांगितलेलें असे. तोच मार्ग अनुसरावा, असा निश्चय मीं केला. शिलेदारांनीं दिलेले पैसे मीं जपून ठेविले होते. त्यांतच मठांतील पैसे भरतीस घेतले. लुळेपांगळे देखील उपाशी मरत नाहींत, आपण तर चांगले धट्टेकट्टे आहोंत. बीन वाजवावें, गाणें गावें, म्हणजे पोटाला गोळाभर अन्न मिळेल तें मिळवावें व आपल्या मनांतील प्रीतिरूप दीपिकेनें आपल्या मनांतील सरदाराला नवखंड पृथ्वी हिंडून शोधून काढावें, असा विचार केला व बीन–छडी घेऊन मुशाफिराचा पोशाख करून मीं मठ सोडला.

मीं रस्ता धरला प्रथम नागपूरचा. सुदैवानें मला एक लमाणांचा तांडा भेटला. त्याच्या सोबतीनें मी चाललें. लमाण लोक मुक्कामाला उतरले म्हणजे बैलाच्या मुठी व गोण्या चौफेर एकावर एक रचून ठेवीत व त्यामध्यें मुक्काम करीत. रात्रीं जेवणखाण आटोपल्यावर गाणें–बजावणें करून मी त्यांची करमणूक करीं. नागपुरांत भोसल्यांच्या राज्यांत मी बरेच दिवस राहिलें.

त्यांचे कैक सरदार–शिलेदार मीं पाहिले. एवढी मोठी गर्दी, एवढा मोठा लोकांचा भरणा, पण त्यामध्यें मला हवा तो पुरुष दृष्टीस पडेना. म्हणून मी नागपूर सोडून भागानगरचा रस्ता धरला. तिकडे एक शिपायांची टोळी जात होती, तिच्या सोबतीनें मी निघालें. कोठें किर्र झाडी तर कोठें जंगली माणसें, वाघसिंहही जंगलांत संचार करीत असत. आमच्यापैकीं कांहींना भिल्लांनीं पकडूनहि नेलें. शिपाई लोक रात्रीच्या वेळीं बुधली–मशालीच्या उजेडांत व चुड्या पेटवून चालत असत. भागानगरास पोंचल्यावर तेथील नवाब, अमीर–उमराव सरदार मीं पाहिले. परंतु तेथेंही मला हवा तो पुरुष सांपडला नाहीं. तेथून मी विजापुरास गेलें व सातारा पाहून मुंबईस गेलें. मुंबईस समुद्राच्या भरती–ओहोटीचा चमत्कार पाहिला. जेथें माणसें पायांत जोडा घालून नुकतींच चालत होतीं त्याच ठिकाणीं घटकाभरांत दोन दोन भाले पाणी झालेलें मीं पाहिलें. पण माताजी, ज्याच्यासाठीं सगळा देश डोईवर घेऊन डोम डोम करीत फिरत होतें, त्या पुरुषाचा थांग लागेना, कैक लोकांना मीं त्याच्या खाणाखुणा सांगितल्या. तेव्हां एक पुरुष मला म्हणाला, 'तूं पुण्यास जा. ते पेशवे सरकारचें राजधानीचें शहर आहे. चोहोंकडचे मराठे सरदार तेथें नेहमीं येत असतात. तेथें एका भल्या माणसा-जवळ खाणाखुणा सांगितल्या. तेव्हां तो म्हणाला, 'सध्यां श्रीमंत भाऊ-साहेबांची स्वारी उत्तरेवर निघाली आहे. त्यांच्याबरोबर इकडचे बरेचसे शिलेदार, सरदार गेले आहेत. त्यांची छावणी असेल तिकडे जा. तेथें तुला तुझा पुरुष कदाचित् भेटेल.

तेथून मी उत्तर हिंदुस्थानच्या मुशाफरीस निघालें. माताजी, प्रवासांत किती कष्ट असतात याचा मला चांगलाच अनुभव आला. दौलताबाद, मालेगांव, सुरत, बडोदा असे करीत करीत उदेपुरास गेलें. उदेपुराहून इंदूर, इंदूरहून कोटा, कोट्याहून जयपूर याप्रमाणें पुष्कळ शहरें पहात मी हिंडलें. पण कसचा शोध लागतो? ज्याचा पत्ता लावायचा, त्याचें नांव-गांव माहीत नाहीं. नुसत्या ढोबळ खुणा सांगून ठावठिकाणा लागेना. मी त्याच्यासाठीं वेडी झालेली. यामुळें त्याचें वर्णन मी पुष्कळ खुलवून व फुग-वून सांगत असें. कधीं राजवाड्याच्या आसपास उभें रहावें, कधीं मठ, धर्मशाळा धुंडाळाव्या, कोणी सरदारी पागोटें घातलेला चालला कीं त्याच्या

अनुक्रम

मागोमाग चालावें असें करतां करतां वेळ निघून जात असे. मी काळजीनें झुरणीस लागून कधींच मेलें असतें. पण हवापालट, नवीं शहरें, नवे देश पाहून मनास विरंगुळा वाटे व कोठें तरी, केव्हां तरी पत्तो लागल्याशिवाय राहणार नाहीं, अशी आशा लागली होती, तिच्या जोरावर मी जगलें.

पाऊसकाळ संपल्यावर मी पुन्हां पुढच्या प्रवासास निघालें. मराठे व गिलचे यांच्या फौजांचा शोध घेत चालले. दिल्लीजवळ असतांना मला कळलें कीं, पानिपतजवळ मराठे व गिलचे यांच्या छावण्या पडल्या आहेत. दुराणी छावणीच्या मागच्या अंगाला एक गांव होता, तेथपर्यंत मी सुरक्षित येऊन पोंचलें. पानिपतवर मराठ्यांचा तळ पडल्याची पक्की बातमी मला लागली. तिकडे जाणाऱ्या रस्त्यावरच दुराणी फौजेची छावणी होती. त्यांना वळसा घालून अंधारांतून छावणींत मला नेऊन सोडावें अशा करारावर मी एका माहीतगार माणसास बरोबर घेतलें. दुराणीच्या छावणीवरून जरा पलीकडे जातें न जातें तोंच मुसलमान स्वारांची एक टोळी गस्तीवर फिरत होती ती आमच्यासमोर आली. माझा वाटाड्या घाबरून पळून गेला. मी एका झुडपाच्या आड लपून बसलें. पहाटे मी पुन्हां वाट चालूं लागलें, तोंच दोन धटिंगण पुरुषांनीं मला धरलें. त्या अर्जुनांना माझी भाषा कळत नव्हती. शिवाय त्या परधर्मी लोकांना आमची दया कशी येईल ? त्या दोघांतच सुंदोपसुंदासारखें भांडण लागलें व माझी विटंबना न होतां सुटका झाली. त्या स्वाराच्या अंमलदारानें मला शहापुढें उभें केलें. शहानें चौकशी केली. मला बीनावर गाणें वाजवून दाखव म्हणून सांगितलें व मला सोडून देण्याचा त्यानें हुकूम केला. त्यांच्या अंमलदारानें मला गुळचट थापा देऊन राहण्याचा आग्रह केला; परंतु मी हट्टच धरून बसलें तेव्हां त्याचा नाइलाज झाला व मजबरोबर शिपाई देऊन रणखांबाकडे पोंचतें केलें. माताजी, याच रणखांबाजवळ माझ्या कर्मकथेंतील सर्वांत मोठा चमत्कार झाला. रण-खांबाजवळ जो पुरुष दृष्टीस पडला, तो कोण असेल सांग पाहूं ! तोच तो माझा प्राणवल्लभ मराठा सरदार. ”

माताजी मध्येंच म्हणाली, “ ज्याच्याकरितां तूं सर्व देश पालथा घातलास

तो तुझा प्राणप्रिय तुला दिसला ? त्याच्याशीं दोन शब्द तरी बोलावयाला सांपडलें का ? "

लालन काकुळतीस येऊन म्हणाली, " माताजी, अशी थट्टा करूं नकोस. बोलणें–चालणें कसलें आलें आहे ? त्याला पाहताक्षणींच डोळे दिपल्यासारखे झाले. "

" हा वेडे ! डोळे घट्ट मिटून घ्यावयाचे. पण आतां तरी त्याचें नांव विचारलेंस का ? "

" होय माताजी, त्याचें नांव मात्र कळलें. त्यांचें नांव महादजी शिंदे. त्यांच्याच माणसांनीं मला इकडे आणलें व नंतर या मठांत तुमची गांठ पडली. "

" आतां मला सर्व कळलें. पण तुझ्याबरोबरचा हा दुसरा मनुष्य कोण ? "

" त्याची मला कांहींच माहिती नाहीं. दुराणीची छावणी सोडली त्याच वेळीं तो माझे दृष्टीस पडला. मुसलमान सरदाराची अजीजी करून तो माझ्याबरोबर इकडे आला इतकेंच. "

" पण तो अजून कसा माघारीं येत नाहीं ? कांहीं दगाफटका तर नसेल ना ? "

असें दोघींचें बोलणें चाललें असतांना दरवाजाला कोणींतरी जोरानें धक्का दिला व माताजीस हांक मारली. ज्याच्याविषयीं मनांत संशय येऊन बोलणें चाललें होतें त्या जाटाचीच हांक होती.

म्हातारी दारापाशीं गेली व दाराला क्षणभर कान लावून उभी राहिली तों जाट पुन्हा पुन्हा हांक मारूं लागला. त्याच्या आवाजांत भिण्यासारखें कांहीं नव्हतें तरी पुन्हा एकदां खात्री करून घ्यावी म्हणून मोहनप्यारीनें विचारलें, " भय्या, एवढा वेळ कोठें गेला होतास ? एक प्रहर होऊन गेला तरी तुझा पत्ता नाहीं. "

बाहेरून आवाज आला, " मला गारद्यांनीं चौकीवर अडकवून ठेविलें. अंमलदार आल्यावर त्यानें चौकशी करून मला सोडून दिलें. आतां लवकर दार उघड. "

म्हातारीनें प्रथम हळूच कडी काढली व अडसर बाजूला केला. नंतर दार जरा किलकिलें करूं लागली. त्याचा करकर आवाज झाला. तिनें

डोकावून बाहेर पाहिलें तों बराच मोठा जमाव तिला दिसला. त्यांनीं दोन्ही दारें एकदम आंत रेटलीं त्यासरशीं म्हातारी मोहनप्यारी मागें कोलमडून पडली. रस्ता खुला होतांच कांहीं लोक आंत घुसले. त्यांत त्या बिचारीचा चेंदामेंदा होऊन तिनें राम म्हटलें कीं काय कोण जाणे !

• • •

## प्रकरण ७ वें :

दार ढकलून आंत शिरलेल्या माणसांचीं दणदण पावलें वाजूं लागलीं, तेव्हां कांहींतरी दगाफटका आहे असें वाटून लालननें किंकाळी फोडली. तिची किंकाळी ऐकून " अरे पाहतां काय? पकडा तिला. येथेंच लपून बसली आहे. चला, जलदी करा. " असें एक मनुष्य ओरडला. तो स्वर तिच्या ओळखीचाच होता. तो लुतुफखानच होता.

" दोस्तहो, इकडे माझ्यामागें या. म्हणजे तुमच्या हातीं लागलीच ! " असें दुसरा म्हणाला. हा दुसरा मनुष्य म्हणजे तिच्याबरोबर दुराणीच्या छावणी-पासून असलेला जाठच असें तिनें ओळखलें.

म्हातारा जाठ त्या मंडळींचा म्होरक्या होता. त्याच्यामागून उल्लू झालेला लुतुफखान व त्याची टोळी आंत शिरलेली होती. अशा संकटांतहि लालननें प्रसंगावधान राखून मिणमिणत ठेवलेली पणती विझवून टाकली. नंतर ती पटकन् उठून एका कोपऱ्यांत जाऊन उभी राहिली. परंतु अशा युक्तीनें कितीसें निभावणार? बंदुकीसाठीं पेटलेला तोडा होता. त्यावर गंधकाची एक सनकाडी कुणींतरी लावली, त्याबरोबर पिवळट प्रकाश सगळीकडे पडला. कोपऱ्यांत उभी राहिलेली लालन लुतुफखानाच्या नजरेस पडली. त्यानें धांवत जाऊनच तिला कवटाळून धरलें व तो म्हणाला, " प्यारी, घाबरूं नको. खुदाच्या मेहेरनजरेनें आपली पुन्हा गांठ पडली आहे. आतां मी प्राण गेला तरी तुला सोडणार नाहीं. "

लालन एकसारखी स्फुंदत होती. त्या मुसलमानांशीं ओढाताण करण्या-

चेंहि अवसान तिला राहिलें नाहीं. तिच्या तोंडावर त्यानें एक जाड कापडाचा बुरखा टाकला व दोन्ही हातांनीं उचलून तिला मठाबाहेर आणली. त्यांच्या मागोमाग त्याची टोळी बाहेर पडली. नंतर कुंपणावरून डाव्या अंगाला एक मोठा ओढा होता त्याच्या उतरणीवरून पळूं लागली. लुतुफखान पांचदहा पावलें जातो न जातो तोंच ठेंचकाळून खालीं पडला. लालन व लुतुफखान उतरणीवरून घसरत खालीं चालली व त्यांच्या पुढच्या माणसास धक्का दिला. तो बिरबल जाट होता. तो दगाबाज जाट म्हणाला, " आतां गलबला न करतां मुकाट्यानें चला." " बिरबल, तूं आम्हांला कोणत्या बाजूला आणलें आहेस ? आपण कोठें आहोंत ? येथें तर सर्व दरडच दिसत आहे. " बिरबल म्हणाला, " खानसाहेब, आपण इब्राहीमखान गारदीच्या चौकीजवळ आहोंत. येथें फार हुशारीनें राहा. बंदुकांचे पेटलेले तोंडेहि झांकून घ्या."

जाटाची ही इशारत ऐकतांच लुतुफखान व त्याचे लोक मोठ्या सावधगिरीनें ओढयाच्या नालींतून रांगत व दबत दबत चालले. ते विशेष दूर गेले नाहींत तोंच ओढयाच्या वरच्या बाजूला मठाकडून " अहो गारदी, अहो चौकीदार, आम्हांला मारलें, आमच्या मुलीला घेऊन चालले हो हे दुष्ट ! यांच्यावर गोळ्या झाडा." असा पुकारा त्यांच्या कानीं पडला. मोहनप्यारी बेशुद्ध पडली होती. ती शुद्धीवर येतांच इब्राहीमखानाच्या चौकीकडे जातां जातां तिनें केलेला तो आरडाओरडा ऐकतांच गारदी चौकीदारांनीं पडघम व बिगुल वाजविलें. लुतुफखानानें जाटाला हळूच विचारलें, " मठांतून यावेळीं कोण आरोळ्या टोकीत आहे रे ? " बिरबल जाट दांतओठ खात म्हणाला, " ती थेरडी, तिच्याच या आरोळ्या. ती ठार झाली असेल असें मी समजलों. जिवंत आहे असें कळतें तर तिला तेव्हांच उडविलें असतें." याप्रमाणें हळू हळू बोलत ते चालले होते तों नालीच्या वरच्या बाजूस ओढयांतूनच " अंधारांतून कोण चालले आहे ? " असें एकानें पुकारलें. सवालाला जबाब मिळाला नाहीं. म्हणून तो पुन्हां ठांसून म्हणाला, " बदमाप ! जबाब कां देत नाहीं ? " लुतुफखानाला त्याच्या त्या शिवीचा राग आला. " हा बघ कोण बदमाप तो. तुझ्या छातीवर पाय देऊन जात आहे." असें उत्तर मिळाल्याबरोबर सवाल करणारानें एकदम बंदूक झाडली.

त्याचा फक्‌कन् जाळ झाला. परंतु गारद्याची गोळी ओढ्याच्या पलीकडील चढणींत घुसली. अंधारांतच बार झाल्याबरोबर लुतुफखानाच्या अफगाणांची आंधळी कोशिंबीर सुरू झाली. गारद्यांच्या गोळीला प्रत्युत्तर मिळालें. पुन्हां एकदां तंबूर झडला, बिगुल वाजले. "हे पाहा चालले आहेत, धरा त्यांना!" असा आवाज त्यांच्या कानीं आला. तो आवाज मोहनप्यारीचा होता!

गारदी इतक्या जवळ येऊन ठेपतांच अफगाणांनीं लपत लपत जाण्याचें सोडून दिलें व ते ओढ्याच्या नालींतून शिकार संभाळून जलदीनें पुढें निघाले. ते कोणीकडे जात आहेत व किती लोक आहेत याचा अंदाज गारदी लोकांना लागेना. सुमारें दोनशें कदम पाठलाग करून ते थबकले व सर्व लोक एका रांगेंत उभे राहिले. त्यांनीं अफगाण लोकांवर गोळ्यांची श्रावणझड चालविली. नाल्याजवळील जमीन उंचसखल होती. म्हणूनच केवळ लुतुफखानाचा निभाव लागला. त्याचे लोकहि मधून मधून गोळ्यांची परत-भेट पाठवीत. परंतु त्यांनीं आपला पळण्याचा उपक्रम मात्र सोडला नाहीं. गारद्यांच्या चौकीकडील धामधूम पाहून मराठ्यांच्या छावणींत गडबड उडाली. ती गडबडहि अफगाणस्वारांच्या कानांवर आली. आणखी थोडें पुढें गेल्या-वर लुतुफखानानें लालनला झमरूडच्या स्वाधीन केलें. तो तिच्या कमरेला विळखा देऊन तिला ओढीत फरफटत नेत होता. बिरबल या प्रांतांत चांगलाच वावरला असल्यामुळें त्याला सर्व वाटा माहीत होत्या, म्हणून तो सर्वांच्या पुढें चालला होता. ती सर्व मंडळी दुसऱ्या मैदानांतून बेधडक आपल्या छावणीकडे निघाली व रणस्तंभ ओलांडून पलीकडे गेली. आसपास मराठे स्वारांच्या टोळ्या फिरत असतील या शंकेनें ते वेडींवांकडीं वळणें घेत निघाले होते. इतक्यांत त्यांच्या पिछाडीस घोडेस्वारांची एक टोळी दौडीनें आली. अफगाणांना लपून बसण्यासहि सवड मिळाली नाहीं. लुतुफखानानें आपल्या लोकांस भुईसपाट आडवे होण्याची इशारत केली. लालनलाहि तसेंच पडा-वयास लाविलें. मराठेस्वारांची टोळी मोठ्या ऐटींत तुर्की चालीवर चालली होती. तिच्या झिलिनीला निशाणें होतीं व शिपायांच्या खांद्यांवर भाले होते. घोड्यांच्या पाठींवरील डुऱ्या व खोगिरेंहि मृदु सामानाचीं केलीं

होतीं. तरवारी मांडीखालीं दाबून धरल्या होत्या. एकंदरींत त्यांचा कलकलाट खडखडाट होऊं नये याविषयीं त्यांनीं पूर्ण खबरदारी घेतली होती.

हे स्वार पुढें निघून गेल्यावर लुतुफखान हळूच बिरबलला म्हणाला, "हे स्वार कोणीकडे जात असतील बरें?" यावर कोणीतरी कांहीं उत्तरें दिल्यावर लुतुफखानाच्या मनांत आलें, परवांच गोविंदपंत बुंदेले व त्यांची फौज यांची अताईखानानें कत्तल केली, त्याचा सूड घेण्यास तर हे लोक चालले नसतील ना?

लुतुफखान असा विचार करीत असतांनाच बिरबल जाट जमिनीला कान लावून पडला होता, तो चटदिशीं उठून उभा राहिला आणि म्हणाला, "आतां येथें रेंगाळण्यांत कांहीं अर्थ नाहीं. चारी बाजूंनीं स्वारांची खूण लागली आहे. आतां सर्व दम पायांत आणून आपणांस पळालें पाहिजे.

बिरबल धोपट रस्ता सोडून आडमार्गानें धांवूंलागतांच त्याच्या मागोमाग सर्व जण पळूं लागले. परंतु त्या रस्त्यानेंहि त्यांना पळतां येईना. तिकडूनहि मराठ्यांची एक दौड येत होती. या खेपेलाहि त्यांनीं पुन्हां जमिनीवर लोळण घेतली, परंतु ती युक्ति या खेपेस उपयोगी पडली नाहीं. लालन पहिल्या वेळेस गुपचूप पडून राहिली होती, तशीच ती आतांहि पडून राहील अशी झमरूडची कल्पना होती, म्हणून तो बेसावध राहिला. समोरून येणारी दौड मराठ्यांची आहे अशी लालनची खात्री होतांच त्यांच्याकडून साहाय्य मिळावें म्हणून तिनें एक किंकाळी फोडली. एका मराठा राउताला तिचें ओरडणें ऐकूं गेलें. तो थबकून उभा राहिला व म्हणाला, "इन्नी भन्! भिवचा? या अशा अंधाऱ्या रात्रीं कोणी बोंब ठोकली हो?" खांद्यावरचा भाला सरसावून तो पुढें झाला तों त्याला आडवे पडलेले अफगाण लोक दिसले. त्यानें लगबगीनें घोडी आवरून धरली व भाल्याचा हात उगारला. लालननें आरोळी ठोकून आलेल्या स्वारास सावध राहा असा इषारा केला. त्याबरोबर झमरूडनें तिच्या एक श्रीमुखांत ठेवून दिली. त्या वेदना तिला सहन होईनात म्हणून तिनें पुन्हां एकदां किंकाळी ठोकली.

लुतुफखान दांतओठ खाऊन जमिनीवर गुडघा टेकून उभा राहिला व कमरेचें पिस्तूल काढून त्यानें तें मराठा राउतावर झाडलें. पिस्तुलाच्या

गोळीनें त्या राउताची घोडी जखमी झाली व तो स्वार खालीं आपटला. त्याबरोबर "हाणा, मारा त्या × × × चोरांना!" असा त्या स्वारानें कलकलाट केला.

या वेळेसहि बिरबल जाटानें अफगाणांच्या टोळीस ओढ्याच्या आश्रयाला नेऊन वांचविलें. लुतुफखान व झमरूड या दोघांनीं मिळून लालनला उचलून नेलें तरी ती झगडत व ओरडतच होती. त्यांनीं तिला बरोबर घेऊन नाल्यांत उड्या टाकल्या. कसेबसे पलीकडील किनाऱ्याला जाऊन ते पोंचले. काळोखामुळें मराठा स्वारांना ओढ्याची दरड दिसली नव्हती. त्यामुळें ते तेथें येऊन पोंचतांच थबकले.

लुतुफखान आणि त्याची अफगाण टोळी चारी बाजूंनीं वेढली गेली त्या वेळीं झमरूडच्या मनांत आलें, या काफीर औरतेमुळेंच आपल्यास वेढा पडला आहे. हिलाच खतम् केलें तर आपल्यावरचें संकट टळेल; म्हणून तो तिला मारण्यासाठीं तिच्या अंगावर धावून गेला. इतक्यांत लुतुफखानानें त्याला आवरलें. थोड्या वेळानंतर त्यांना एक दुराणी टोळी आलेली दिसली, याबरोबर सर्वांनाच हायसें झालें.

मराठे व दुराणी यांची गांठ पडतांच 'हर हर महादेव', 'दीन दीन', 'अल्ला हो अकबर' असा जयघोष वातावरणांत दुमदुमूं लागला व लढाई निकरानें चालू झाली.

• • •

## प्रकरण ८ वें :

लालनला पळवून नेत असतांना लुतुफखानाला ज्या मराठ्यांच्या टोळ्या भेटल्या होत्या, त्या शिंद्यांच्या होत्या. सरदार अताईखान, शहाचा दिवाण शहावलीखानाचा पराक्रमी मुलगा, दुराणी छावणीभोंवतीं रोज रात्रीं गस्त घालीत असे. त्याला चुकवून आडरस्त्यानें जाऊन दुराणीच्या छावणीवर हल्ला करावा म्हणून मल्हारराव होळकर आपले भालाईत स्वार बरोबर घेऊन त्या रात्रीं निघाले होते. अताईखानाच्या फौजेला एकाएकीं चारी बाजूंनीं

घेरा घालून त्याला अडवावें व गस्तीचें काम बंद पडावें म्हणून शिंदेहि आपले स्वार घेऊन त्यांच्या मदतीला बाहेर पडले होते.

लुतुफखान जेमतेम आपल्या छावणींत जाऊन पोंचला. लालनच्या अंगावर पायघोळ डगला घालून त्यानें तिला झाकून टाकलें होतें आणि लुतुफखानाच्या तंबूवर नेऊन तिला आंतील खोलींत कोंडून ठेविली तरी ती गोष्ट कोणाच्या लक्षांत आली नाहीं.

लालनला लुतुफखानाचा अत्यंत राग आला होता. लुतुफखानानें तिच्यावर पहारा करण्यासाठीं झमरूडच्या मदतीस आणखी दोन ताजीक गुलाम व एक दासीहि दिली होती. तिचे हातपाय जरी मोकळे होते तरी तिच्यावर सक्त पहारा असल्यामुळें ती परतंत्र होऊन पडली होती. आपली सुटका करून घेण्यास तिला रडणें—ओरडणें याशिवाय तिसरें साधनच नव्हतें. तिचें मन दुःखी होण्याला आणखी एक प्रबळ कारण होतें. ज्या पुरुषावर तिचें मन बसलें होतें तो पुरुष पुन्हां दृष्टीस पडता तर तिला तें एक आनंदपर्वच वाटलें असतें. तो कोणी सामान्य मनुष्य नसून एक मोठा सरदार आहे असें कळल्यानें तिला संतोष होऊन आपल्या दैवाचें भूषण वाटत होतें. शहानें तिला नुकतेंच अफगाणांच्या कांचांतून मुक्त केलें होतें, त्याच लोकांनीं तिला पुन्हां कैदेंत नेऊन टाकिलें. निदान त्या सरदाराची व मोहनप्यारीची गांठ पडून माझी हकीकत त्यास कळली तर तो मला बंधमुक्त केल्याशिवाय राहणार नाहीं असें तिला वाटलें. पण असें घडणें जरा अशक्यच; साहाय्य उशीरा येऊन पोंचलें तर काय उपयोग? तें वरातीमागून आलेलें घोडेंच व्हायचें!

असे विचारतरंग तिच्या मनांत एकामागून एक उठूं लागले. ती ह्या कुशीवरून त्या कुशीवर चुळबुळ करीत पडली होती. जमिनीवर कान ठेवून ती निश्चित पडली असतां कानांत कांहींतरी गुणगुणूं लागलें. क्षणा दो क्षणांत पाण्याच्या लोंढ्यासारखा घों घों आवाज होऊं लागला. हा काय चमत्कार असावा म्हणून तिनें डोळे उघडले तों आवाज बंद झाला. तिनें पुन्हा आपलें डोकें जमिनीवर टेकलें तों ती गुणगुण पुन्हां जोरानें चालू झाली. त्या गुणगुणींचा तर आतां खाड् खाड् असा आवाज येऊं लागला. या सर्व चेष्टांचा अर्थ तिच्या हळूहळू ध्यानांत येऊं लागला. त्याबरोबर चित्त उल्लसित

झालें. मराठे लोकांची दौड दुराणी छावणीपर्यंत आली असेल असें तिला वाटलें. आपल्याप्रमाणेंच हे आवाज आपल्यावर रखवाली करणाऱ्या झमरूड व त्याचे साथीदार यांनीं ऐकले असतील कीं काय म्हणून ती मान वर करून पाहूं लागली. झमरूड कांहीं हालचाल न करतां तिच्याकडे पाहात बसलेला आढळला. दोन नोकरहि एका तंबूच्या दाराजवळ व दुसरा हुक्का ओढीत पडला होता.

छावणींतहि कांहीं गडबड किंवा हालचाल दिसेना. दुराण्यांचा कांहीं डाव असून मराठे स्वारांना फसविण्यासाठीं कांहीं कपट तर केलें नसेल ना? कीं मराठी फौजेचे सेनापति महादजी शिंदे यांच्या हातून शत्रूचा नाश व्हावा असा विधीचा उद्देश असेल? असे नाना तऱ्हेचे विचार लालनच्या मनांत येत होते. इतक्यांत "बांग! बांग! या अल्ला! या खुदा! या तोबा!" "दीन दीन," "हर हर महादेव" अशा गंभीर गर्जना तिच्या कानांवर पडल्या. बंदुकीचे बार, रणगर्जना, आरोळ्या व जखमी लोकांचें विव्हळणें या सर्वांचा एकच कल्लोळ उडाला. सर्व गर्जना भोंवऱ्याप्रमाणें गिरक्या घेत घेत नाहींशा होत तोंच दुसरी त्यापेक्षां जास्त तीव्र लाट येई. या प्रचंड नादांच्या गडबडींत लालनचे विचार कोणीकडच्या कोणीकडे नाहींसे झाले.

झमरूड ही सर्व गडबड ऐकून सोडगा घेऊन तंबूच्या दाराशीं धांवत गेला व गुलाम अफूच्या कैफींत पडले होते त्यांना हालवून जागें करूं लागला व आरडाओरड करीत म्हणाला, "अरे! दोस्तमहंमद कोठें गेला? तो बिरबल जाठहि कोठें पळाला? कोणीतरी शहाच्या तंबूवर लतुफखान गेला आहे त्याला जाऊन कळवा, चला! 'दीन दीन' म्हणत बाहेर पडा."

शिद्दी झमरूडची ही गडबड ऐकतांच लालन भयभीत झाली. तिनें ताडलें कीं, आतां हातघाईची लढाई होणार. तिच्या तंबूच्या बाहेर घोडेस्वारांची गर्दी झाली व कनाथीवर तलवारींचे व भाल्यांचे घाव बसूं लागले. झमरूड दाराबाहेर डोकावून पुन्हां आंत शिरला व खांबाला एक बंदूक लटकत होती ती त्यानें हातीं घेतली. नंतर कंबरेला लावलेल्या सुऱ्यानें खालपासून वरपर्यंत तंबूची कनाथ उभी चिरली. लालनजवळ जाऊन तिचे हातपाय बांधले व तिची बांधलेली मोळी खांद्यावर टाकून तो निघाला. कनाथीपर्यंत जातो न जातो तोंच 'हर हर महादेव' असा सिंहनाद झाला. एक मराठा स्वार घोड्या-

वरून उडी टाकून आंत शिरला. त्याच्या अंगांत युद्धाचा मद पूर्णपणें चढला होता. डोळे लाल झाले असून बुबुळें गोल फिरवीत तो हातांतील धू (तरवार) परजीतच चालला होता. त्याच्या अंगरख्यावर व पायजम्यावर रक्ताचा शिडकाव उडाला होता. आपल्याकडे एक काळवीट शिद्दी धूड येत आहे असें पाहतांच तो ओरडून म्हणाला, "अरे रांडलेका! उभा राहा, जातोस कोणीकडे? अरे गायमाऱ्या खाटका! हा बघ मी आलोंच तुझा समाचार घ्यायला."

झमरूड थबकून ओरडला, "अरे जाफर, या काफिरास मी या औरतीला बाहेर नेईपर्यंत अडकवून ठेव, आंत सोडलेस तर तुझें व माझें मुंडकें जागेवर राहणार नाहीं."

जाफर मराठा स्वारास आडवा झाला. परंतु मराठ्याचा आवेश पाहून तो घाबरून गेला व त्याला तरवार उगारावयाचेंहि भान राहिलें नाहीं. मराठ्यानें त्याला एका घावांतच जमीनदोस्त केलें. झमरूडनें हा प्रकार पाहिल्यावर लालनला जमिनीवर टाकून देऊन आपला जंबिया उपसून मराठ्याच्या अंगावर धावून गेला. एवढा वेळ लालनला रखवालीस ठेवलेली दासी बेभान होऊन पडली होती. ती शुद्धीवर आली व मराठा स्वाराचे पाय धरीत जिवाची भिक्षा मागूं लागली. मराठा स्वार तिचा अडथळा दूर करून पुढें सरसावतो तोंच झमरूडला वाटलें आतां आपली सुटका नाहीं तर आपण मरण्यापूर्वीं हिलाहि मारून टाकावी म्हणून लालनवर जंबिया उगारणार तोंच मराठ्यानें त्याचा जंबिया दूर उडवून दिला. झमरूड जिवाच्या भीतीनें पळून गेला. लालन मात्र मूर्च्छा येऊन पडली. मराठा स्वार तरवार खालीं टेकून तिच्याकडे निरखून पाहूं लागला आणि म्हणाला, "अरे पंढरीनाथा, विठोबा! ही पोरगी तर माझ्या ओळखीची दिसते. हिलाच मी रणखांबापासून मठापर्यंत पोंचविलें. ही कोण कोणाची? ही नोडग्यांच्या तावडींत कशी सांपडली?"

लालन जरा वेळानें शुद्धीवर येऊन डोळे उघडून पाहूं लागली. तिलाहि समोरचा गृहस्थ ओळखीचा वाटला. ज्यानें आपल्याला मठांत नेऊन सोडलें तोच हा गृहस्थ असल्याची तिची खात्री पटली. त्यानेंहि तिला पोटच्या पोराप्रमाणें पोटाशीं कवटाळून धरलें. लालन म्हणाली, "अरे भगवान्! राव-

साहेब ! तुम्ही कसे इकडे आलां ? या दीन अबलेचें गाऱ्हाणें भगवंतानें ऐकलें म्हणावयानें ! ''

एक स्वार म्हणाला, " अरे ! यांच्या तर जुन्या ओळखी निघाल्या. महिपतराव, काय भानगड आहे ? '' महिपतराव म्हणाले, " पोरी, तूं पुन्हां या दुराण्यांच्या छावणींत कशी आलीस ? " लालन म्हणाली, " तो मेला चांडाळ जाठ ! त्याचेंच हें सारें कृत्य. "

" अरे मादरचोदा ! अरे थेरड्या ! त्याच वेळेस मला तुझा पक्का वहीम आला होता. तुझी गांठ तर पडूं दे. म्हणजे माझें बोलणें खरें करून दाखवितो. आतां येथें बसण्यास अवकाश नाहीं. ही चौकी आमच्या स्वाधीन आहे तोंच तूं येथून चालती हो. क्षणभरसुद्धां येथें थांबूं नको. "

असल्या दंग्यांतून बाहेर पडणें लालनला कठीण वाटलें. या वेळेस कोणाची तरी मदत व्हावी म्हणून ती महिपतरावांना म्हणाली, " तुमच्यावरचा मुख्य सरदार कोण आहे ? तुमच्या लष्करांतील महादजी शिंदे हल्लीं कोठें आहेत ? "

" बाई, महादजी बाहेर अताईखानाशीं लढण्यांत गुंतले आहेत. आमचे धनी तेच. त्यांना तू ओळखतेस ? त्यांच्याकडे तुझें काय काम आहे ? "

" तुमच्या धन्याशीं माझें फार जरुरीचें काम आहे. त्यासाठींच तर मी सारा देश धुंडाळीत इकडे आलें आहें. त्यामुळेंच तर हें संकट माझ्यावर कोसळलें आहे. "

" तुझ्यासारख्या कंगाल पोरीचें काम आमच्या सरदाराशीं ? हें काय गौडबंगाल आहे ? यांतून कांहीं भलतंच पिलूं बाहेर न पडो म्हणजे मिळविली. " असें म्हणून त्यानें आपल्या हाताखालच्या एका स्वारास हांक मारून तो म्हणाला, " अरे सदोबा, ही सटवाई काय म्हणत आहे बघ. हिला थेट आपल्या लष्करांत नेऊन सोड. मग तिचें काम ती जाणे आणि ते धनीसाहेब जाणे. "

सदोबा तिला घेऊन आपल्या छावणीकडे परत फिरला.

लालन लुतुफखानाच्या चौकींतून बाहेर पडली त्या वेळीं फटफटीत उजाडलें होतें. सदोबाचा चांगला पांचाली अवलादीचा मजबूत घोडा होता. तीं उभयतां धक्केचेपटे खात गर्दीतून बाहेर पडलीं. एक वेळ त्या दोघांवर

मरणाचीच पाळी आली होती. एका बुरुजावरून एक गोळी सूं सूं करीत आली ती केवळ एक वितीच्या अंतरानें गेली. सदोबानें चपळाई करून लगाम खेचून घोड्याला टांच मारली. असें प्रोत्साहन मिळाल्यावर घोडा चांगल्या वेगानें निघाला तो छावणीपासून पांचसहाशें कदमांचें अंतर पडेपर्यंत गेला. तेथें उभा राहून त्यानें चोहोंकडे नजर फेकली व आतां पुढें काय करावें याचा विचार करूं लागला. इतक्यांत त्याच्या कंबरेस अतिशय ओढ लागली. लालननें त्याच्या कमरेस हाताचा वेढा दिला होता तो ढिला पडला. ही असें कां बरें करीत आहे? का इच्या जिवाला कांहीं अपाय झाला आहे अशी त्याला भीति वाटली. पण वास्तविक कांहीं तसा प्रकार नव्हता. दोन रात्रीं आलोचन जागरणें झाल्यामुळें लालन थकून व भिऊन गेली होती. यामुळें घोड्यावरून तिच्या झोकांड्या जात होत्या. लालन चांगली जागी होऊन तिनें सदोबाच्या गळ्याला मिठी मारली. याप्रमाणें कांहीं वेळ त्यांनीं मजल रेटली. त्यांच्या अंगावर सूर्यप्रकाश पडला होता. त्यावरून दिवस किती चढला आहे व आपण कोणत्या दिशेला जात आहों याचें त्यांना भान झालें. दिशाभूल होऊं नये म्हणून तो आपला घोडा वारंवार थांबवीत असे. जरा वेळानें त्यानें कानोसा घेतला तेव्हां नगारखाना झडत आहे असें त्याला ऐकूं आलें. तो लालनला म्हणाला, — " पोरी, हा आमच्या छावणीचा चौघडा आहे खचित. मी जरा पुढें जाऊन कोण लोक आहेत तें पाहून येतों. " तो परत आल्यावर म्हणाला, " ते स्वार शिंद्यांचेच आहेत. " थोडें पुढें गेल्यावर शिंद्यांकडील स्वारांच्या दोन रांगा उभ्या असलेल्या त्यांना दिसल्या. दुसरीकडे समशेरबहादर व विंचूरकर यांचे स्वार रांगा धरून उभे होते. शिंदे-होळकरांनीं अताईखानावर हल्ला चढविला. त्याची पिछाडी संभाळावयाची कामगिरी त्यांनीं बजाविली होती. होळकरांचे स्वार दुराणीच्या छावणींतून परत येत असतांना त्यांचा पाठलाग झाला तर तो मोडून काढण्यासाठीं ते उभे होते.

सदोबा व लालन यांनीं आपला घोडा जलद चालवून मराठी फौज जवळ केली. जंगलांत साळुंक्यांनीं आपलीं अंगें थरारलीं म्हणजे त्यांचे पिसारे पिंजरतात तसे भालाइत स्वारांचे भाले जिकडे तिकडे चमकत होते. प्रत्येक सरदाराच्या उजव्या बाजूला निशाणवाला व डाव्या बाजूला डंकेवाला चालला

होता. निशाणांचे दुटोपी भरजरी फरारे पांकोळीच्या शेपटासारखे हालत होते. त्याशिवाय रामदासी किरमिजी भगवी फडका फडकत होता. कवायती शिपायांप्रमाणें—चित्राप्रमाणें ते कधींच स्तब्ध उभे राहात नव्हते. त्याची सारखी चळवळ चालू असायची. शिस्त एवढीच कीं, फौजेचे सरदार निशाण धरणाराला ओरडून, खुणा करून सूचना देत त्याप्रमाणें सैन्याची हालचाल होत असे. डंका निशाणावरून फौजेला चालण्याची किंवा थांब-ण्याची सूचना होत असे. हे रणपटावरील खेळ व चमत्कार सदोबाच्या अंगवळणीं पडले होते. लालनला मात्र हे सर्व प्रकार नवे असल्यामुळें ती कुतुहलानें पाहात होती.

● ● ●

## प्रकरण ९ वें :

सदोबा व लालन चाललीं असतांनाच त्यांच्यासमोरून एक स्वारांची टोळी चालली होती, त्यांच्याकडे बोट करून सदोबा लालनला म्हणाला, " हे बघ आमचे सरदार जनकोजीबाबा शिंदे. त्यांच्या मागून चालले आहेत ते महादजीबाबा. आमच्या धन्याची तुला भेट घ्यावयाची आहे ना ? तसें सांग म्हणजे मी घोडा जलदीनें पुढें काढतों. " लालनला महादजींच्या दर्शनाची फारच उत्कंठा लागली होती. त्यांची एकदां नजरभेट तरी होऊं दे असें तिला झालें होतें. छाती दडपून गेल्यामुळें तिच्याच्यानें कांहीं बोलवेचना. तरी " शिलेदारसाहेब, कसेंहि करून त्यांची व माझी गांठ घालून द्या. " असें हळूच मोठ्या कष्टानें म्हणाली. हिला महादजीबाबांची भेट कांहीं खाजगी कारणाकरितां घ्यावयाची असेल, तर ही वेळ व जागा योग्य नाहीं. बरें ती कांहीं राजकारणी निरोप घेऊन आली असेल तर भेट घेऊं देण्यासहि हरकत नाहीं असें त्याला वाटलें. शिंदे उभे राहिले होते तिकडच्या रस्त्यानें तिला घेऊन जाण्यासहि कांहीं अडचण नव्हती. महादजीबाबांची व तिची भेट झाल्यानंतर काय करावयाचें किंवा कसें बोलावयाचें याचा विचार तिचा ती करील असें मनांत आणून घोड्याच्या पाठीवर दोघांचा बोजा होता तरी

त्यानें तें जलद चालविलें. परंतु महादजीबाबांच्याजवळ जाईपावेतों लढाईचें स्वरूप पालटलें. शिंद्यांचे डंके जोरानें वाजूं लागले, निशाणें डावीकडे वळलीं व शिंदे मोठ्या वेगानें अताईखानावर चालून गेले. समशेरबहाद्दर व विंचूरकर यांच्या फौजांनींहि शिंद्यांप्रमाणेंच जयघोष केला. परंतु दुराणीच्या फौजेचा भरणा वाढूं लागला. महादजी व जनकोजी मागें सरले. अताईखान फिरून पुढें सरला. परंतु त्यानेंहि मराठ्यांच्या फौजेवर हल्ला चढविला नाहीं. अताईखान शिंद्यांच्या फौजेच्या मागें लागला, परतणारी मराठी फौज कापून काढण्याचा त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं. शिंदे छावणीकडे जाण्यासाठीं मागें वळले त्याच संधीस सदोबाची व त्याच्या फौजेची समोरासमोर गांठ पडली. शिंदे रणखांबाच्या उजवीकडून व सदोबा डावीकडून येत होते. फौजेच्या मागच्या अंगाला जरीपटका दृष्टीस पडला, त्याच्याबरोबर घोड्यावरचे डंके चालले होते. त्यांना भरजरी गलेफ चढविले असून ते जोरानें तुडुम् तुडुम् वाजत होते. त्याच्याभोंवतीं कांहीं जिवास जीव देणारे कडवे शिपाई चालत होते. अशा थाटानें शिंदे आपल्या छावणींत परत येत होते.

महादजीबाबांची घोडी अस्सल काठेवाडी होती. ती या वेळीं घामानें थबथबलेली होती. तिचे हरणासारखे नाजूक, बारीक, चपळ पाय गुडघ्यापर्यंत चिखलानें व धुळीनें भरले होते. तिनें तिच्या तोंडाचा सगळा तोल लगामीवर धरला होता. रात्रभराच्या श्रमानें ती दमली होती. तरी तिचीं पावलें मोठ्या झोंकांत पडत होतीं. तिचे डोळेहि माणकासारखे लाल झाले होते. महादजींच्या पगडीच्या कांहीं कंगण्या विसकटल्या होत्या. त्यांचा पोशाखहि कांहीं ठिकाणीं फाटला होता. उन्हाची तिरीप व धुरळ्यापासून निवारण करण्यासाठीं हनुवटीखालून डोईवर पांढरा धाटा बांधला होता, त्याचें डोळ्यांखेरीज सर्व तोंड झांकून गेलें होतें. याच चमकदार नेत्रांच्या जादूचा मंत्र टाकून पहिल्याच भेटींत बिचाऱ्या लालनला त्यांनीं मारून टाकलें होतें.

महादजी दृष्टीस पडतांच सदोबाच्या मानेभोंवतालचे दोनहि हात सोडून ते पुढें करीत लालन म्हणाली, "सरकार ! धनीसाहेब, या पायांसाठीं मीं अनंत यातना सोसल्या. हजारों संकटें भोगलीं तरी त्यांना जुमानलें नाहीं. खानदेशांत तापी नदीवर एक दिवस आपणांस तहान लागली असतांना

पाणी देऊन आपली तहान शमविली होती. त्याची आठवण करा. त्या वेळेस जातांना आपण म्हणालां होतां कीं, " कुत्रीसारखी माझ्यामागें माझा शोध काढीत येशील. आतां माझी तशीच अवस्था होऊन मीं आलें आहें. माझा अंगीकार न कराल तर मी येथेंच प्राण देणार. "

फुलबाजीवर ठिणगी पडल्यावर त्यांतून टपटप फुलें गळतात, त्याप्रमाणें महादजींच्या आरक्त नेत्रांचे कटाक्ष लालनवर पडतांच तिचींहि वाग्पुष्पें टपटप हलूं लागलीं. सदोबा तर चकितच होऊन गेला.

महादजींनीं मान वर करून दोघांनाहि निरखून पाहिलें. लालनला पाहतांच तिची त्यांना किंचित् खूणहि पटली.

याच वेळेस अफगाण टोळींतून एक स्वार निघून शिंद्यांच्या फौजेकडे तीरासारखा निघाला. त्याचा अमीरी पोशाख, तुर्की घोडा व एकंदर सर्व जामानिमा मोठा मौल्यवान दिसला. हातांतील फरश डोक्यावर गरगर फिरवीत तो आरोळ्या टोकीतच जवळ येत होता. हा पुरुष रणस्तंभाजवळ द्वंद्वयुद्ध करण्याच्या इराद्यानेंच निघाला आहे असें दोन्हीकडील सैनिकांना वाटलें. अर्थात् लालन व सदोबा यांना प्रश्न विचारण्याचें सोडून देऊन महादजी त्या स्वाराकडे पाहात जागचे जागीं स्तब्ध उभे राहिले.

सुमारें पंधरा कदमांवर येतांच त्यानें आपला घोडा आखडून धरून उभा केला व म्हणाला, " ए काफर, तुमच्यापैकीं कोणत्या सरदारानें आमच्या बादशहाकडे द्वंद्वयुद्धाची मागणी केली होती ? हा शिक्कामोर्तब कोणाचा आहे ? "

महादजी त्याजकडे पाहात म्हणाले, " तुझ्या शहाबरोबर युद्ध करण्याची आमची योग्यता आहे कीं नाहीं याची खात्री करून घे. हा शिक्का महादजी शिंद्यांचा आहे आणि तोच तुझ्यापुढें छातीला हात लावून उभा आहे. "

" मीहि एक खानदान कुलांतील आहें. ज्या कुलांत शहाचा जन्म झाला आहे त्याचीच एक शाखा आमचें कूळ आहे. मर्जी असल्यास तुझ्याबरोबर दोन हात करण्यास मी तयार आहें. मला लुतुफखान म्हणतात. "

" चला तर मग ! होऊन जाऊं द्या चार हात ! " असें म्हणून महादजींनीं आपली अंगठी परत घेतली व दोघेहि द्वंद्व युद्धास तयार झाले.

बराच वेळ त्या दोघांचें द्वंद्वयुद्ध चाललें होतें. शेवटीं महादजी शिंदे आपल्या प्रतिस्पर्ध्याचा पाडाव करून माघारे फिरले तेव्हां लालनचें अंतःकरण प्रेमातिशयानें ओथंबून गेलें. फौजेच्या तुकडीबरोबर सदोबा व त्यांचा घोडाहि निघाला. लालन वरचेवर मान उंच करून घोड्यावरूनच मागें वळून पाहात होती. महादजींनीं बिजलीचा लगाम खेंचून तिला सदोबा व लालन यांच्या घोड्याकडे रेहचाल चालीवर चालविलें व त्यांच्या नजीक येतांच " तुम्ही कोण ? कोठें जात आहां ? तुमच्याबरोबर बाईमाणूस कोण आहे ? " म्हणून प्रश्न केला. सदोबानें वांकून दोन्ही हातांनीं अदबीनें मुजरा केला व सांगितलें, " मी महिपतराव दफेदाराच्या पागेंतला शिलेदार असून महिपतरावांनींच मला या बाईला आपल्या छावणींत घेऊन जाण्याचा हुकूम केला आहे. तिचें आपणांशी कांहीं जरुरीचें काम आहे असें ती म्हणत आहे."

" अरे बापरे ! असल्या पोरीचें काम मजपाशीं ? कसलें काम असेल ? हां आठवलें. रणस्तंभाजवळ त्या विलायत्यांनीं एका हिंदु औरतला आपल्या स्वाधीन केलें तीच ही दिसते. काय ग, ए पोरी तूं कोण ? तुझें मजपाशीं काय काम आहे ? "

प्रत्यक्ष भेट होईपर्यंत तिनें मोठ्या धैर्यानें व दृढ निश्चयानें महादजी शिंद्यांचा शोध चालविला होता. त्या धैर्याच्या जोरावर जिनें इतके दिवस काढले तिला महादजी शिंद्यांशीं प्रत्यक्ष बोलण्याची वेळ आल्याबरोबर तिची जीभ जणूं कांहीं टाळ्यालाच चिकटून बसली. ती अगदीं हताश झाल्यासारखी दिसूं लागली. तिला वाटूं लागलें, ' तो केवळ श्रीमंत सरदार ! शिकार करीत एकटाच रानावनांत हिंडतांना पाणी पिण्यासाठीं आपल्या मठापाशीं आला आणि त्यावर मोहित होऊन आपण त्याच्या पाठीस लागलों काय ! '

तिची भीति ओळखून शिंदे हांसून म्हणाले, " मुली, भिऊं नको. तुझें काय काम असेल तें निःशंक बोल. "

महादजींनीं असें म्हणतांच लालननें आपल्या तोंडावरील हात दूर केला व अडखळत अडखळत म्हणाली, " माझा आपल्याला इतका कसा विसर पडला ? शिकार करून आल्यावर मठाजवळ आपण पाणी प्यालां आणि जातांना म्हणालां, माझ्यामागें कुत्रीसारखी येशील आणि......"

तिनें जणूं कांहीं तें खुणेचेंच वाक्य उच्चारिलें. महादजींनीं मंदस्मित करून ओळख पटल्याचा संकेत केला, तेव्हां तिच्या तोंडावर टवटवी दिसली. महादजीहि मोठ्यानें हंसले. परंतु त्या हंसण्यांत तिरस्कार किंवा रागाचा लवलेशहि नव्हता. उलट प्रेमाचा मोकळेपणाच आढळला.

• • •

## प्रकरण १० वें :

महादजीबाबा जरा ओरडूनच म्हणाले, " अहो, दौलतराव, इकडे या जरा. " दौलतराव जवळ आल्यावर पुन्हां म्हणाले, " हें बघा कसलें प्रकरण आलें आहे. एकदां मी शिकार करतांना तहान लागली म्हणून हिच्या बापाच्या मठांत पाणी पिण्यास गेलों होतों. त्या वेळीं हिनें मला पाणी दिलेंन् त्याच-वेळीं माझ्यावर मोहित झाल्याचें मला दिसलें. म्हणून मीं तिला सहज गमतीनें म्हटलें, " मी तुझ्यावर जादू टाकतों. तूं माझ्या मागोमाग येशील. त्या दिवसापासून खरोखरच ही हिंडत हिंडत माझा पत्ता काढीत येथें आली आहे. भोळी बिचारी ! "

दौलतराव तिच्याकडे एकवार पाहून म्हणाले, " वस्तुलाभ बरा आहे. तुमच्या राणीवशांत शोभून दिसेल. "

एका अनोळखी माणसानें आपली वाखाणणी केलेली पाहून लालन लाजली. दौलतराव म्हणाले, " तुमच्यासारख्या सरदाराभोंवती अशा तरण्या-ताठ्या पोरी गोळा झाल्या तर नवल नाहीं. "

" पण मी कोण, कोठील, हें कांहींच माहीत नसतांना हिनें मला ओळखून काढलें कसें ? "

लालन म्हणाली, " सरकार! खरेंच, याच ठिकाणीं आपली नजरभेट झाली, आपलें नांव व दर्जा मला कालच कळला."

" मग काल कां नाहीं ओळख दाखविलीस ? "

" मी बरीच दूर होतें. आणि एकाएकी भाषण करण्याचा हिय्या होईना म्हणून गप्प बसलें."

" मग आतां आज कशी ओळख दिलीस ? "

" काल रात्रीं मजवर कोणतें संकट पडलें होतें! त्यांतून पार पडल्यावर मला आनंद झाला; त्याच्या भरांत आज मी भीड मर्यादा सोडून हिय्या केला आहे. "

" काल रात्रीं कोणतें संकट आलें होतें ? "

लालननें सर्व वृत्तान्त सांगितल्यावर महादजी म्हणाले, " मला हिचें मोठें नवल वाटतें. "

इतकें बोलणें होत आहे तों अताईखान नवीन कुमक घेऊन हल्ला करण्याच्या उद्देशानें येत होता, त्याच्याकडे सर्वांचें लक्ष गेलें. परंतु मराठी फौजेला त्याची मोठीशी दिक्कत वाटली नाहीं, म्हणून लालनकडे पाहून महादजी म्हणाले, " तुझी गोष्ट आम्हांला रस्त्यांत सांग, म्हणजे जरा गंमत वाटेल. "

लालननें आपली सर्व कहाणी प्रथम कांपत कांपत पण नंतर अगदीं संथपणानें सांगितली. तिच्यावर कोणकोणते प्रसंग आले, तिनें कोठें कोठें प्रवास केला याची हकीकत ऐकतांना महादजीबाबांच्या मनाला मधून मधून बरेच चटके बसत होते. तिचे नेत्र प्रेमाश्रूंनीं डबडबले होते व आपल्या प्रेमार्द्र दृष्टीनें तिनें महादजींचे पंचप्राण हरून घेतले होते. तिच्या चेहऱ्यावर अनुराग आणि अनुकंपा क्रीडत होती. त्याच्या योगानें त्यांची चित्तवृत्ति अपूर्व झाली. लालनसारखी अबला दृष्टीस पडल्यावर त्यांचें अंतःकरण अगदीं मऊ होऊन गेलें. तिला झिडकारून देण्यासारखा त्यांचा स्वभाव निष्ठुर नव्हता. तिच्याविषयीं पक्का निर्णय करण्यासारखी सध्याची वेळ नव्हती. परमेश्वरकृपेनें योग जमून आला आहे, तिचें आपल्यावर प्रेम आहे, तर अंगीकार करावा. उद्यांच्या युद्धप्रसंगानंतर आपलें काय होणार याचा भरंवसा नाहीं, असे विचारतरंग त्यांच्या मनांत उठून गेले.

९५५८२ ३०२३२८०
८१।८१२


अफगाण लोकांनीं मराठ्यांची पाठ सोडली नव्हती. अताईखानाला कुमक मिळाल्याबरोबर त्याची फौज मराठी फौजेवर तुटून पडण्यासाठीं गडबड करूं लागली. त्यांच्या " दीन दीन " आरोळ्यांची गर्दी उडाली. ' दीन 'चा आवाज ऐकतांच महादजीबाबांचें लालनबरोबर चाललेलें संभाषण संपलें. ते सदोबास म्हणाले, " ठीक आहे. छावणींत दाखल होईपर्यंत मागें पाहूं नको. तेथें जाऊन पोंचल्यावर माझी वाट पाहात उभा राहा. "

मुसलमानांची फौज जवळ येत चालली तसें मराठ्यांनीं घोड्याचे लगाम सैल सोडून एकदम पलायन आरंभिलें. समशेरबहादुरनीं मात्र आपली जागा सोडली नाहीं. पुढें कांहीं वेळानें तेहि माघारे फिरले. तेव्हां जयघोषांनीं शत्रूचे घसे फुटले. ससा पळूं लागला म्हणजे कुत्रा पाठीस लागतो, तशी क्षणभर तेथें ससेहोलपट्च झाली. मराठे आपल्या तटबंदीजवळ जाऊन पोंचतात न पोंचतात तोंच त्यांच्या तटबंदींतून बंदुकांचे व तोफांचे गोळे सुटूं लागले. अफगाण लोक गोळ्यांचा भडिमार चुकविण्यासाठीं मोठें चक्कर घेऊन मागचे मागें पलायन करण्याचा विचार करूं लागले. त्यांच्या मागें सुजाउद्दौल्याचे कडाबीनवाले कसलेले शिपाई होते, ते मैदानावर एकदम चालून गेले. मैदानांत मध्यभागींच एक बुरूज बांधला होता. त्यावर इब्राहीमखान गारदी होते. त्यांनीं बंदुकांच्या गोळ्यांची सारखी फैर सुरूं ठेवली. गारद्यांच्या कवायती कंपूचा शिस्तशीर हल्ला पाहून अफगाण लोक कच खाऊं लागलेले दिसतांच लुतुफखान, अताईखान वगैरे सरदार ईर्ष्योत्पादक भाषणें करीत पुढें घुसले. परंतु तोफखान्याच्या माऱ्यापुढें त्यांचें कांहीं चालेना. त्यांनीं आपल्या छावणीचा रस्ता धरला.

होळकरांची फौज पळून गेली, तरी महादजींच्या फौजेनें नेट धरला होता व सर्वांत शेवटींच ते छावणींत शिरले. छावणीमध्यें भाऊसाहेब, बळवंतराव मेहेंदळे वगैरे सरदार स्वार होऊनच उभे होते. फत्ते झाल्याची शहाजणे वाजवीत महादजी निशाणें फडकावीत मोठ्या डौलानें आंत शिरले व त्यांनीं भाऊसाहेबांना पहातांच मुजरा केला. भाऊसाहेब किंचित् रागानें म्हणाले, " कां महादजीबाबा, दुराण्यांचा मार खाऊनच परत आलां ना ? " रात्रीच्या हल्ल्यापासून मराठ्यांना फारसा फायदा झाला नव्हता तरी शिंदे आणि त्यांची फौज यांनीं आपल्या कामांत कसूर केली नव्हती. म्हणून भाऊ-

साहेबांच्या खोचून बोलण्याचा राग न मानतां महादजी म्हणाले, "आपण परशुरामाचे अवतार! परंतु आम्हीं मार खाल्ला नाहीं. दुसऱ्या कोणी खाल्ला असल्यास न कळे." मेहेंदळे जवळच उभे होते. ते म्हणाले, "भाऊसाहेब, किती दिवस हा हलगर्जीपणा चालावयाचा? निकराची लढाई दिल्याखेरीज गत्यंतरच नाहीं असें मला वाटतें.

# प्रकरण ११ वें :

छावणींत आल्यावर महादजीबाबांना लालनची व्यवस्था लावावयाची होती. राणीवसा त्यांच्याबरोबरच होता. नवीन स्त्री जनानखान्यांत आणली तरी इतर राण्यांना स्पष्टपणें नाहीं म्हणण्याची प्राज्ञा नव्हती. तरी त्या नवीन स्त्रीचा तिरस्कार केल्याखेरीज राहणार नाहींत व तें त्यांना चांगलें वाटणार नाहीं हें शिंद्यांना माहीत होतें. शिवाय, त्या नवीन आणलेल्या स्त्रीची कुचाळी केल्याशिवाय राहणार नाहींत. यामुळें तिला जनानखान्यांत न ठेवतां वेगळी ठेवून तिच्याकडे जाणें-येणें ठेविण्याचें त्यांनीं ठरविलें. परंतु त्यांसाठीं एकादा विश्वासू मनुष्य हवा होता. थोडा वेळ छावणींत हिंडल्यानंतर महिपतराव त्यांच्या दृष्टीस पडला.

महिपतराव त्याला झालेल्या जखमांना मलमपट्टी करीत बसला होता. महादजींनीं लालनचा बंदोबस्त तुम्हीं ठेविला पाहिजे, हें त्यांना सांगतांच ते किंचित् हसले व म्हणाले, "सरकारची मर्जी असेल तर तें काम मला केलेंच पाहिजे. अन् शिवाय तिला पाहिल्यापासून माझी तिच्यावर माया ममता बसली आहे, यामुळें मला ती पोटच्या पोरीप्रमाणेंच वाटत आहे. माझ्या हातून होईल तितका संभाळ मी करीन."

महादजी लालनकडे वळून म्हणाले, "सध्यां तूं महिपतरावाजवळ राहण्यास खुषी आहेस ना?"

"आपल्याजवळ राहण्यास कांहीं अडचण असेल, तर इतर कोणा अनोळखी माणसापेक्षां या रावसाहेबांजवळच राहणें मला पसंत पडेल."

याप्रमाणें लालनची व्यवस्था महिपतरावांनीं आपल्या राहुटींत केली. लालन प्रवासानें दमलेली होती. राहुटीच्या आंतल्या अंगाला गेल्याबरोबर तिनें वळकटी पसरून तीवर अंग टाकून दिलें. तिला बराच वेळ गाढ झोंप लागली होती. शेवटीं महिपतरावांनीं तिला जागें केलें व म्हणाले, "ऊठ पोरी; संध्याकाळ झाली. हातपाय धुऊन घे व जेवण कर, म्हणजे तुला बरें वाटेल."

लालनचें जेवण-खाण झाल्यावर महादजींकडून आलेले वस्त्रालंकार महिपतरावांनीं तिला दिले व सांगितलें कीं, "महादजी तुझा समाचार घ्यावयास येतील त्याच्या आंत हीं वस्त्रें लेवून व दागिने घालून त्यांच्या स्वागतास तयार राहा."

रात्र झाल्यावर महादजी आले. त्यांच्या हातांत फक्त तलवार होती. त्यांनीं अस्मानी रंगाचा शिलेदारी अंगरखा घातला होता व डोईला भरजरी मंदील बांधला होता. चमेलीच्या फुलांचा गुच्छ त्यांनीं हातांत धरला होता.

राहुटीच्या आंत शिरून त्यांनीं लालन कोठें आहे म्हणून पाहण्यासाठीं इकडे तिकडे नजर फिरविली. ती एका कोपऱ्यांत घुंघट घेऊन उभी असल्याचें त्यांना दिसलें. त्याबरोबर ते पुढें झाले व म्हणाले, "तापी तीरावरच्या हरणाला खाऊन टाकायला मी कांहीं जंगली वाघ नाहीं."

नंतर लालनला जवळ घेऊन त्यांचें संभाषण झालें. महादजींनीं सांगितलें, आमच्या फौजा आतांपर्यंत तरी यशस्वी झाल्या आहेत. परंतु प्रसंग लढाईचा. शत्रु-मित्र अशा वेळींच पारखले जातात. आम्हां मराठ्यांना कांहीं शाप आहे कीं काय न कळे. पंजाब, उत्तर हिंदुस्थानांतील मुसलमान पूर्वी मराठ्यांना चाहात असत. परंतु ते आतां आमचा तिटकारा करूं लागले आहेत. भाऊसाहेबांचा हट्ट व दुराग्रही स्वभावहि थोडासा आड आला आहे. त्यांनीं बादशाही तख्त फोडून मुसलमानांचीं मनें दुखावलीं आहेत. त्यामुळेंच हफीज रहिमन व सुजाउद्दौला दुराणीस जाऊन मिळाले आहेत. रजपूत आम्हांला सोडून गेले आहेत. सुरजमल जाटाचा अपमान झाल्यामुळें तोहि रागावून फौजफाटा घेऊन परत गेला आहे. मल्हारराव होळकर शूर व चतुर सरदार, परंतु त्याचें व दक्षिणी सरदार समशेरबहाद्दर व बळवंतराव मेहेंदळे यांच्यांत सौरस्य नाहीं. एखादें काम बिनसलें म्हणजे प्रत्येक सरदार त्याचें

अपयश दुसऱ्यावर ढकलून द्यावयास पाहतो. भाऊसाहेबांच्या मनानें घेतलें आहे कीं, उत्तरेकडील सरदार आम्ही शिंदे-होळकर स्वतंत्र होण्याची इच्छा करीत आहोंत. सुजाउद्दौल्याकडे पुणेकरांचीं व आमचीं वेगवेगळीं राजकारणें गुप्तपणें चालूं आहेत. होळकर व कपटी नजीबखान एकमेकांचे पगडभाई झाले आहेत, असा आमच्या जनकोजीबाबांचा ग्रह झाला आहे. सुजाउद्दौला आम्हांकडे व भाऊसाहेबांकडे वेगवेगळीं राजकारणें त्याचमुळें करूं शकत आहे. रणस्तंभाजवळ दररोज दिवसाढवळ्या दोन्हीकडील कारस्थानें चाललीं आहेत. ज्याला जसें बरें वाटेल तसें त्यानें करावें अशी बजबजपुरी माजली आहे. जयाची आशाहि अशा करणीमुळें दुरावली आहे. एवढें जरी असलें तरी जिवंत जीव आहे तोंपर्यंत तुम्हां सर्वांचें रक्षण करण्यास मी प्रयत्न करीतच आहे."

महादजी व लालन यांचे यानंतर चार दिवस मोठ्या सुखासमाधानांत गेले. एक दिवस महादजी असेंच लालनशीं बोलत बसले असतांना नोकरानें वर्दी दिली कीं, श्रीमंत भाऊसाहेबांनीं आपल्याला ताबडतोब बोलाविलें आहे. निरोप कळतांच शिंदे उठून आपल्या तंबूकडे गेले व दरबारचा पोषाख चढवून श्रीमंतांकडे जाण्यास निघाले. शिंद्यांची कल्पना अशी कीं, सल्ला-मसलतीसाठीं इतर सरदारांप्रमाणें आपणासही बोलावणें आलें आहे. पण तसला कांहीं एक प्रकार नव्हता. श्रीमंत एकटेच त्यांचे तंबूमध्यें विचार करीत बसले होते. त्यांची मुद्राहि नेहमींप्रमाणें प्रफुल्लित दिसत नव्हती. उलट चेहरा अगदीं उतरून गेला होता. भाऊसाहेबांची चिंताग्रस्त मुद्रा पाहून आसपासचे लोकही भांबावून गेले होते.

महादजींचा मुजरा घेऊन भाऊसाहेब घोगऱ्या आवाजांत म्हणाले, "महादजीबाबा, असे जवळ या. आज दरबारी मानपान नको. मित्राच्या नात्यानें मला आज तुमची सल्ला हवी आहे. म्हणून जें कांहीं बोलावयाचें तें अगदीं दिलखुलासपणें बोला."

महादजी हें बोलणें ऐकून दोन्ही हात जोडून म्हणाले, "जी आज्ञा असेल ती व्हावी."

"पाटीलबाबा, आज माझी अक्कल चालेनाशी झाली आहे. मला खरी सल्ला पाहिजे. समशेरबहाद्दर काय किंवा इब्राहीमखान काय, युद्धाच्या

कामांत उपयुक्त. प्रौढबुद्धीचा सल्ला त्यांजकडून मिळणार नाहीं. बळवंतराव मेहेंदळे होते, तेहि काल आम्हांस सोडून गेले. दमाजी गायकवाड खोल पाण्यांत कधींच शिरत नाहींत. यशवंतराव पवार नाउमेद होऊन बसले आहेत. इतर सर्व सरदार थिजल्यासारखे झाले आहेत. मल्हाररावांचें अंतरंग कळत नाहीं. म्हणून आज तुम्हांस बोलावणें पाठविलें आहे. सुजाउद्दौला दगाबाज मनुष्य आहे. त्यानें दिलेली वचनें मला खरीं वाटत नाहींत. आम्हांस फसविण्याकरितां तो हुलकावण्या दाखवितो आहे असें वाटतें. त्याच्या दोस्तीविषयीं तर......"

" त्याचें मत आमच्याविषयीं चोख आहे. तो आपणांस जितका चाहतो तितका अफगाणास खास चाहत नाहीं. मात्र तो पदराला खार लावून घेणारा असामी नाहीं. त्याचें हित साधून आमचें हित होत असल्यास तेवढी मदत तो आपणांस खास करील. आपण त्याला बादशाही वजिरांत देऊं केली आहे, त्या आशेवर तो आहे. तरीसुद्धां अडचणीच्या वेळीं आपल्या उपयोगी पडेल असें मला वाटत नाहीं. "

" कां बरें ? काय विशेष कारणें आहेत, मला स्पष्ट सांगा. "

" श्रीमंत, या वेळीं आपल्या अडचणींचा विचार करा. दिल्ली सर केल्यावर आपण काय वेत केले ते आठवा. मुसलमान लोक आपल्या जातभाईंना सोडून आमचा पक्ष स्वीकारतील असें मला वाटत नाहीं. एक सुजा आला तरी त्याची फौज त्याला धरून आपल्याकडे येईल कीं नाहीं याची शंकाच आहे. एकटा नबाब आपल्या काय उपयोगाचा ? " किंचित् थांबून " आश्वासन असेल तर बोलतों." असें म्हणून पुढें बोलूं लागले—

" हिंदुस्थानांत कोठेंहि बांग उच्चारूं देणार नाहीं असें आपण जाहीर केलें, बादशाही वाडे लुटले, तख्तावर विश्वासरावांना बसविलें, आतां मुसलमानांना आपला विश्वास कसा येईल ? "

महादजी जरी वयानें लहान होते, तरी भाऊसाहेबांच्या चुकांचें माप त्यांनीं बरोबर त्यांच्या पदरांत घातलें.

भाऊसाहेब उद्विग्नपणें म्हणाले, " मग आपणांस त्यांच्याकडून मदत मिळण्याची आशाच नको. "

अनुक्रम 30206

"दुराणी शहाशीं वांकडा होऊन तो आम्हांशीं मित्रभावानें वागेल इतका आमच्यावर त्याचा भरंवसा नाहीं, शिवाय त्याची फौज त्याच्या कह्यांत राहील कीं नाहीं शंका आहेच ना?"

"पण आम्हीं त्याचें खचित हितच करूं असा नवा करार त्याच्याशीं केला तर? तो पुष्कळ वेळां आमच्या वचनांत गुंतला आहे. त्या वचनाचें स्मरण देऊन किंवा कांहीं दुसरी शकल काढून त्याचें मन वळेल असें केलें पाहिजे."

"भाऊसाहेब, ती आशा आतां राहिली नाहीं. अहमदशहालासुद्धां माहीत आहे कीं, त्याचा ओढा आपल्याकडे जास्त आहे. म्हणून तो त्यास सल्लाहि विचारीत नाहीं. सुजानें अबदालीशींहि कपटी वर्तनच ठेविलें आहे. अघळपघळ बाता माराव्या, पण अंतःकरण शुद्ध नाहीं. तो मात्र दोन्हीं डगरीं-वर हात ठेवून आहे. ज्याला जय मिळेल तिकडे तो वळणार असें दिसतें."

"आतां आपली शेवटची लढाई होणार. तींत कालचक्रानें आपला पराभव होऊन आम्ही मागें हटलों तर सुजाचा कांहीं उपयोग होईल असा प्रयत्न करून पाहा. आम्हां पुरुषमंडळीचें कांहींहि होवो पण बायकामंडळींच्या बचावाचा कांहींतरी बंदोबस्त करून ठेवला पाहिजे."

"तेवढ्यापुरतें तो साहाय्य करील; पण तेंहि सांगवत नाहीं. आपल्या-कडील प्रत्येक सरदाराचा दुराणीच्या छावणींत एकेक मित्र आहे. आपला सुजा, आमचा हफीज रहिमान, होळकरांचा नजीब हे सर्व सरदार काळवेळ पाहून मदत करतील येवढेंच."

भाऊसाहेब व महादजी यांचें बोलणें पलीकडे बसलेल्या पार्वतीबाईंना ऐकूं जात होतें. बायकामुलांना वांचविण्याची वाटाघाट ऐकून त्या पुढें झाल्या व म्हणाल्या, "रजपूत स्त्रियांप्रमाणें आम्हींहि जोहार करूं. आपल्या हातांनीं आमची विल्हेवाट लावून आपण केशरी पोषाख करून बाहेर पडावें."

हे शब्द ऐकतांच महादजीबावांच्या अंगावर कांटा उभा राहिला. दुःख-दायक भावी प्रसंग मनांत येतांच त्यांची चर्या कावरीबावरी झाली. भाऊसाहेबहि म्हणाले, "हें असलें भलतेंच कृत्य आमच्या हातून व्हावयाचें नाहीं आपल्या जातींत जोहाराची चाल नाहीं. आमच्या पश्चात् बायका-

मुलांच्या नशिबीं असेल तसें होईल, पण आमच्या हयातींत स्त्रीहत्या आम्ही करणार नाहीं, व करूं देणार नाहीं. ''

पार्वतीबाई हिरमुष्टी होऊन दूर गेल्यावर भाऊसाहेब परत शिंद्यांना म्हणाले, ' सुजाकडे फिरून एकदां प्रयत्न करून पाहावा. तिकडे धाडण्याजोगा विश्वासू वकील नाहीं. माझ्या नांवाची परिस्फुटता न होतां त्यानें खुद्द सुजास भेटून त्याच्या तोंडून निघालेले शब्द त्यानें मला कळविले पाहिजेत. त्याच्या पोटांत शिरून त्याचे विचार काय चालले आहेत, आपलें काम होण्यासारखें आहे कीं नाहीं, याची यथातथ्य बातमी त्यानें आणली पाहिजे. हा प्रयत्न शेवटचा आहे. त्याचा दिवाण काशीराज महाधूर्त आहे; म्हणून या कामगिरीवर पाठविण्याकरितां कोणी धूर्त व चतुर पुरुष तुमच्या ध्यानांत असला तर सांगा. ''

'' सरकारची आज्ञा झाल्यास ही कामगिरी मी स्वतःच करून येतों.''

'' छे छे ! तुम्ही सर्वांच्या ओळखीचे आहां. नजिबाला ही बातमी लागली तर तुमची सुटका सुजाकडूनहि होऊं शकणार नाहीं. तो रोहिला तुमचा हाडवैरी आहे. तुमच्यासारखा मोहरा असल्या कामीं खर्ची घालावयाचा कीं काय ? ''

यावर शिंद्यांना बोलणें सुचेना. त्यांच्या तोंडाकडे निरखून पाहात असतांना त्यांनीं '' कदाचित् जर '' असे कांहींसे शब्द भाऊसाहेबांना शिंदे पुटपुटतांना दिसले. ते ऐकतांच '' तुम्ही पुढें काय बोलणार होतां ? '' असें त्यांनीं विचारलेंच. शिंदेहि मोघम म्हणाले, '' मनांत होतें तेंच कांहीं तरी...''

'' शिंदे, माझ्याशीं लपंडाव करूं नका. तुमच्या डोळ्यांसमोर तिकडे जाण्याजोगा मनुष्य होता. पण तुमचें मन बदललें असें दिसतें. ''

'' आलें होतें लक्षांत. पण तें उपयोगी नाहीं, म्हणून वाच्यता केली नाहीं.''

'' कोणतें मनुष्य मनांत आलें होतें आणि तें कां उपयोगी पडणार नाहीं ? ''

'' सरकार, कारण सांगतां येणार नाहीं. मनांत आलें होतें खरें, पण तें व्यर्थ आहे. ''

'' मजपाशीं असें कपट ठेवूं नका. तुम्हांला माझ्या गळयाची शपथ आहे.''

भाऊसाहेबांचा आग्रह पाहून शिंद्यांना मनांतील गोष्ट बोलावीच लागली. ते म्हणाले, '' एक अल्लड पोरगी मजकडे फिरत फिरत आली आहे, व

मजकरितां ती वाटेल तें काम पत्करील. म्हणून मी विचार करीत होतों कीं, तिच्या हातून ही कामगिरी उठेल कीं नाहीं ? पण असलें नाजूक व अवघड काम तिच्या हातून पार पडणें कठीण आहे. बायकांची जात ! त्यांच्या धैर्याचा आणि शहाणपणाचा भरंवसा कोणीं धरावा ? एखादे वेळीं भलताच परिणाम व्हायचा. "

" इतका तुमचा शोध काढीत इकडे आली. तिच्या धैर्याची आणि निश्चयाची तारीफच केली पाहिजे. कोणत्या जातीची आहे ? "

" जातीची आहे बैरागीणच. "

" मग तर फारच छान. ती जात मोठी धूर्त आणि बुद्धिमान् असते. बोलावें, चालावें कसें हें त्यांना चांगलें कळतें. काय वयाची आहे ही तुमची बैरागीण ? दिसावयास कशी आहे ? पुरुषाचा वेष दिला तर ठीक दिसेल कीं नाहीं ? "

भाऊसाहेबांची प्रश्नमालिका ऐकून शिंदे किंचित् हसले. " विशेष सुंदर नाहीं, पण कुरूपहि नाहीं. शिवाय ...... देखणी नसती तर आम्हीं तरी तिला कशास ठेवून घेतली असती ? "

" तर मग ठीक आहे. अल्पवयी बाईमाणूस म्हणून कोणी तिला ठेवून घेतलें तरी तिच्या जिवास धोका नाहीं. "

शिंद्यांना हें बोलणें आवडलें नाहीं. भाऊसाहेबांनाहि या कामगिरीवर शिंद्यांची आपल्या नव्या प्रियपात्राची पाठविण्याची इच्छा नाहीं हें स्पष्ट दिसलें. शिंद्यांचें मन वळविण्यासाठीं ते म्हणाले, " लाखों माणसांचा जीव बचावण्यासाठीं एका बैरागिणीचा बळी दिला असेंच घटकाभर समजा. या अवघड प्रसंगांतून ईश्वरकृपेनें पार पडलों तर अशा अनेक बैरागिणी तुमच्या-पुढें आणून उभ्या करूं. "

" पण त्यांना माझ्या लालनची सर नाहीं, सरकार. परंतु..." हो, ना, करतां करतां शिंदे मोठ्या कष्टानें लालनला वकिलीच्या कामावर पाठविण्यास तयार झाले. रात्रीच्या वेळीं इकडून निघून सूर्योदयाच्या आंत खालित्याचा जबाब आमचे हातीं पडेल असें करावें असें ठरलें. शिंदे मुजरा करून आपल्या तंबूकडे जाण्यासाठीं निघाले.

• • •

# प्रकरण १२ वें :

शिंदे आपल्या तंबूत जाण्यासाठीं भाऊसाहेबांच्या तंबूतून बाहेर पडले. त्यांना वाटेंत एक ब्राह्मण भेटला. त्याच्या भिवयांचे व पापण्याचेहि केंस पिकले होते. कंबर वाकली होती, गालफडें बसून अंगावर सुरकुत्यांचें जाळेंच पसरलें होतें. फाटके ठिगळें दिलेले कपडे त्यानें पेहेरले होते. अशा भिकाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी छावणींत नित्य हिंडत असत. त्यांतच शत्रुपक्षाचे हेर असत. हा ब्राह्मणहि त्यापैकींच असावा.

शिंदे त्या ब्राह्मणाच्या पुढेंच चालले होते. त्यांचें लक्ष या म्हाताऱ्याकडे गेलें नाहीं. कदाचित् जर गेलें असलें तरी वेषांतरामुळें ओळखलें नसेल. ब्राह्मण हळूहळू होळकरांच्या छावणीकडे चालला होता.

तेथील पहारेकरी त्याला आंत जाऊं देईना; तेव्हां ब्राह्मणानें आततताईपणाचा आव आणला व तेथेंच बसकण मारली. हळूंच इकडे तिकडे पाहात डोईवरची पगडी काढून तींतील कोकींमधून एक कागदाची सुरळी बाहेर काढली व पहारेकऱ्याजवळ देत म्हणाला, " तुमच्या मालकास हा कागद नेऊन दे. आणि सांग कीं, गंगादास ब्राह्मण आला आहे, व तो आपल्या भेटीची इच्छा करीत आहे. "

पहारेकऱ्यानें कागद जासुदाबरोबर आंत रवाना करून दिला. नंतर जरा वेळानें निरोप आला " गंगादासाला आंत पाठवून द्या. "

गंगादास मल्हारराव होळकरांच्या बिचव्याकडे निघाला. बिचवा लहानसाच होता, तेथें कांहींच सरदारी डामडौल नसून विलक्षण साधेपणाच होता. बिचव्यांत एक लाकडी पलंग होता, त्यावर मुशाफिरी बिछाना पसरला होता. जवळपास चटया पसरल्या होत्या व त्यांवरच तलवार, भाला, बंदूक इत्यादि शस्त्रें ठेविलीं होतीं. कोपऱ्यांत पितळेची समई होती व तिच्याजवळच पाणी पिण्यासाठीं एक सुरई व दोन तीन भांडीं होतीं. मल्हारराव वह्या उघडून हिशोब पहात होते व दोन कारकून त्यांना हिशोब समजावून देण्यासाठीं जवळच बसले होते. गंगादास आंत आल्यावर त्यांनीं कारकुनांना निरोप दिला. पहारेकऱ्यासहि बिचव्यापासून दहा हात दूर उभा

केला व गंगादासशीं बोलूं लागले, " बिरबल ! तूंच या वेळीं आलास हें बरें झालें. नजीबखानाकडील काय विशेष बातमी आहे ? "

बिरबल जाठ हाच गंगादास बनून आला होता. त्यानें आपल्या अंगरख्यांत लपवून ठेवलेला खलिता बाहेर काढला व मल्हाररावाजवळ दिला, खलिता पाहतांच मल्हारराव एकदम संतापले, व खलिता न वाचतांच फाडून त्याचे तुकडे तुकडे करून शेगडींत फेकून दिले, व कठोर स्वरानें म्हणाले " असल्या चिठ्ठ्या, चपाट्या आणू नकोस म्हणून किती वेळां तुला सांगितलें आहे. मला उर्दू वाचतां येत नाहीं, आणि कोणा कारकुनाकडून हा वाचवून घेऊन अनर्थ करून घेऊं कीं काय ? चिठ्ठ्या हव्याच कशाला ? कांहीं तोंडीं निरोप असला तर सांग. "

मल्हाररावांनीं लखोटा फाडून टाकला आणि वर त्याला ठपकाहि दिला. हें पाहून गंगादास चकितच झाला ! कां कूं करीत तो म्हणाला, " तोंडी निरोप आहेच, पण खातरजमा होण्यासाठीं बिनसहीचा..."

" त्या रोहिल्यास सांग असला गाढवपणा पुन्हां करूं नको. बरें असो. निरोप काय आहे सांग पाहूं ? "

नजीबसाहेबांचा निरोप आहे कीं, आतां शेवटचा प्रसंग नजीक येऊन ठेपला आहे. तुम्ही आम्ही जुने दोस्त. तर आपले करार मदार कायम आहेत ना ? याचा त्यांना जबाब पाहिजे.

" काय ! आमच्यावर गैरविश्वास ? त्याला असें वाटलें तरी कसें ! मजवर भाऊसाहेबांचा रोष आहे तो तुमच्यामुळें. गारद्यांच्या आणि इतर सरदारांच्या नादीं लागून त्यांनीं आमचा उपमर्द केला आहे. आणि तुम्ही म्हणतां आमची कुमक करा ! माझा पूर्वीचा निरोप ध्यानांत धरून दिलेलें वचन पुरें न करशील तर तुझ्या बेचाळीस पिढ्या नरकांत पडतील असा नजीबला माझा शेवटचा निरोप सांग. "

गंगादास मुजरा करून गेला न गेला तोंच श्रीमंत भाऊसाहेबांनीं बोलाविलें आहे अशी वर्दी जासुदानें आणली. मल्हारराव मनांत म्हणाले, " या धनगराची फिरून गरज लागतेच. " व उठून जामानिमा करून पेशव्यांचे तंबूकडे जाण्यास सिद्ध झाले.

• • •

# प्रकरण १३ वें :

श्रीमंत भाऊसाहेबांच्या तंबूस चार बाजूंस चार व मध्यभागीं एक असे पांच सोनेरी कळस होते. त्यावर अस्तास जाणाऱ्या सूर्याचे लाल किरण पडून तेहि लालसर केशरी दिसत होते. जणूं कांहीं भाऊसाहेबांप्रमाणें त्यांचा तंबूहि रागानें लाल झाला होता. पश्चिमेकडील उष्ण वाऱ्यानें तंबूचें वातावरण तप्त झालें होतें. भाऊसाहेब येवढे तेजस्वी, पराक्रमी वीर ! परंतु आज त्यांचा रंग अस्तास जाणाऱ्या सूर्याप्रमाणेंच निस्तेज झाला होता. नाना प्रकारचे विचार डोक्यामध्यें भणाणत असल्यामुळें त्यांस अतिशय अस्वस्थ वाटत होतें. रागानें मध्येंच मिशांवर पीळ देत इकडे तिकडे पहात होते. येवढ्यांत मल्हारराव आल्याची वर्दी आली. त्यांना पाहतांच भाऊसाहेबांनीं उठून त्याना आपल्याबरोबर बैठकीवर नेलें व क्षेमकुशलाचीं प्रश्नोत्तरें झालीं. भाऊसाहेब बाहेरून त्यांच्याशीं खुषींत आल्यासारखे होते तरी आंतून ते खवळून गेले होते. महादजीबाबांच्याशीं बोलतांना जो गोडवा व जें प्रेम होतें तशा शुद्ध अंतःकरणानें ते आतां बोलत नव्हते. भाऊसाहेब म्हणाले, "काकाजी, आतां हें भिजत घोंगडें किती दिवस ठेवणार ? मला वाटतें एकदां सोक्षमोक्ष लावून टाकावा. फौज बसल्याजागीं सडत आहे. घोडीं मेल्यामुळें बरेच स्वार पायउतार झाले आहेत. त्यांनीं घोड्यांशिवाय काम कसें करावें ? दिल्लीचा रस्ता सोडून जातां येत नाहीं; दुराणी आडवा बसला आहे. आम्ही निर्बळ झालों आहों. अशा स्थितींत दुराणीवर चाल करून जावें व त्याच्या तोंडावर तोफखाना ठेवून देऊन मजबूतशी जागा पाहून तेथें छावणी करावी असा माझा विचार आहे. तुमची सल्ला मला कळली पाहिजे."

होळकर महाधूर्त. त्यांनीं भाऊसाहेबांना आपल्या मनांतील विचारांचा चेहऱ्यावर कांहीं थांग लागूं दिला नाहीं. किंचित् खिन्न मुद्रेनें ते म्हणाले, "भाऊसाहेब, मला धनगराला कसली सल्ला विचारतां ? जो बेत आपण ठरवाल तो मला कबूल आहे. ज्याचा शिपायाचा पेशा, त्याला घरच्या आढ्याखालीं मरतां येत नाहीं. पण आतां आम्हीं शिपायांनीं तरी काय करावें ? घोड्याचा तोबरा बंद पडला. उपासमारीनें हातापायावर सूज आली आहे. असल्या

निकामी लोकांच्या हातून तरवार मारण्याचें काम कसचें होतें ? दौलत बुडून नायनाट होण्याची वेळ आली. आपण हट्टाला पेटून कोणाचें ऐकेनासें झालां. त्याचीं फळें आतां सर्वांना भोगावीं लागणार आहेत. ह्यापूर्वींच मार्गे हटलों असतों तर नामोशी नव्हती. पण गर्वानें घर खालीं आलें. वाडवडिलांनीं कमाविलेलें गमाविण्याची वेळ आली आहे. उद्यां जिवावर उदार होऊन बाहेर पडलों तरी जय होईल असा भरंवसा नाहीं. फुकटच्या फाकट फौज मरेल. अद्याप गनिमावर चालून जाण्याची घाई नको. चार दिवस अन्न खाऊन ताजेतवाने झल्यावर छावणी सोडून बाहेर पडू."

"काकासाहेब, आतां असल्या सबबी सांगून निभाव लागणार नाहीं. मी तुम्हांला स्पष्ट विचारतों, तुमची इमानदारी कायम आहे ना ?"

मल्हारराव चपापले, "भाऊसाहेब, असा भलताच सवाल कसा करतां? अविश्वास उत्पन्न होण्यासारखी कोणती हरामखोरी आम्हीं केली आहे हें आमच्या पदरांत घाला."

होळकरांचा प्रश्न ऐकून भाऊसाहेब कांहींच बोलले नाहींत, तेव्हां होळकरांना अधिकच जोर चढला. इमानदारीची गोष्ट काढल्याबरोबर मल्हाररावांच्या तळव्याची आग मस्तकांत गेली. पण करणार काय ? होळकर स्वतंत्र नसून ते पेशव्यांचे एक सरदार होते. रागाच्या भरांत अधिक कांहीं बोलून गेलों तर धन्याच्या गादीला पाय लावल्यासारखें होईल, म्हणून अपमान सहन करून गप्प बसले.

शेवटीं भाऊसाहेब मिटतें घेण्याच्या बुद्धीनें म्हणाले, "तुम्ही निमकहरामी केलींच असें आमचें म्हणणें नाहीं. तुमचाहि आमच्यावर रोष आहे तो विनाकारण आहे. आमचीं मनें तुमच्याविषयीं विशेष दूषित नव्हतीं, पण तुमचा आमच्याकडील ओढा मात्र कमी होत चालला आहे, तशी आमचीं मनें बिघडूं लागलीं. आतां मनाची शुद्धता करून आपण सर्व एकाच मातेचीं लेंकरें आहोंत अशा भावनेनें बोलूं."

"ही भावना प्रथमपासूनच ठेवतां, तर परिणाम किती सुंदर झाला असता! पिकल्या केसांचा धनगर म्हणून थट्टा न करतां, माझा सल्ला मानला असता तर असा प्रसंगच आला नसता."

या मर्मभेदक भाषणानें भाऊसाहेबांस त्वेष आला. तरी बरीच शांतता धरून ते म्हणाले, "काय झालें असेल तें असो. भवितव्यतेपुढें कोणास जातां येत नाहीं. माझी स्वतःची चूक असेल तर क्षमा करा. पण उद्यां समरभूमीवर दंड ठोकून उभे राहा. आमची लाज राखा."

शेवटचें वाक्य बोलतच भाऊसाहेब खरोखरच मल्हाररावांच्यापुढें पदर पसरून उभे राहिले.

● ● ●

## प्रकरण १४ वें :

भाऊसाहेब येवढे मानी व पराक्रमी! तेच आज मल्हाररावांच्यापुढें गोगलगाय झाले. मल्हाररावांच्या मनांत या वेळीं बरींच खळबळ उडाली. धनगर म्हणून आपला अपमान करणारे, दुश्मनासारखा वाटणारा मल्हारराव प्रसंग ओढाविल्यावर यांना स्वतःस वांचविण्यासाठीं हवा आहे असा विचार त्यांच्या मनांत आला; परंतु यांतील एक अक्षरहि तोंडावाटे न काढतां, "भाऊसाहेब, आपलें व आमचें नातें धनी-चाकराचें! माझ्यापुढें कसला पदर पसरतां? आज्ञा केली ती पार पाडण्याचें काम चाकराचें." एवढेंच बोलून स्वस्थ राहिले. भाऊसाहेबहि स्वस्थच होते. एवढीं आर्जवें केलीं, तरी मल्हारराव मनांतील अढी सोडण्यास तयार नाहींत. म्हणून पुन्हां म्हणाले, "सुभेदार, मागील गोष्टींचा खल करण्यांत अर्थ नाहीं. पुढेंहि होणारें होईलच, तेंहि चुकत नाहीं. पण तुमचें मन आमच्याविषयीं गढूळ झालें आहे तें तरी ह्या क्षणाला पुसून टाका, अशी माझी विनंती आहे. तुमचा मजवर क्रोध आहे हें मला माहीत आहे, माझ्याकडून कांहीं चुका झाल्या त्याचा हा परिणाम आहे हें मला कळत आहे. माझे मित्र तुमचे वैरी आहेत. हें मला माहीत आहे. तरी मी कोण कुणाचा हें लक्षांत आणा. मी नानासाहेबांचा बंधु आणि आप्पासाहेबांचा पुत्र. जे तुम्हांला आपल्या सख्ख्या भावासारखे वागवीत होते त्या बाजीरावांचा मी पुतण्या आहें. सदाशिवरावभाऊ आज चिमणीएवढें तोंड करून बसला आहे. तुमची

आर्जवें करीत आहे. तुम्ही म्हणालां, माझी हरामखोरी पदरांतघाला, पण हें बोलणें वरवरचें आहे. तुम्हीं बोलल्याप्रमाणें वागणार कीं आम्हांला फशीं पाडणार हें तुमचा अंतःसाक्षी प्रभुच जाणे. उद्यांच्या रणसंग्रामांत तुमच्या वर्तणुकींत कांहीं चलबिचल नजरेस आली तर त्या वेळेस तुमचेकडे एक स्वार पाठवीन तो तुम्हांस इशारा देईल, कीं सांगितल्याप्रमाणें करण्याची वेळ आली आहे. तुमचा कुलस्वामी खंडोबा जशी बुद्धि देईल तसें वागा. खाजगी दावा साधून घ्यावयाचा असल्यास तसें करा. कदाचित् रणभूमीवर मलाहि पडावें लागेल. आणि असा दुर्घट प्रसंग ओढवला तर आमच्या बायकामुलांचें कसें होईल ? निदान तीं शत्रूच्या हातीं जिवंत सांपडूं नयेत अशी आमची इच्छा आहे. त्यांचे प्राण व अब्रू वांचविण्याचें श्रेय तुम्ही घ्या. नजीबखान रोहिला तुमचा स्नेही आहे, त्याचें अबदालीजवळ वजनहि चांगलें आहे.त्यानें बचावाची खटपट केल्यास ती वायां जाणार नाहीं. याकरितां कबिल्याचें संरक्षण करण्याचें काम तुम्हीं पत्करिलें पाहिजे.'' यावेळीं भाऊ-साहेबांच्या डोळ्यांतून दोन अश्रु खळकन् पडले. ते पुसून शेवटचें वाक्य ते म्हणाले, '' आम्हीं तुमचीं लेंकरें आहोंत. आम्ही तुम्हांस काका म्हणतों. अर्थात् सुनालेकींचें जीव व अब्रूसंरक्षण करण्याचा अधिकार तुमचा आहे. हीच माझी शेवटची विनंती. तुम्हीं ऐकलें म्हटलें म्हणजे मला समाधान वाटेल.''

'' ऐकलें, भाऊसाहेब, सारें ऐकलें. देव करो आणि असा प्रसंग न येवो. पण कदाचित् आलाच तर जिवंत जीव आहे तोंपर्यंत मुलाबायकांना धक्का लागू देणार नाहीं. ''

मल्हाररावांचें बोलणें ऐकतांच भाऊसाहेब जरासे शांत झाले. मल्हार-रावांना निरोप देतांना म्हणाले, '' दरबारांत तुमची सल्लामसलत असेल ती सांगा. तिचा आम्हांस या बिकट प्रसंगीं उपयोग आहे. ''

होळकर उठून आपल्या तंबूकडे जावयास निघाले, तेव्हां पुटपुटत होते. '' आतां हा ब्राह्मण मला ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगत आहे. उद्यां याच्या-साठीं दुराणी कापून काढला तर सापासारखा उलटणार नाहीं कशावरून ? ''

● ● ●

# प्रकरण १५ वें :

शिंदे भाऊसाहेबांच्या तंबूतून निघाले ते लालनकडे गेले. त्यांचा चेहरा अगदीं उतरून गेला होता.

लालननें विचारलें, " सरकार, आज चर्या येवढी उतरलेली कां ? "

" प्यारी, आज नशिबानें पलट खाल्ली. दुसरें काय सांगूं ? रोज नवीं संकटें आहेतच. पण आज सर्वांवर ताण आहे. आपली आतां ताटातूट होणार. "

हे शब्द ऐकतांच लालनला वीज कोसळल्यासारखें वाटलें. ती मोठ्या कष्टानें म्हणाली, " जिवंत राहून ताटातुटीचें मला जितकें भय वाटतें, तितकें मरणाचेंहि वाटत नाहीं. "

" लालन, आज तुझ्या परीक्षेची वेळ आहे. ह्या घटकेस एखादी जोखमीची कामगिरी सांगितली तर ती तूं करशील कीं नाहीं ? "

" मी आपले प्राणहि देण्यास सिद्ध आहें. आज्ञा करून पाहावी म्हणजे खात्री होईल. "

" ठीक आहे. सांगतों. नीट लक्ष देऊन ऐक. आतांच श्रीमंत भाऊसाहेबांकडून आलों. तेथें बोलणें निघालें असतांना, तुझें धारिष्ट, इमानदारी, प्रामाणिकपणा आणि तुझें माझ्यावरील प्रेम ह्या गोष्टी मीं त्यांना कळविल्या-किंवा कळविणें भाग पडलें म्हण. त्यांना ह्या वेळीं नबाब सुजाउद्दौल्याकडे वकील पाठविण्याची जरुरी आहे, त्यासाठीं अत्यंत विश्वासू मनुष्य पाहिजे. तुझें नांव माझ्याकडून एकाएकीं निघालें हा माझा वेडेपणाच झाला. त्यांनीं मागणी केल्यानंतर मीं बरेच आढेवेढे घेतले. मी स्वतः जाण्यास सिद्ध झालों, तरी ते आपला आग्रह सोडीनात. पुरुषाला जितकी कैद होण्याची भीति असते तितकी बाईमाणसाला नाहीं, असें म्हटल्यावर माझा नाइलाज झाला. "

महादर्जींचें बोलणें ऐकतांच लालनच्या तोंडांतून शब्द निघेना. शिपायाचा स्वभावच थोडासा निष्ठुर असतो. त्यांच्यांतील दयामाया करपून गेलेली

असते. पण महादजी अतिशय दयाळू अंतःकरणाचे होते. लालनची ती स्थिति पाहून त्यांनीं तिला प्रेमानें आवळून धरलें.

" मी आपणांसाठीं प्राणहि देण्यास तयार आहें. बायकांचा जन्म व्यर्थ म्हणतात तें खरेंच ! आमच्या कपाळीं सुख फार दिवस नसायचेंच ! आपण आणलेल्या कामगिरीला भिऊन मी असें म्हणत नाहीं. मला वाईट वाटण्याचें कारण येवढेंच कीं मोठ्या कष्टानें जंगली विलायत्यांच्या तावडींतून मुक्तीच सुटलें तों फिरून त्यांच्याचकडे जाण्याचा प्रसंग आला. यापेक्षां दुसरें एखादें अवघड कामहि सांगा. मी मोठ्या आनंदानें पत्करीन. "

" लालन, तुला विलायत्यांच्याकडे नाहीं जायचें. नबाब सुजाउद्दौला आपला देशी मुसलमान सरदार आहे. शिवाय तुला एकटीलाच जावयाचें नाहीं. तुझ्या संरक्षणासाठीं कांहीं विश्वासू लोक बरोबर येणार आहेत. तुला पुरुषाचा वेष देऊन पाठवूं. सुजाउद्दौला श्रीमंत भाऊसाहेबांचा मित्र आहे. त्याला एक खलिता द्यावयाचा आहे. त्यांतूनहि तुला भीति वाटत असल्यास मी मुळींच आग्रह करणार नाहीं. मी स्वतःच नबाबाच्या गोटांत जाऊन कामगिरी बजावून येतों "

" छे, छे, मी आपणांस तिकडे कधींच जाऊं देणार नाहीं. तुमची आणि माझी बरोबरी कशी होईल? आपल्या दोघांपैकीं कोणी जावयाचें असा प्रश्न असेल तर ती मीच. मी काम फत्ते करून आलें तर तें तुम्हांस भूषणास्पद होईल. कदाचित् काम फसून प्राणांस मुकलें तर दुनिया थोडीच ओस पडणार आहे ? आपण नाहींसे झालां तर मात्र फारच अनर्थ होईल. मी मेलें तर लालननें स्वामिकार्यार्थ आपला देह अर्पण केला असें आपणांस वारंवार स्मरण होईल आणि येवढें बक्षीस मला बस आहे. "

" लालन, मी तुला वणव्यांत उडी घालण्यास सांगत आहे. तुला हिंमत आणि हौस असली तरच तूं हो म्हण. आमचे सलोख्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाले आहेत. केवळ शेवटचा प्रयत्न करून पाहावयाचा म्हणूनच ही धडपड आहे. कोणास ठाऊक, तुझ्यासारख्या स्त्रीच्या हातूनच ही गोष्ट घडवून आणावयाची ईश्वराची इच्छा असेल ! तुझ्या हातून हें काम शेवटास गेलें नाहीं तर तूं मला अंतरशील, इतकेंच नव्हे तर आपल्या सगळ्या छावणीची आहुति या पेटलेल्या वणव्यांत पडेल. "

महादजींचें हें बोलणें ऐकून लालनला दुप्पट हिंमत व तरतरी आली. ती म्हणाली, " सरकार, माझ्या जिवाची आपण फिकीर करूं नका. आपल्या शोधार्थ मीं देशभर हिंडून हाडाचीं काडें केलीं आहेत. इतके दिवस काढले तसे आणखी एकदोन दिवस निघणार नाहींत काय? "

" शाबास ! लालन, शाबास ! तुला वीरपत्नी कोण म्हणणार नाहीं ? " असें म्हणून महादजींनीं मोठ्या प्रेमानें तिला कुरवाळिलें. ही वेळ जास्त विलंब लावण्याची नसल्यामुळें लालनला उपदेशाच्या चार गोष्टी सांगून आपणांस काय बातमी कशी हवी आहे याची तिला पूर्ण कल्पना दिली. आमच्या छावणींतील बेदिलीप्रमाणें अबदालीकडेहि नजीबखान व सुजाउद्दौला यांचींहि मनें परस्परांविषयीं शुद्ध नाहींत. सुजा भाऊसाहेबांचा मित्र असून तो मराठ्यांचाहि द्वेष्टा नाहीं. म्हणून त्याची भेट घेऊन तो काय सल्ला देतो हें पाहणें आहे. त्यांच्या मसलती काय आहेत, त्याची कोणत्या लाभावर नजर आहे, तो कोणत्या अटी कबूल करील, आणि आम्हांस उघड रीतीनें नाहीं तरी गुप्त रीतीनें आपणांस काय मदत करील याची खरी हकीकत आम्हांस कळली पाहिजे. त्या दोघांपैकीं शहांची मर्जी कोणावर जास्त आहे, दिल्लीची वजिरात त्यानें कोणास देऊं केली आहे हें समजलें पाहिजे. ह्या सर्व गोष्टी समजून घेण्यास फार सावधगिरी ठेवली पाहिजे. एखाद्या वाहत्या काडीवरून पाण्याचा जोर ओळखावा लागतो. शिवाय जी माहिती मिळेल ती गुप्त ठेवली पाहिजे.

महादजी व लालन यांचें येवढें बोलणें होत आहे तोंच तिची जाण्याची वेळ झाली. महादजींनीं १७।१८ वर्षांच्या मुलास येईल असा एक मर्दानी पोशाख आणविला. पायांत तंग विजार, अंगांत रूदार पायघोळ अंगरखा व डोईस जरीकांठी हिरवा मंदील बांधला. हत्यारेंहि लटकावलीं. लालनचा पुरुषवेष पूर्ण झाला. भाऊसाहेबांकडून चार मुसलमान स्वार व सामान चढविलेली सांडणी येऊन दाखल होतांच किरमिजी रंगाची शाल पांघरून जाण्यास लालन सिद्ध झाली. तेवढ्यांत काळोखामध्यें एक पांढरा घोडा घेऊन एक पांचवा स्वार सामील झाला. घोडा महादजींनीं ओळखला, परंतु वर बसलेला पुरभय्या स्वार कोण असावा, हें त्यांच्या ध्यानांत आलें नाहीं. हा कोण ? कोठला हेर तर नसेल ना, अशी त्यांना शंका आली म्हणून

ते निरखून पाहूं लागले, तेव्हां तो स्वार जवळ आला व म्हणाला, "राम राम. मी महिपतराव." तो महिपतराव आहे असें कळल्यावर त्यांनीं लालनला सांगितलें, "आपला महिपतराव तुझ्याबरोबर जाण्यास तयार होऊन आला आहे, हें फार चांगलें झालें आहे. तो आतां तुला संभाळून नेईल. मला काळजी वाटत नाहीं. चला, आतां देवाचें नांव घेऊन निघाच."

लालन सांडणीवर बसली व महिपतराव आपला घोडा तिजबरोबर चालवूं लागला. सांडणीचा गुडगुड शब्द व घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं येत होता, तोंपर्यंत महादजी त्या दिशेकडे टक लावून पाहात होते. नंतर ते भाऊसाहेबांनीं बोलाविलेल्या दरबारास जाण्याची तयारी करण्यासाठीं निघून गेले.

• • •

## प्रकरण १६ वें :

प्रहर रात्रीस श्रीमंत भाऊसाहेबांनीं शेवटचा दरबार भरविण्याची आज्ञा केली होती. त्याप्रमाणें सर्व सरदार दरबारच्या डेऱ्यांत जमा झाले. डेऱ्या-समोरील मैदान माणसांनीं गच्च भरून गेलें होतें. या दरबारच्या बैठकींत निकराची लढाई करण्याचा दिवस निश्चित करावयाचा होता, मग मराठे विजयी होवोत कीं गिलचे विजयी होवोत !

दरबारास गर्दी होऊं लागली तसे चोपदार आपापल्या सरदारांस वाट करून देत होते. नगारखाना सुरू होता. जिकडे तिकडे उत्साहानें लोकांचीं मुखकमळें प्रफुल्लित होऊन गेलीं होतीं. प्रत्येकाच्या अंगांत वीरश्रीचें अवलोकनीय तेज फांकलें होतें. झुम्या, बखतर, टोप, चिलखतें, बिन्या व बिरजे घातलेले चित्र विचित्र पोषाखाचे लोक जमूं लागले. अबदागिरी, चामरादि सन्मान मिळविलेल्या सरदारांची दाटी होऊं लागली होती.

मशालीच्या उजेडानें सर्वत्र लखलखाट झाला होता. मुख्य दरबारांतील शामियान्यांत हंड्या, झुंबरें यांची खूपच आरास केली होती.

माणसांचा गलबला, घोड्यांचें खिंकाळणें, वाद्यांचा गजर आणि चोप-दारांच्या ललकाऱ्यांनीं वातावरण दुमदुमून गेलें होतें. भाऊसाहेबांच्या

बैठकीपुढें वारांगनांचा नाच चालू होता. त्यांच्या मस्तकांवर चामरें ढळत असून त्यांच्या डावीउजवीकडे सरदार व मानकरी वीरासनें घालून, शेमले सोडून व छात्या पुढें काढून बसले होते.

महादजी शिंदे बरेच उशिरां दरबारांत पोंचले. भाऊसाहेबांची व त्यांची नजरानजर होतांच "झालें ना ?" असा प्रश्न भाऊसाहेबांनीं नजरेनें त्यांस केला व त्यांनींहि मान हालवून होकारार्थी उत्तर दिलें, व आपल्या जागीं जाऊन बसले.

दरबार भरल्यानंतर मुख्य चोपदारास भाऊसाहेबांनीं नेत्रसंकेत केला, त्याजबरोबर त्यानें सर्वांना चूप राहण्याची मोठ्यानें ललकारी केली. बाहेरचा चौघडा बंद झाला. नंतर नाचणाऱ्या मुलींचे पोवाडे खड्या आवाजांत सुरू झाले. थोड्या वेळानें पोवाडे बंद झाल्यानंतर भाऊसाहेब उभे राहून म्हणाले, "रणदेवतांनो ! तुमचा अनुग्रह असेल तर मराठ्यांचा दरारा खुरासानपर्यंत दुमदुमून राहील. आजच्या दरबारांत चांगले पोवाडे ऐकून शिपायांच्या अंगांत स्फुरण उत्पन्न झालें आहे. याकरितां त्यांना चांगली बिदागी द्या. मराठे वीर हो ! उद्यां आपण विजयी होऊं किंवा रणांगणीं पतन पावूं. आज आपल्या छावणींत भूक आणि तहान हीं अक्षरें कानांवर पडून देऊं नका. आज जें शिल्लक असेल तें सर्व वांटून टाकून पोटभर जेवण जेवा. मी उद्यां 'अर्थं वा साधयेत् देहं वा पातयेत्' या उक्तीप्रमाणेंच वागणार आहें. तुम्हांलाहि तसेंच करण्यास ईश्वर बुद्धि व सामर्थ्य देवो अशी प्रार्थना करून उद्यां युद्धाला आरंभ करणार आहे."

भाऊसाहेबांचें हें निकराचें भाषण ऐकल्यावर केशरी पोशाख व पान-सुपारी वांटण्यांत आली. भाऊसाहेब सोन्याच्या झारींतून पाणी घेऊन उदक सोडतांना म्हणाले, "उद्यांच्या युद्धप्रसंगीं मी जयप्राप्तीसाठीं माझें शिरहि अर्पण करणार, पण अपयश घेऊन रणांगणांतून माघारा फिरणार नाहीं. सर्वांनीं आपापलें कर्तव्य स्मरून मारूं किंवा मरूं अशा दृढनिश्चयानें लढावें. तुमच्यासारखे शूर, समंजस आणि शस्त्रास्त्रकुशल वीरांस याहून जास्त सांगण्यास नको."

समारंभ आटोपतांच सर्वांनीं एकदम उठून 'हरहर महादेव' असा मोठ्यानें गजर केला. लोक जिवावर उदार होऊन वेडे झाले व जो तो

आपली तरवार काढून मुजरा करूं लागला. वीरांच्या मुखश्रीवर उत्साह चमकूं लागला. आज केशरी पोशाख मिळाले. आतां कुजून मरावयास नको. चला, मारा दुराणीला! " असाच जयघोष सर्वत्र ऐकूं येऊं लागला.

लढाईचा बेत ठरला. पण लढाईस प्रारंभ केव्हां करावयाचा याची गुप्त चर्चा सुरू झाली. इब्राहीमखान गारदीनें दिवस उगवला कीं लढाई सुरू करावी असा आपला विचार सांगितला. त्यांस कांहीं सरदारांनीं पाठिंबा दिला. परंतु मल्हारराव होळकरांनीं आपलें मन जरा स्पष्टपणें सांगितलें, " विंचूरकर, गायकवाड वगैरे सरदार देतील ती सल्ला योग्यच असेल. मी आतां म्हातारा झालों. तरुणांनीं दाखविलेल्या रस्त्यानें मला गेलें पाहिजे. परंतु आपण जी मसलत योजिली आहे ती चूक आहे असें मला वाटतें. आपणा मराठ्यांचा गनिमी कावा, विसाव्या कोसावर भाकर भाजून पंचविसाव्या कोसावर खावी असा आपला जुना रिवाज. तो सोडून देऊन आपल्याभोंवतीं खाई करून एका जागीं गाडून बसलों. दिव्यावर पतंग झडप घालतो, तसा तुम्ही उद्यां दुराणीवर छापा घालणार म्हणजे पतंग दिव्याला खातो कीं दिवा पतंगाला जाळतो हें कळेलच. आपण लढाईला सकाळीं गेलों काय आणि दुपारीं गेलों काय सारखेंच. जशी तुमची आज्ञा असेल तसें करावयास मी तयार आहें. "

मल्हाररावांचें भाषण दरबारांत कोणासच आवडलें नाहीं. दमाजी गायकवाड, जनकोजी शिंदे, इब्राहीमखान गारदी, समशेरबहाद्दर इत्यादि सरदारांनीं मोठ्या उभारीचीं भाषणें केलीं. ते म्हणाले, त्याचा इत्यर्थ असा ' खाशा स्वारीबरोबर राहून हुजुरातपागेकडून अजब करामत करवून आम्हां मराठ्यांमध्यें वाडवडिलांचें शौर्य आणि तेज अद्यापि चमकत आहे हें आम्ही शत्रूस दाखवून देऊं. नांव राखण्याकरितां उद्यां आम्ही धारातीर्थी पडलों तरी बेहेत्तर. तसें झालें तर स्वर्गांत आपले वाडवडील आमची वाहवा करतील. आमचे मल्हारराव देखील मागें राहणार नाहींत. त्यांचा सल्ला न ऐकल्यामुळें त्यांना जो राग आला आहे तो दुराणीस कापून काढण्याच्या कामीं येईल. "

लढाईच्या व्यूहाची रचना ठरल्यानंतर सर्व सरदार आपापल्या छावणीकडे निघाले. त्याच वेळीं लालन सुजाउद्दौल्याच्या गोटांत जाऊन पोंचली होती.

• • •

## प्रकरण १७ वें :

लालनची रवानगी करून दिल्यानंतर महादजी परस्पर दरबाराला गेले होते. लालनच्या वियोगामुळें त्यांचें मन अगदीं उदास झालें होतें. शेवटच्या बड्या दरबारचा देखावा त्यांच्या डोळ्यासमोरून हालत नव्हता. यामुळें आपल्या डेऱ्याकडे जावें असें त्यांना वाटत नव्हतें. लालनवर सोंपविलेल्या कामाचें काय होत आहे, या विचारामुळें त्यांचें चित्त व्यग्र झालें होतें, व मनाला करमणूक म्हणून ते इकडे तिकडे फिरून कोण काय करीत आहे हें पाहात हिंडत होते. उद्यां शेवटची मोठी लढाई होणार हें वर्तमान सर्वांना कळलें होतें, त्यामुळें छावणीभर जोरदार चळवळ चालली होती. सर्वांचीं अंतःकरणें उद्यां काय होणार या विचारानें खळबळून गेलीं होतीं.

फलज्योतिषी व सामुद्रिक आपापल्या खऱ्या खोट्या ज्ञानानें लोकांना भविष्य सांगत होते. कोठें पंचाक्षरी-मांत्रिक ऊद जाळून मंत्रतंत्रादि प्रयोग करीत बसले होते. कोठें सडेतोड शिपाई हातांत गजरे आणि गळ्यांत फुलांच्या माळा घालून दारूच्या गुत्त्याभोंवतीं कोंडाळें करून दंगल करीत होतें. कोणी सतारीवर बोटें फिरवीत होता तर कोणी ढोलकी बडवीत बसला होता. कोणी केवळ आपल्याच राहुटींत वळकटीला टेकून बसून आसपास चाललेला तमाशा व धांवपळ पाहात होते.

एका ठिकाणीं दहा वीस अगडबंब देहाचे गोसावी अंगाला राख फांसून बसले होते. त्यांच्या जटा पाठीवर लोळत होत्या व तोंडें दाढी-मिशांनीं झांकून गेलीं होतीं. त्यांनीं आपलीं हातापायांचीं नखें अस्वला-सारखीं वाढावेलीं होतीं. भांग, गांजा, अफू यांच्या चिलमीवर चिलमी फस्त होत होत्या. ‘ जय अलख निरंजन ’ म्हणून गर्जना करून ते येणाऱ्या-जाणाऱ्याकडे भिक्षा मागत होते.

कोणी शाक्तपंथीय देवीची मूर्ति मांडून पूजा करीत होता, तर कोणी वैदिक ब्राह्मण संकट-निवारणासाठीं रुद्राभिषेकाचें अनुष्ठान मांडून बसला होता. कांहीं ठिकाणीं भाट लोक कवनें व बाण्या म्हणून शिपायांना उत्तेजन देत होते, तर कोठें कोणी एकटाच एकतारीवर गाणें म्हणत बसला होता.

शिंदे दर ठिकाणीं थांबून गाणीं ऐकत चालले होते, त्यामुळें त्यांच्या उदास मनाची बरीच करमणूक झाली.

एका ठिकाणीं शिपाई लोक एकत्र बसून खाण्यापिण्याची लयलूट करीत होते. त्यांच्या आसपास भिकाऱ्यांचा तांडा जमला होता. त्यांतच कुत्रींहि इकडून तिकडे घुसून एखादा पदार्थ पळवीत होतीं. कोणीं रट्टा किंवा काठी मारली, कीं केंकाटत लांब जाऊन पुन्हा लंगडत लंगडत परत येत होतीं.

एका ठिकाणीं गोंधळी डफ-तुणतुण्यावर खड्या सुरांत पोवाडे गात होते. त्यामध्यें दिल्लीची लढाई व अटकेवर झेंडे फडकाविण्याच्या वीररसप्रधान ताज्या हकीकती महादजी शिंदे ऐकूं लागले.

"श्रीमंत ईश्वरी अंश, धन्य तो वंश परम पुरुषार्थी ।
बरोबरी तयांची कोण करील पहानार्थी ।। ध्रु० ।।
राजाधिराज महाराज, गरीब नव्वाज धनी श्रीमंत ।
भासवी सदैव देव आमचे हेच भगवंत ।
पाषाणधातुच्या मूर्ति, घरत्रीवरती । आहेत अनंत ।
त्या पूज्य परंतु नाहींत प्रगट जिवंत ।
तसे नव्हेत हे तर देव कलिमध्यें भूदेव ब्राह्मण संत ।
त्या वंशिं पेशवे झाले सबळ बळिवंत ।
प्रधानपद मिळवून वैरी पळवून मारिल्या शर्थी ।।श्रीमंत।।१।।
बाळाजी बाजीराव प्रधान केवळ निधान होते प्राणी ।
आणिले पुण्यांत जयांनीं नळाचें पाणी ।
युद्धांत जिंकुन नबाब, वसविली बाग। करून धुळधाणी ।।
त्यासालींच बंगाल्यांत घातलीं ठाणीं ।।
लगेंच केलें कूच, स्वारी दरकूच परतली सगळयांची ।
लष्करांत केवढा गजर, होई नित्य नजर
मोती मणि पोवळयांची ।
वाटून खिचडी रमण्यांत, आनंदें पुण्यांत, मोहरा पुतळयांची ।
खुष केले शास्त्री पंडित, विद्यामंडित विप्र विद्यार्थी ।
गेले कीर्त गात ते ब्राह्मण तीर्थोतीर्थीं ।। २ ।।

शत्रूस न जाती शरण, आल्या जरि मरण, न देती पाठ ।
दादाही गणावा त्यांत, बाण भात्यांत; भाताचें ताट ।
भलत्याच ठिकाणीं घाली रिपूंशीं गांठ ।
तिन्ही काल निरंतर साधी, जातिनें बांधी, हत्यारें आठ ।
फेडूनि नवस माहोरास; गेले लाहोरास; जिंकीत झेंडे ।
अरे जयांनीं सहज अटकेंत । पाव घटकेंत । लाविले झेंडे ।
सरदार पदरचे कसे, कोणि सिंह जसे, कोणी शार्दूल गेंडे ।
पुढें चाले वीरांचा भार, घेति करभार स्वामिकार्यार्थें ।
हे पुरुष म्हणावे श्रेष्ठ बंधुचे स्वार्थी ॥ ३ ॥......"

गोंधळी लोक शौर्यपर पोवाडे म्हणत असतांना सभोंवतीं जमलेल्या शिपायांना अतिशय स्फुरण चढलें व तेहि पोवाड्यामध्ये दंग होऊन गेले.

या सर्व गोंधळांत व तमाशांत भिक्षेकऱ्यांचे, गोंधळ्याचें किंवा बैराग्याचे वेष घेतलेले हेरहि असतील अशी महादजींची खात्री व त्याबरोबरच त्यांना लालनच्या वेषांतराची आठवण होत होती.

जरा वेळानें छावणींतील गोंगाट कमी झाला. शिकलगार शिपायांच्या हत्यारांना सहाणेवर धार लावून देत होते. त्यांच्या ठिणग्यांची बरसात पाहात महादजी जरा वेळ उभे राहिले. तेथून पुढें गेले तों एक मराठा वीर मोठ्या एकाग्र मनानें बाणाची पूजा करीत होता. पलीकडेच एक ओझ्याचा बैल मरून पडला होता. त्याची किळसवाणी घाण येत होती म्हणून नाकाला पदर लावून ते पुढें गेले, तों त्यास आगीचा मोठा भडका दिसला. एका शिपायाच्या राहुटीला आग लागली असून तो शिपाई तेथेंच त्या आगीचे फाड फाड आवाज ऐकत खिन्न वदनानें उभा होता. दुरूनच आगीचा डोंब पाहून महादजी बरीच रात्र झाली असावी असा विचार करून, उद्यांच्या प्रसंगाची तयारी करण्याकरितां हिंडणें आटोपतें घेऊन आपल्या डेऱ्याकडे परतले.

आपल्या डेऱ्यांत पोंचतांच त्यांनीं नाझरास आपल्याकडे बोलावलें व उंट, सांडणी, मेणे यांची मोजदाद करून घेऊन जनानखान्यांतील जड-जवाहीर एका वेगळ्या संगीन पेटींत घालून घेण्यास सांगितलें व त्यांस सूचना दिल्या

कीं सकाळीं छावणी सोडून फौजा बाहेर निघाल्या कीं त्यांच्या मागोमाग तुम्ही सर्वांनीं निघावें व लढाई जुंपल्यावर डाव्या अंगाला वळावें. आम्ही हरतों आणि मागें हटतों असें दिसलें तर मात्र पुन्हा छावणीच्या बाजूस न वळतां तत्काळ थेट पूर्वेस रस्ता धरावा. यमुना नदीचा कांठ दृष्टीस पडेपर्यंत तो रस्ता सोडूं नये व नंतर दक्षिणेकडे वळा व ईश्वर बुद्धि देईल त्या मार्गानें स्वदेशीं जा. "नाझर, तुम्ही आमचे विश्वासू सेवक आहां, म्हणून तुमच्यावर ही कामगिरी सोंपविली आहे. याच्यांत तिळमात्र हयगय करूं नका. जगून वांचून मी परत आलों तर रुपयांची रास बक्षीस देईन" असें त्यांस बजाविलें.

नाझरास रजा दिल्यावर त्यांच्या खास पागेच्या अंमलदाराला उद्यांच्या लढाईची तयारी करून त्यांच्या आवडत्या बिजलीचें चांगलें मालीश करून व चंदीचारा देऊन अफूचा मसाला देण्यास सांगितलें. शिलेदार लोक लांबलांबच्या मजला मारावयाच्या असल्या तर घोड्यास अफूचा कैफ चढवितात म्हणजे घोडा व स्वार न दमतां लांबच्या मजला मारूं शकतो.

छावणींत फिरल्यामुळें त्यांना बरेच श्रम झाले होते म्हणून त्यांनीं आपलें जेवण आटोपलें व निजण्यासाठीं बिछान्यावर अंग टाकलें.

• • •

## प्रकरण १८ वें :

लालनच्या तैनातीला दिलेले स्वार व महिपतराव लाननबरोबर जे बाहेर पडले ते थेट पूर्वेच्या रस्त्यानें चालूं लागले. अफगाण छावणी चुकवून पलीकडे जाण्याचा एक आडरस्ता होता. ही मंडळी मुद्दामच त्या रस्त्यानें चालली होती. चांदणें चांगलें टिपूर पडलें होतें. परंतु तो प्रदेश कोणाच्याच माहितीचा नव्हता. लालनला वाटलें कीं, धोपटमार्ग सोडून आपण असे आड रस्त्यानें कां चाललों आहोंत? तिनें वाटाड्यासहि विचारलें. तेव्हां वाटाड्या म्हणाला, "आपण हमरस्ता चुकवून मुद्दामच चाललों आहोंत. नीट रस्त्यानें जाऊन शत्रूच्या हातीं लागलों तर विनाकारण प्राणास मुकावयास लागावयाचें! आणि असा रस्ता धरला आहे कीं, याच्या चौकी-पहाऱ्याचा बंदोबस्त नबाबाकडेच आहे.

ती सर्व मंडळी एक घटका मोठ्या त्वरेनें चालून गेली. वाटेंत त्यांना एक कबरस्तान लागलें. तेथें थोडी विश्रांति घेतली. तेथेंच त्यांचा वाटाड्या उंटावरून खालीं उतरला व जमिनीला गुडघे टेकून तोंडाला हात लावून रानांत कोल्हीं ओरडतात तसा आवाज काढला, तो घुमत घुमत हवेंत विरतो न विरतो तोंच त्याचा प्रतिध्वनि उमटला. हा दुसरा आवाज प्रथम कोल्ह्यासारखाच वाटला, नंतर मात्र कुत्र्याच्या भुंकण्याप्रमाणें वाटला. वाटाड्यानें तो सांकेतिक आवाज ऐकतांच " सर्व ठीक आहे. चला, पुढें जाण्यास हरकत नाहीं." असें म्हणून तो परत उंटावर बसला व सर्व मंडळी एका तळ्याच्या कांठाकांठानें जाऊं लागली. थोडें पुढें जातात तों त्यांना एक स्वाराची टोळी भेटली. कबरस्तानांतील राईच्या सांवलींत ती उभी होती, तरी चंद्रप्रकाशांत त्यांचीं चिलखतें चमकलीं. त्या टोळींतील घोडेस्वार मोगल असून पायदळ हिंदुस्थानी पुरभय्ये लोकांचें होतें. दोहोंकडील एक एक स्वार पुढें होऊन त्यांचें कांहीं बोलणें झालें व लालनची टोळी पुढें वाट चालूं लागली. तिच्यासोबत आतां हिंदुस्थानी पुरभय्ये पण निघाले.

याप्रमाणें कांहीं मार्ग गेल्यावर त्यांस दुसरी एक तुर्की लोकांची टोळी दिसली. ती सरदार अताईखानाची गस्त घालणारी टोळी होती. अताई-खान त्यांच्या बरोबर होताच. तो पुढें होऊन म्हणाला, " तुम्ही कोण आहां ? " त्याला लालनच्या टोळींतील एकानें उत्तर दिलें, " मी वेणी-माधवसिंग आहें. नबाबसाहेबांच्या हुकुमानें इकडे आलों आहें व हे लोक माझ्या हाताखालचे आहेत." अताईखान पुढें येत आहे असें पाहतांच वेणी-माधवसिंगानें हातानेंच इशारा करून लालनला सांडणीवरून महिपतरावांच्या घोड्यावर घेतविलें. अताईखान जवळ येऊन भिडल्यावर त्यानें विचारलें, " क्यँव् ठाकुरसाब ! काय खबर आहे ? " वेणीमाधवसिंगानें उत्तर दिलें, " कांहीं विशेष गडबड दिसत नाहीं. जरा पुढें जावयास सांपडलें असतें तर बरें झालें असतें, परंतु गारद्यांच्या चौकीमुळें परत फिरलों. " " नाहीं कळलें कांहीं, तरी चिंता नाहीं. असो. पण तुमच्या पलीकडे उंट दिसतो, तो कोणाचा ? तुम्ही कांहीं कैदी आणले काय ? कैद्यांच्याकडून कांहीं नवीन बातमी मिळेल. आणा त्यांना इकडे. "

वेणीमाधवसिंग " खानसाहेब, हा उंट मोकळाच हातीं लागला. वर असलेला मनुष्य आम्हांला पाहतांच पळून जाऊं लागला म्हणून त्याला कैद करूं लागलों. त्या झटापटींत तो मारला गेला. "

" त्याजजवळ कांहीं कागदपत्र मिळाले का ? "

" नाहीं. आम्हीं त्याची झडती घेतली पण कांहीं सांपडलें नाहीं. "

" तुम्ही मोठी चूक केली ठाकूरसाहेब. त्या माणसाला जिवंत पकडलें असतें तर कांहीं बातमी मिळाली असती. "

" हो, असें झालें खरें; पण त्या धांदलींत येवढें प्रसंगावधान राहिलें नाहीं. शिपाई हातघाईवर आले आणि तो मारला गेला. "

" असो, यापुढें तरी सावधगिरी ठेवा. हे मराठे केव्हां काय करतील याचा नेम नाहीं. " इतका इशारा देऊन अताईखान निघून गेला. त्याची टोळी गेल्यावर वेणीमाधवसिंगानें दोन-चार इरसाल शिव्या हासडल्या व आपल्या लोकांना चलण्याचा इशारा केला. हिंदुस्थानी लोकांना अफगाण लोकांची मोठी चिरड आली होती. पण उघडपणें दाखविण्याची चोरी होती, म्हणून अशा तऱ्हेचे प्रसंग वेणीमाधवसिंगावर नेहमीं येत. हें विघ्न टळल्यावर मात्र लालनला कांहीं त्रास झाला नाहीं व त्यांची टोळी सुजाउद्दौल्याच्या चौकीजवळ येऊन पोहोंचली.

नबाब वजिराच्या गोटाच्या प्रत्येक दरवाजावर हत्यारबंद शिपाई पहारा करीत होते. कित्येक मशालजीहि इकडे तिकडे वावरत होते. त्यामुळें गोटांत चांगला प्रकाश पडला होता. वेणीमाधवसिंगानें एका मंडपांत आपली टोळी उभी केली व शिपायाबरोबर मिर्झा-जान-नवास आहेत, अशी वर्दी नबाबास पाठविली. हें नांव दोन्ही पक्षांच्या जासूद लोकांस सांकेतिक शब्दासारखें उपयोगी पडावें म्हणून ठरविण्यांत आलें होतें. या नांवाची वर्दी दिली कीं, कोणी वकील आला आहे, अशी खूण पटून त्यांस नबाबाच्या छावणींत प्रवेश मिळे. वर्दी देण्यासाठीं गेलेला शिपाई परत आला व म्हणाला, " नबाबसाहेब आतां कामांत आहेत. त्यांच्याकडे नजीबखान, हाफीज रहिमानखान इत्यादि मेहमान मेजवानीस आले आहेत व त्यांच्या जाफतीचें काम चालू आहे. तुमची वर्दी मी त्यांचे दिवाण काशिराज पंडितांकडे दिली आहे व त्यांनीं कळविलें आहे कीं आपण बसावें. भेटीची व्यवस्था लवकरच करतो. "

ग्रंथालय (library stamp with handwritten accession numbers)

वेणीमाधवसिंगानें त्यांची उंट, घोडीं वगैरेंची व्यवस्था लावून त्यांनीं एका कनातीच्या दरवाजापर्यंत नेलें. तेथें टोळी थांबली. लालन व महिपतराव मात्र नबाबाच्या जासुदाच्या मागोमाग आंत जाऊन एका तंबूत बसले. तंबूच्या तोंडाशींच एक हिंदु मशालजी बसला होता. लालन तंबूत प्रवेश करणार इतक्यांत कोणीतरी एक परका मनुष्य लगबगीनें आला व मोठी त्वरा करून त्यांच्या अगोदर तंबूत शिरूं लागला. जणूं काय आपल्या घाईचें कारणच सांगत आहे अशा स्वरांत स्वतःशींच पण जरा मोठ्यानें म्हणाला, " नबाब नजीबसाहेबांकडे माझें जरुरीचें काम आहे. मला जाऊं द्या. माझ्या घाईबद्दल माफ करा. " तो मनुष्य लालनला धसटून पुढें निघून गेला. त्या वेळीं मशालीच्या प्रकाशांत दोघांचे चेहेरे एकमेकांस दिसले. पूर्वी ज्या ठिकाणीं त्यांची भेट झाली होती तेथें दोघांचेहि पोशाख वेगळे होते. या वेळीं लालन मर्दानी पोशाखांत होती व तो मनुष्य हिंदु पद्धतीची देशी बत्ती डोक्यास घातलेली, अंगांत अंगरखा व कमरेस शेला अशा पोशाखांत होता. तरी दोघांनींहि एकमेकांस ओळखलें. तो होता बिरबल जाट! बिरबल तिला पाहतांच चपापला. तो हेराच्या कामांत निर्ढावलेला असल्यामुळें त्यानें आपल्या चेहऱ्यावरील नूर न बदलतां ओळख पटल्याचेंहि दाखविलें नाहीं. लालनला मात्र तें जमलें नाहीं. तिचें तोंड एकदम गोरेंमोरें होऊन गेलें. स्वतःला कशीतरी सांवरतच ती महिपतरावांबरोबर पुढें जाऊन काशिराज पंडितासमोर उभी राहिली.

काशिराज पंडित हा देशस्थ महाराष्ट्रीय ब्राह्मण. परंतु आपल्या कर्तबगारीवरच तो सुजाचा मुख्य दिवाण व त्याचा अत्यंत विश्वासू कारभारी होता. त्याच्या वाटोळ्या चेहऱ्यांत त्याचे टपोरे व पाणीदार डोळे उठून दिसत असत. त्याची दृष्टीहि चांगलीच तीक्ष्ण होती. दक्षिणी ब्राह्मणांच्या पद्धतीनें त्यानें डोकें तुळतुळीत करून गाईच्या खुराएवढा घेरा व शेंडी ठेविली होती. त्याचें दक्षिणी घाटाचें पागोटें त्यानें डोक्यावरून काढून जवळच खालीं ठेविलें होतें व अंगावरील धुवट दुपेटा डोईला गुडाळला होता. त्याला मराठी, फारसी व हिंदी भाषांचें उत्तम ज्ञान होतें. त्याच्या पुढ्यांत एक लहानशी पेटी होती. तीवर कागद ठेवून तो कांहींतरी लिहीत होता. हस्तिदंती कलमदान, बोरूच्या लेखण्या वगैरे सामान आसपास पसरलें होतें.

काशिराजाला तपकिरीचें मोठेंच व्यसन होतें. लालन आंत जाऊन मोठ्या अदबीनें उभी राहून त्याला सलाम करीत होती, त्या वेळीं तो समोरच्या कागदावर लिहिलेल्या मजकुरांत कांहीं दुरुस्त्या करीत होता. लालनला पाहतांच त्यानें समोरचे कागद बाजूस सारले व तपकिरीची डबी हातांत घेत विचारलें, " मिरझासाहेब ते तुम्हीच का ? बसा ना खालीं. तुम्हांला दाक्षिणी बोललेलें कळतें ना ? " लालनचा जन्म जरी तापीतीरीं झाला होता तरी ती जातीची होती बैरागीण. तिला उत्तम मराठी येत नव्हतेंच. काशिराजानें पुन्हा विचारलें, " मिरझासाहेब, तुम्ही फारसी जाणत असाल." यालाहि लालनकडून स्पष्ट जबाब मिळेना. तेव्हां संशय येऊन त्यानें आपल्या कारकुनास बाहेर जाण्यास सांगितलें. पुन्हा एकदां तपकिरीचा बार भरून काशिराज म्हणाला, " वकीलसाहेब, तुम्हांला तुमची जन्मभाषा येत नाहीं किंवा तुमच्या धन्याची भाषाहि येत नाहीं, हें कसें ? बरें, तुम्हांला हिंदी तरी चांगलें कळतें का ? " त्यावर मात्र लालन म्हणाली, " जी हुजूर. हिंदी भाषा मला चांगली समजते. " काशिराजानें महिपतरावाकडे बोट करून विचारलें, " हे कोण ? " " साहेब, जसा मी तसेच हे आहेत. यांच्याविषयीं शंका नको." इतक्यानें दिवाणाचें समाधान झालें नाहीं. " तुमच्या मराठ्यांच्या छावणीकडून......" दिवाण काशिराज येवढें बोलतात तोंच लालन म्हणाली, " हो, हो, आम्ही श्रीमंत भाऊसाहेबांकडून आलों आहोंत. " हें ऐकतांच काशिराजानें तिला गप्प राहण्याची खूण करून एकवार सभोंवतीं संशयी नजरेनें पाहून हळूच म्हणाला, " तुम्ही अगदीं हळू बोला व कोणाचेंहि नांव घेऊं नका. तुम्ही मोघम बोललांत तरी आम्हांस समजेल. बरें, तुमच्याजवळ कांहीं खलिता दिला आहे का ? असेल तर काढा बरें तो......!"

लालन म्हणाली. " होय साहेब, खलिता आहे, परंतु तो खुद्द नबाब-साहेबांच्या हातीं देण्याचा हुकूम आहे, माफी असावी. "

" मिर्झासाहेब, मी कोण हें माहीत नाहीं वाटतें ? "

" नाहीं. आपली ओळख... "

" मी काशिराज पंडित. वझीरसाहेबांचा दिवाण आहे. समजलांत ! "

" परंतु मला श्रीमंतांच्या हुकुमाप्रमाणेंच वागलें पाहिजे. नबाबसाहेबा-शिवाय दुसऱ्याच्या हातांत मला खलिता देतां येणार नाहीं, याबद्दल दिलगीर आहे. "

" चिंता नाहीं. तुम्ही येथेंच बसा. मी नबाबसाहेबांकडे जाऊन येतों. " असें म्हणून तपकिरीची एक चिमूट कोंबून तो बाहेर पडला. सुमारें पाव घटकेनंतर खुद्द नबाब सुजाउद्दौलाच तेथें आला. त्याचा चेहरा मद्यपानामुळें लाल झाला होता. त्याच्या दृष्टींतहि लालडींसारखीच लाल चमक होती. नबाबसाहेबांच्या पाठीशींच त्याचा दिवाण तपकिरीच्या डबींत बोटें खुपसून उभा होता. नबाब म्हणाला, " पंडतजी, मराठ्यांकडून आलेला वकील कोठें आहे ? " त्याबरोबर लालन मोठ्या अदबीनें कुर्निसात करून उभी राहिली. नबाब म्हणाला, " मिरझासाहेब, तुम्ही जरा थांबाल तर बरें होईल. माझ्याकडे आज कांहीं सरदार मेजवानीसाठी आले आहेत. तुमचेंहि काम जरुरीचें आहे. पण.. पण आतां मला सवड नाहीं. रात्रभर येथें राहाल तर फार बरें होईल. "

नबाबसाहेबांचें बोलणें चालू असतांना लालन त्यांच्याकडे निरखून पाहात होती. दाऊद व खुदायार या दोन पठाणांचें तिच्यासाठीं भांडण लागलें असतांना बादशहाबरोबरच्या सरदारांत वझीर नबाब होताच. तिनें त्यांना चांगलें ओळखलें व तिची खात्री पटतांच भाऊसाहेबांचा खलिता त्यांच्या हातांत देऊं लागली. नबाब वझीरसाहेबहि तिच्याकडे निरखून पाहात होते. त्याच्या मनांतहि या वेळीं हाच विचार येत असावा. टेहेळणीच्या वेळीं बैराग्याच्या छोकरीच्या चेहऱ्याशीं या मिरझासाहेबाचा चेहरा बराच मिळता-जुळता आहे ! अफसोसकी बात है ! नंतर दिवाणजीकडे वळून मोठ्यानें म्हणाले, " पंडतजी, हा कोण मिरझाखान वाझ ? पूर्वी आमचेकडे एक मिरझा आला होता तो हा नव्हे. खरें सांग बरें तूं कोण आहेस ? "

" खाविंद, मी माझ्या धन्याचा एक बंदा गुलाम आहे. त्यांनीं सांगितलेलें काम नीट व काळजीपूर्वक बजावणें येवढेंच मला माहीत आहे. मी पूर्वीचाच मिरझा आहे कीं दुसरा कोणी आहे हें कळण्यांत अधिक मातबरी आहे असें नाहीं. आपण खलिता वाचून पाहा म्हणजे खातरी होईल."

सुजाउद्दौल्यानें तिच्या हातांतील लखोटा घेतला व दिव्यापुढें उभा राहून उलटसुलट करून पाहिला व नंतर फोडला. आंतील कागदावर भाऊसाहेबांचें मोर्तब पाहतांच बरोबर आहे अशा अर्थी मान हालवून वाचूं लागला. खलिता वाचल्यानंतर मात्र त्याचा चेहरा खर्कन् उतरला. तो व त्याचा दिवाण साश्चर्य मुद्रेनें एकमेकांकडे पाहूं लागले. तंबूच्या एका कोंपऱ्यांत जाऊन त्यांनीं कांहींतरी खलबत केलें व नंतर सुजा मिरझाकडे आला. सुजाच्या मनाची विलक्षण स्थिति त्याच्या चेहऱ्यावर पूर्णपणें प्रतिबिंबित झाली होती. सुजाउद्दौला महाधूर्त, राजकारस्थानी व धोरणी होता. त्यानें मिरझाशीं बोलतांना आपल्या मनःस्थितीचा थांग लागूं दिला नाहीं.

मिरझाकडे पाहात त्यानें विचारलें, "या खलित्यांत काय मजकूर आहे तें तुम्हांस ठाऊक आहे काय ?"

मिरझा—"नाहीं सरकार. मोर्तब करून बंद केलेला लखोटाच माझ्या हवालीं केला होता."

"त्यांत तुमचे भाऊसाहेब असें कळवितात कीं उद्यां सकाळीं ते आमच्यावर निकराचा हल्ला चढविणार."

"होय. आज मोठा दरबार होऊन केशरी पोषाख वांटण्यांत आले खरे. मोठ्या पहाटेस उठून बाहेर पडण्याचे हुकूम सर्वांस सुटले आहेत असें म्हणतात."

"मिरझासाहेब, भाऊसाहेबांचे मनांत आहे तरी काय? मीं कोणत्या प्रकारची मदत करावी असें त्यांचें म्हणणें आहे ?"

"अल्ला जशी आपल्याला प्रेरणा करील तसें करा. आपली त्यांची भाई-पगडी झाली आहे. तेव्हां भाईनीं एकमेकांना जी मदत करावयाची ती करा. दुसरें कांहीं मागणें नाहीं."

"लढाई सुरू झाल्यानंतर मी दुराणीचा पक्ष सोडावा? का तिऱ्हाइता-सारखें तटस्थ राहावें? मिरझा, भाईची ही मागणी फार जोखमीची आहे. ही लढाई जिहादची आहे, असें जाहीर झालें आहे. माझें मन भाऊकडे ओढ घेत असलें तरी माझी फौज मला धरून राहील कीं नाहीं याचा मला अंदेशा आहे."

" आपली फौज निम्मी हिंदूंनींच भरली आहे व मुसलमान लोकहि बरेचसे शियापंथाचे आहेत. त्यांचा व पठाणांचा द्वेषभाव नसला तरी प्रेमभावहि नाहीं. आपण बोट वर करण्याचा अवकाश कीं ते आम्हांस खुषीनें येऊन मिळतील."

" कठीण ! फार कठीण आहे. दुरून डोंगर साजरे दिसतात, पण जवळ जातांच दऱ्या व कांटेरीं झाडें पाहून मनुष्य गांगरून जातो. तसेंच आमचें आहे."

" सरकार, नजीबखानाला दिल्लीची वजिरात मिळाली व हफीज रहिमानखानानें त्याच्याशीं संगनमत केलें, तर तुमच्या राज्याचें काय होईल याचा विचार करा. अशा अडचणीच्या वेळीं भाऊसाहेब त्यांचे सरदार शिंदे तुम्हांस अनुकूल नसतील तर निदान होळकर व नजीबखान एक होऊन तुमचें राज्य धुळीस मिळवतील."

" मिरझासाहेब, तुम्ही म्हणतां ही गोष्ट खरी आहे. पण......पण होळकरांबद्दल तुम्ही काय म्हणालांत ?"

" नजीबखान व होळकर हे मोठे दोस्त आहेत. नजीबखान या लढाईत त्यांचा बचाव केल्याशिवाय राहणार नाहीं हें नक्की."

" तरी पण त्यांना मराठ्यांच्या बाजूनें लढण्याशिवाय गत्यंतर नाहीं. मीं दुराणीचा पक्ष सोडला तर होळकर बाजूस राहतील असें का तुम्हांस सुचवावयाचें आहे ?"

" आपण जर आमच्या बाजूला मिळाला तरी होळकरांना लढाईला उभें राहिलेंच पाहिजे आणि मिळालां नाहीं तरी लढण्याशिवाय त्यांना गत्यंतर नाहीं."

यावर सुजाउद्दौला बराच वेळ विचार करून शेवटीं म्हणाला, " मिरझा, भाऊसाहेबांना सांगा, उद्यांचा हुकूम मागें घ्या. नानासाहेब पेशवे सैन्य घेऊन येत आहेत अशी बातमी आहे. त्यानें एखादेवेळीं लढाईचा रंग बदलेल."

" हुजूर, त्या मदतीच्या आशेवर राहण्यास वेळ नाहीं. आमचें काम निकरास पोंचलें आहे. खुद्द भाऊंच्या जिवास अपाय होईल इतकी आमच्या फौजेंत बेदिली व खळबळ आहे."

" मिरझा, या गोष्टीचा विचार करावयास मला थोडा वेळ पाहिजे. तुम्हांस किती वेळांत परत येण्याचा हुकूम आहे ? "

" रात्रीचा तिसरा प्रहर अर्धा झाला नाहीं तोंच मला परत निघालें पाहिजे. उशीर झाल्यास फौजा छावणीबाहेर पडतील; मग माझें परत जाणें कांहीं उपयोगी पडणार नाहीं. "

" ठीक आहे. तुमच्या मताप्रमाणें सर्व व्यवस्था होईल. तीन घटकेच्या आंत तुम्हांस जबाब देतों. "

इतकें बोलून सुजाउद्दौला तंबूबाहेर पडला व आपल्या खाजगी तंबूंत जाऊन काशिराजाच्या साहाय्यानें जबाब तयार केला. तो थोडक्यांत पण मुद्देसूद होता. त्याचा आशय असा–" आपली व आमची दोस्ती कायम आहे. आपण अकस्मात् हल्ला कराल तर कदाचित् आपला फायदा होईल. आपण पगडीभाई आहेंत हीं गोष्ट मनांत वागवून मला जरासा जरी रस्ता दिसला तरी मी आपला फायदा करून देईन. मल्हाररावांवर मात्र नजर ठेवा."

काशिराजानें खलिता लिहून तयार केला, पण त्याची वासलात वेगळ्याच प्रकारानें लागावयाची होती !

• • •

## प्रकरण २० वें :

भाऊसाहेबांच्या खलित्याचा जबाब देण्यासाठीं काशिराज पंडित निघाला. इतक्यांत वजिरानें त्यास माघारें बोलावलें व म्हणाला, " पंडतजी, तुम्ही येथेंच थांबा. मीच मिरझाजानला खलिता देऊन येतों. " काशिराजाकडून खलिता घेऊन ते मिरझाजवळ देतांना कांहीं गुप्त खाजगी निरोप तोंडींच कळवावयाचा असेल असें काशिराजास वाटलें म्हणून तो थबकून उभा राहिला.

सुजाउद्दौला स्वतःच खलिता देण्यास निघाला. एका तंबूतून दुसऱ्या तंबूंत जाण्यासाठीं भिंतीसारख्या कनाथी उभ्या केल्या होत्या, त्यामुळें बोळासारख्या चिंचोळ्या अरुंद वाटा तयार झाल्या होत्या. सुजाउद्दौला लालन बसली होती त्या तंबूंत जाण्यास निघाला. तेव्हां मधील कनाथींच्या

पलीकडे कोणीतरी दोघे इसम बोलत आहेत असें त्यास वाटलें म्हणून तो कान देऊन ऐकण्यासाठीं उभा राहिला, तेव्हां त्याच्या कानावर शब्द पडले—

"ख्वाजारोशन, मागें एकदां ज्या एका हिंदू पोरीवर लुतुफखान आषक झाला होता तीच आज पुरुषाचा वेष घेऊन नबाबसाहेबांकडे आली आहे. तिचा कांहींतरी कावा असला पाहिजे. नबाबसाहेबांचा ओढा मराठ्यांकडे आहे ही गोष्टहि जगजाहीरच आहे. माझा पुतण्या मराठ्यांच्या छावणींत गेला आहे, तो आला म्हणजे कांहींतरी सुगावा लागेलच."

ख्वाजा खवचटपणें म्हणाला, "तूंहि हिंदूच आहेस. तुझाहि ओढा तिकडेच असेल, नाहीं ?"

"अलबत, अलबत! माझ्या वडिलांचा मेंढरांचा कळपच्या कळप पळवून नेणाऱ्या जयाप्पा शिंद्यासारख्या मराठ्यांकडे माझा फार ओढा आहे. अरे हा ओढा नव्हे, जन्माचा वेढा आहे, समजलास? केव्हांतरी सूड घेईन अशी प्रतिज्ञा केली होती, ती वेळ आतां अनायासेंच चालून आली आहे, ती मी कशी दवडणार ?"

"तर मग ठीक आहे. तूं मागें पाहिलीस तीच ही लवंडी आहे अशी तुझी खात्री असेल तर तूं लुतुफखानास ही खबर कां कळवीत नाहींस ? कांहींतरी युक्ति करून तो हिला पळवून नेईल किंवा मराठ्यांकडे परत जाण्यास निघाली म्हणजे कैद करील. तो तिच्यासाठीं फारच लालचावला आहे."

"पण हें काम इतकें निकडीचें आहे कीं मला वाटतें आजची रात्र ती नबाबसाहेबांकडेच काढील. नबाबाच्या गोटांतून तिला पळवून नेणें फार अवघड आहे. ती सकाळीं परत जाऊं लागली कीं तिला सहज पकडतां येईल. आपण येथेंच कांहीं हालचाल न करतां बसून राहिलों तर ती कशासाठीं आली आहे याचा सुगावा लागेल. शिवाय तोंपर्यंत हणमंता—माझा पुतण्या—परत येईल व सर्व गोष्टींचा उलगडा होईल. जरा दमानेंच घेऊं या."

याप्रमाणें त्या दोघांचें चाललेलें संभाषण सुजाउद्दौला ऐकत उभा राहिला व कोण बोलत आहेत तें पाहण्यासाठीं कंबरेस बांधलेला पेशकबज काढून हळूच चार बोटें कनाथ कापून तो पाहूं लागला. तेथें त्यास ते दोघे

बोलणारे चिलीम ओढीत अंगावर पांघरुणें गुरगुटून बसलेले त्यास दिसले. त्यांची पाठ सुजाकडे होती. चिलीम ओढतांना फक् फक् आवाज करीत जाळ झाला त्या वेळीं त्या दोघांचे चेहरे सुजास दिसले.त्यांतील एक नजीबखानाचा हेर बिरबल होता. त्यास पाहतांच नबाब चपापला. लालननें भाऊसाहेबांचा खलिता दिला त्या वेळेपासून त्याच्या डोक्यांत विचारांचा गोंधळ उडालेला होता; त्यातच नजीबखानाचा हेर पाहतांच अधिकच भर पडली. बिरबल हा नजीबखानामार्फत शहाच्याहि विश्वासांतला होता. वझिरातीसाठीं चाललेली चुरस बिरबलास पूर्ण अवगत होती. शहास जर भाऊसाहेबांकडील हेर आपल्याकडे आला आहे ही बातमी कळली, किंवा बिरबलानें ती भडक स्वरूपांत व विकृत स्वरूपांत नजीबखानास सांगितली तर! पुढील गहजब त्यांस आतांच दिसूं लागला. त्यांतच हा वकील म्हणजे एक बाईमाणूस आहे व लुतुफखान तिला पकडण्यासाठीं टपून बसला आहे! तेव्हां आपण त्याला जबाब देण्याची घाई केली नाहीं व तिच्या हातांत आपला लेखी जबाब नाहीं ही खुदानें आपल्यावर खैर केली असें म्हणून त्यानें खुदाचे आभार मानले. शत्रूशीं पत्रव्यवहार करण्यास शहाची परवानगी होती परंतु जी बातमी मिळेल ती जेव्हांच्या तेव्हांच शहाला कळविली पाहिजे अशीहि त्यांची शर्त होती. केवळ याचसाठीं शहा असल्या चोरट्या पत्रव्यवहाराकडे कानाडोळा करीत असे. परंतु आतांची सुजाउद्दौल्याची वागणूक मर्यादा ओलांडून चालली होती याची त्याला तीव्रतेनें जाणीव झाली. सुजाची वर्तणूक वरकांतीं जरी शहास अनुकूल असली तरी आंतून तो वेगळेच कारस्थान खेळत होता. स्वतःचें हित ज्यांत जास्तींत जास्त साधेल अशा सर्व बातम्या तो शहास कळवीतच नसे. त्यांतच त्याचे दक्षिणेकडील दोस्त भाऊसाहेब यांचा कांहीं कार्यभाग साधणार असला तर तो तेवढा साधूं देत असे. परंतु आजची बातमी फारच महत्त्वाची होती. आजच्या बातमीवर दुराणीच्या सैन्याचे प्राण अवलंबून होते, व ही गोष्ट शहास कळविणें अत्यंत आवश्यक होतें. ती जर शहास नंतर कळली तर शहा सुजाउद्दौल्याला जाब विचारल्याशिवाय राहाता ना! शिवाय बिरबलचा पुतण्या हणमंता मराठ्यांकडे बातमी काढण्यास गेला होता त्याच्याकडूनहि ही बातमी शहाला लवकरच कळणार! म्हणजे सर्वच प्रतिकूल गोष्टी एकत्र होऊन शहाला आपलें कपट कळणार. उत्तर

हिंदुस्थानी जर विजयी झाले किंवा मराठ्यांचा उद्यां पराभव झाला तर शहा आपली चटणी उडविणार हें सुजाला स्पष्ट कळून चुकलें. अशा संभ्रमांत सुजा पडला असतांना तिकडे बिरबल विचार करीत होता, "आतां या नजीब-खानास काय करावें! दारु पिऊन बेफाम झाला नसता तर कांहीं तरी हिकमत योजून शहापर्यंत ही बातमी केव्हांच पोंचविली असती!"

शेवटीं, सुजाउद्दौल्याच्या मनाचा निश्चय झाला. भाऊसाहेबांस लेखी कांहींच कळवावयाचें नाहीं, तोंडीं आश्वासन मात्र भरपूर द्यावयाचें आणि त्याच्या वकिलाची तावडतोब रवानगी करावयाची. त्यानंतर आपणहि शहाकडे त्वरित जाऊन त्याला हें सर्व वर्तमान जाहीर करुन मोकळें व्हाव-याचें! उद्याच्या लढाईचा रागरंग दिसेल तसें उद्यां वागावयाचें असा विचार पक्का करुन तो पुढें जाण्यास निघाला. इतक्यांत त्याला "बिरबल-काका, अहो बिरबलकाका—" अशा कोणी तरी मारलेल्या हाका ऐकूं आल्या व बिरबलहि उठून उभा राहून हणमंताला खुणावून म्हणत होता, "अरे असा इकडे ये, ओरडूं नको!" तेंहि दिसलें.

सुजाउद्दौल्यानें आपल्या हातांतील लखोटा फाडून टाकून त्याच्या चिंध्या चोळामोळा करुन इकडे तिकडे पसरुन फेंकून दिल्या व लालन व महिपतराव बसलीं होतीं त्या तंबूकडे घाईघाईनें जाण्यास निघाला.

...सुजाउद्दौला आलेला पाहतांच लालन उठून उभी राहिली. तिला सलाम करावयासहि सवड न देतां सुजा म्हणाला, "मिरझाजान, तुम्ही आतां येथें एक क्षणभरहि थांबूं नका. तुम्हांला पकडण्याचा दुष्मनांचा बेत चालला आहे. तुमच्याकडे लेखी जबाब देण्यास देखील फुरसत नाहीं. भाऊ-साहेबांना सांगा, तुमची सर्व हकीकत कळली. तुमच्यावरील संकट पाहून मी फार दिलगीर झालों आहें. अल्लाची मर्जी असेल तर माझ्या हातून तुमचें जेवढें बरें करतां येईल तेवढें मी करीनच याची खात्री बाळगा. अफगाण लोकांपेक्षां तुम्ही मला खात्रीनें प्रिय आहांत. मी तुम्हांलाच जास्त चाहतों. तुम्हांला यश यावें अशीच माझी इच्छा आहे व ईश्वराजवळ मी तशीच प्रार्थना करीन." येवढें बोलत असतानांच सुजाला इतका गहिंवर दाटून आला कीं त्याच्या तोंडांतून पुढें शब्दहि बाहेर पडेना. चारदोन क्षण स्वस्थ

राहून शेवटीं लालनला तो म्हणाला, "माझा विश्वासू जमादार वेणीमाधवसिंग तुम्हांस पोंचविण्यास येईल. अल्ला तुमचें संरक्षण करो!"

नबाबाचें हें उत्तर ऐकून व त्यांतील भावना पाहून लालन व महिपतराव आश्चर्यचकित झालीं. परंतु प्रसंग जाणून त्यांनीं जाण्याची तयारी केली.

सुजाउद्दौला तेथून निघाला तो काशिराज पंडिताकडे गेला व त्यास म्हणाला, "पंडतजी! वेणीमाधवसिंगाला सांगा मिरझाजान व त्याच्या-बरोबरची मंडळी यांना अताईखानाच्या चौकीबाहेर सुरक्षित पोंचवून दे. आणि माझाहि घोडा तयार करून आणण्यास सांगा."

सुजाची नेहमींची शांत वृत्ति पालटून त्याला येवढा कावराबावरा झालेला त्याच्या दिवाणानें क्वचितच पाहिला असेल. त्यानें विचारलें—

"हुजूर, येवढी काय नवीन खबर मिळाली? आपण येवढे कावरे-बावरे कां झालां?"

"पंडतजी, प्रकरण अगदीं गळ्याशीं येऊन भिडलें आहे. हजारों कामें सोडून मला आधीं शहाकडे गेलें पाहिजे."

सुजाचे ते शब्द ऐकतांच काशिराजाच्या हातांतील तपकिरीची चिमूट तशीच राहून तो आश्चर्यानें सुजाकडे पाहतच राहिला!

सुजाउद्दौला मात्र घोडा तयार होऊन आला आहे असें कळतांच तत्काळ शहाकडे जाण्यास निघाला. एक वेळ त्याच्या मनांत विचार आला, भाऊसाहेबांच्या वकिलाला परत बोलवावें व त्याचा शिरच्छेद करून मगच शहाकडे जावें. परंतु कसाहि असला तरी त्याचा भाऊसाहेबांशीं स्नेह होता. आपले भडकणारे विचार त्यानें ताळ्यावर आणले व घोड्यास इशारा करून चालूं लागला.

त्या वेळीं पहाटेच्या कोंबड्याचें पहिलें आरवणें त्याच्या कानीं पडलें.

● ● ●

## प्रकरण २१ वें :

सुजाउद्दौल्याच्या गोटांत बिरबल जाटास त्याचा पुतण्या हणमंता येऊन भेटल्यावर लालन नबाबाच्या गोटांत आली आहे ही खबर लुतुफखानाला

कळवावी म्हणून बिरबल तेथून उठून घाईघाईनें लुतुफखानाच्या तंबूकडे गेला. खान बरेंचसें मद्यपान करून घोरत पडला होता व बाहेरच्या बाजूस त्याचा विश्वासू शिद्दी नोकर झमरूड झोंपला होता. बिरबलनें झमरूडास उठवून सांगितलें कीं आतांच्या आतां माझी व खानसाहेबांची गांठ पडली पाहिजे. काम फार महत्त्वाचें आहे. झमरूडनें आंत जाऊन लुतुफखानास जागें केलें व सांगितलें कीं, ' बिरबल जाठ आला आहे, तो तुमची तावडतोब गांठ घ्यावयाची आहे असें म्हणत आहे. लुतुफखान अर्धवट जागा झाला होता. त्यानें घाबरत बाबरतच विचारलें, " कां ? कशासाठीं ? येवढ्या रात्रीं असें काय निकडीचें काम निघालें आहे ? " झमरूड म्हणाला " काय काम आहे व त्याची येवढी निवड कां हें तो कांहीच बोलत नाहीं. तुमचीच भेट घ्यावयाची असें म्हणतो आहे." लुतुफखानानें शेवटीं बिरबलास आंत धाडून देण्यास सांगून तो उठून बसला.

" क्यों बिरबल, भर झोपेंत तूं मला कां उठविलेंस ? असें काय निकडीचें काम आणलें आहे ? "

" खानसाहेब, लाखों रुपये मोलाच्या दोन बातम्या मजजवळ आहेत. तुमच्या कानांवर घालाव्या म्हणून येवढ्या अपरात्रीं आलों. पहिली म्हणजे त्या बैरागिणीची बातमी. तिला मी आतांच आपल्या छावणींत पाहिलें आहे. तिला पकडून देण्याचा मार्ग दाखविला तर काय बक्षीस द्याल ? "

बैरागिणीचें नांव काढतांच लुतुफखानाचे डोळे आनंदाने चमकले.

" बिरबल, पुतळ्यांचा ढीग करून त्यांत तुला गाडून टाकीन, मग तर झालें कां नाहीं ? आतां जर ती पोरगी माझ्या हातांत सांपडली तर ती कशी सुटून जाते तें पाहतों. बोल, बोल लवकर—कोठें आली आहे ती ? "

" या घटकेस सुजाउद्दौला नबाबाच्या गोटांत आहे. "

लुतुफखान हें वाक्य ऐकतांच आश्चर्यानें थक्क झाला. " काय म्हणतोस ? नबाब वजिराच्या गोटांत ? त्या लवंडीचा तिकडे शिरकाव तरी कसा झाला ?"

" ती पुरुषाचा वेष घेऊन भाऊसाहेबांचा निरोप घेऊन आली आहे. मी तेथें गेलों असतांना माझ्या दृष्टीस पडली, म्हणून मी धांवतच तुम्हांस सांगावयास आलों आहे. "

" पण ती या घटकेस तेथें अजून असेल हें कशावरून ? "

" मी आलों त्या वेळीं ती खुद्द नबाबाजवळ होती. "

लुतुफखानानें हे शब्द ऐकतांच मत्सरबुद्धीनें डोळेच फिरविले. त्याचा आवाजहि अगदीं बसून थिजून गेला. त्याचा मूळचाच पठाणी हुच्च्यां स्वभाव त्यांतच ही लालनची लालसा ! मग काय विचारतां ? हातवारे करीतच तो मिशीवर ताव मारून म्हणाला, " नबाबाजवळ नाहींतर नबाबाच्या बाजवळ असली तरी तिला खेंचून आणीन. ती आमची लवंडी आहे. तुम्हांकडे पळून आली आहे, तिला आमच्या स्वाधीन करा असा खडसावून निरोप पाठवूं का ? सुभेदार आणि वजीर झाला म्हणून त्याला मी भितों कीं काय ? झमरूड, चल आण माझा जामानिमा आणि त्या दोस्त महंमदला बोलावून सांग, निवडक विश्वासू असे वीस जवान तयार करून घेऊन ये."

त्यांचें हें बोलणें पुरतें व्हावयाच्या आधींच बिरबल त्याचा हात धरून म्हणाला, " खानसाहेब, तुम्हांला त्यांच्या तंबूपर्यंत जाण्याचें कांहीं कारण पडणार नाहीं. घटका दोन घटकांच्या आंतच ती मराठ्यांच्या छावणीकडे परतण्यासाठीं निघेल. तिच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठीं मी माझा पुतण्या हणमंता तेथें पाळतीवर ठेवून आलों आहें. तिला वाटेंत अनायासेंच पकडतां येईल. शिवाय, दुसरी महत्त्वाची बातमी तुम्हांस सांगावयाची आहे ना ? ती ऐका तर खरी..."

" कोणती दुसरी बातमी ? बोल, बोल लवकर. "

" सुजाला तिनें मराठ्यांकडील बातमी सांगितलीच असेल, ... हणमंतानें आतांच मराठ्यांच्या छावणींतून बातमी आणली आहे कीं उद्यां उजडायच्या आंत मराठे लढाईसाठीं बाहेर पडणार, यांत तिळमात्र संशय नाहीं. "

लुतुफखान ही दुसरी बातमी ऐकतांच खरोखरच थक्क होऊन गेला. लढाई केव्हांतरी लवकरच होणार यांत कोणालाच संशय वाटत नव्हता. पण तो प्रसंग आतां उद्यावरच येऊन ठेपला हें कळतांच त्याचें धाबें दणाणून गेलें. जरा वेळानें तो म्हणाला, " ही खबर देण्यासाठीं नबाबसाहेब शहाकडे गेलेच असतील. "

" नाहीं, अजून ते आपल्या गोटांतून हालले नाहींत. त्यांचें आणि भाऊसाहेबांचें आंतून काय संगनमत झालें आहे कोणास ठाऊक; परंतु उद्यां मराठे अकस्मात् चढाई करणार यांत संशय नाहीं. मराठ्यांकडील कांहीं

मंडळी नबाबसाहेबांकडे येऊन बसलीं आहेत, व अजूनपर्यंत शहाकडे कोणी गेलें नाहीं. खुद्द नबाबहि अजूनपर्यंत मी इकडे येईपर्यंत गेले नव्हते. "

"तर मग आतां काय करावें म्हणतोस ? "

" दुसरें कांहीं करावयाचें नाहीं. शहाकडे आपण दोघेजण जाऊं व सर्व वर्दी त्यांना देऊं म्हणजे झालें. शहाकडून मला बक्षीस मिळेल व तुम्हांस अधिकार मिळेल. "

" आग लागो तुझ्या बक्षिसाला आणि अधिकाराला ! तोंपर्यंत ती बैरागीण पोरगी हातांतून निसटून जाईल त्याची काय वाट ? समज, शहानें मला तेथेंच थांबवून घेतलें तर तिला कैद कसें करतां येईल ? आणि अशा आणीबाणीच्या वेळीं शहा मला कसला सोडतो आहे ? "

यावर बिरबलास कांहीं उत्तर सुचेना. लुतुफखानहि या पेंचांतून कशी वाट काढावी याचा विचार करूं लागला. एकीकडे नोकरी व नांवलौकिक तर दुसरीकडे आसक्ति आणि लालसा, असें द्वंद्व त्याच्या मनांत उभें राहिलें. शेवटीं आसक्तीचा विजय झाला. तो बिरबलला म्हणाला, " ती बैरागीण माझा तिरस्कार करते तर मीहि माझा अधिकार लाभावरील लोभ सोडून देऊन तिला मी जबरदस्तीनें वश करून घेणार ! आतां ती माझ्या हातांतून सुटून जाणार नाहीं असा मी जबरदस्त प्रयत्न करणार; मग त्याचा परिणाम कांहींहि होवो ! बिरबल, तूंच जलदीनें जाऊन शहाला सर्व वर्दी दे व त्याच्याकडून मिळणारें बक्षीसहि एकटाच मिळव. असा बिकट प्रसंग आहे तरी त्या बैरागिणीचा शोध लावून तिला मी पकडून आणतों. तुझा हणमंता तिच्या पाळतीवर ठेवला आहेस ना ? तो मला कोठें भेटेल ते सांग म्हणजे झालें. "

" हणमंताला मी पुरभय्याच्या चौकीजवळ थांबण्यास सांगितलें आहे. तुम्हीं तेथेंच जा व त्यांना तीन वेळां हांक मारा म्हणजे तो येईल. "

याप्रमाणें त्यांचें बोलणें होऊन बिरबल तेथून निघाला. बिरबल गेल्यानंतर लुतुफखान आपल्या तयारीस लागला. त्यानें भराभर हुकूम सोडून त्याचे स्वतःचे दोन खास घोडे होते ते तयार करविले व लढाईचा सर्व जामानिमा चढवून घोड्यावर बसण्यासाठीं रिकिबींत पाय ठेवणार तोंच एक स्वार मोठ्या त्वरेनें तेथें आला व म्हणाला " खानसाहेब, आपणांला खाविंदांनीं

तावडतोब बोलाविलें आहे, फार जरूरीचें काम आहे. मराठ्यांच्या छावणी-कडून ताजी खबर आली असून सर्व सरदारांस तावडतोब बोलावण्याचा मला हुकूम मिळाला आहे. ”

तो निरोप ऐकतांच लुतुफखान रागारागानें आपल्या दाढीचे केस उपटूं लागला. रागाच्या आवेशांत त्यानें जवळच्या लोकांना शिव्या दिल्या. त्याच वेळीं अंधारांतून एक मनुष्य धांवत धांपा टाकीत तेथें आला तो ओरडतच आला होता. “ बिरबलकाका ! तुम्ही कोठें आहां ? ती बैरागिण गेली. पार निघून गेली ! तुमच्या मागोमाग ती सुजाच्या छावणी-बाहेर पडली; ती एव्हांना किती दूर गेली असेल कोणास ठाऊक !

लुतुफखानाकडे बिरबल आला होता त्याच वेळीं लालन परत जाण्यासाठीं बाहेर पडली होती. लुतुफखानाला नशीब अनुकूल नव्हतें. एकीकडे अहमद-शहाचें बोलावणें—तें चुकविलें तर आपलीं शंभर वर्षेंच भरणार ! अहमद-शहाकडे गेलों तर ही हातची शिकार निसटून जाणार. रागाच्या भरांत त्यानें लालनला लाख शिव्या दिल्या. त्याच्या मनांत तिच्याविषयीं जो प्रेमाचा अंकुर होता त्याचें द्वेषाच्या वृक्षांत रूपांतर झालें. तीन वेळां हातीं लागून सुद्धां आपली कामना सफळ झाली नाहीं. यामुळें त्याचें मन खट्टू व उद्विग्न झालें. शेवटीं विचारानें विकारावर विजय मिळविला—लालनचा पाठलाग सोडून तो शहाकडे जाण्यास निघाला.

● ● ●

## प्रकरण २२ वें :

दुराणीशीं निकराची लढाई करावयाची असा दरबारांत निश्चय ठरल्यावर श्रीमंत भाऊसाहेबांनीं सर्व सरदार मंडळीस केशरी पोषाख व विडे देऊन दरबार बरखास्त केला त्याच रात्रीची गोष्ट. दरबारांत मनांतील सर्व गोष्टी उघड करून बोलतां येत नाहींत म्हणून रात्रीं भोजन आटोपल्यावर भाऊ-साहेबांनीं आपल्या खास प्रेमांतील अशी जिवलग मंडळी बोलावली. सदाशिव-पंत पुरंदरे, महिपतराव चिटणीस, पानसे, अंताजी माणकेश्वर अशीं शेलकी

शेलकी मंडळी जमा झाल्यावर उद्यांच्या लढाईची व्यवस्था ठरविण्यासाठीं भाऊसाहेबांनीं बोलण्यास सुरुवात केली. "तुम्ही सर्व जण माझे जिवलग मित्र, जिवास जीव देणारे व राज्याचे आधारस्तंभ आहां. माझ्या हातून चुका झाल्या असतील. हा विश्वासराव–नानासाहेबाचा बहिश्चर प्राणच–– माझ्या आग्रहास्तव त्यांनीं मजबरोबर पाठविला. माझ्या अपयशामध्यें याला विनाकारण मीं ओढलें असें आतां मला वाटतें."

भाऊसाहेबांचें मर्मभेदक भाषण ऐकतांच सर्व मंडळीस गहिंवर आला. यापूर्वीं कोणत्याहि संकटाला जो वीर तिळमात्रहि डगमगला नव्हता, तो सदाशिवरावभाऊ विश्वासरावासाठीं कळवळून बोलत आहे व निरवा-निरवीचीं भाषणें करीत आहे हें पाहून एखाद्या पाषाणहृदयी माणसालाहि वाईट वाटलें असतें. आणि आतां सभोंवतीं जमलेले सर्वजण–आपलीच मंडळी–ती सर्व क्षणभर दुःखांत चूर होऊन गेलीं.

या गंभीर प्रसंगीं विश्वासराव मात्र सदाशिवरावभाऊंपेक्षां अधिक निधड्या छातीचा वीर आहे असें लोकांना वाटलें. तो म्हणाला, "काका, मला माझ्या जिवाची काळजी वाटत नाहीं. वास्तविक नानांना या घोर प्रसंगाची वार्ता कळली असेल तर त्यांना मात्र क्षणभरहि चैन पडावयाचें नाहीं. असें तुमचें बंधुप्रेम आहे. तुमच्यासारखा बंधु त्यांना फिरून मिळणार नाहीं, म्हणून मला वाईट वाटत आहे." हें प्रेमळ परंतु उदास भाषण ऐकतांच भाऊसाहेबांनीं विश्वासरावाला मिठी मारली व मनांत अतिशय श्रमी झाले.

"बाळा, आम्ही तर जिवावर उदार होऊन अग्निकाष्ठें भक्षण करण्यास सिद्ध झालों आहों. पण तुझ्यामुळें जीव कालवतो. आतां तो श्रीसांबच तुझें संरक्षण करो."

"काका, तुम्ही जवळ असलां तर मला कोणाचें भय आहे? या गोष्टी यदृच्छेनेंच घडून येतात. त्याचा मला मुळींच खेद वाटत नाहीं. जन्माला येऊन कांहीं पराक्रम करून दाखविण्यास मला ही सुवर्णसंधीच मिळाली आहे. रुमशामच्या बादशाहतींत जाऊन तेथील चौथाई सरदेश-मुखीच्या वतनाच्या सनदा व आपल्या हक्काचा ऐवज वसूल करावयाचा अशी आपण पुण्यास उमेद धरली होती ती आतां सफळ होण्यास संधि नाहीं का आली? नाहींतर कुरुक्षेत्रावर आपले देह पडावयाचे असले तरी

स्वर्गप्राप्तीचाच योग आहे. याहून अधिक काय हवें? मजविषयीं आपण अणुमात्र चिंता करूं नये. परमेश्वराच्या कृपेनें व वडिलांच्या पुण्याईनें आपण शत्रूचा फडशा पाडूं. त्यांतूनहि नेमानेम कांहीं चुकायचा नाहीं. आपण त्याला भिऊन कोठें जाणार? आपल्यासारख्या वडिलांच्यापुढें मी जास्त बोलावें असा माझा अधिकार नाहीं, पण प्रसंग आला म्हणून बोललों."

विश्वासरावांचें आवेशयुक्त भाषण ऐकून भाऊसाहेबांस बरें वाटलें. चुलत्या-पुतण्यांचें भाषण ऐकून जनकोजीप्रभृति सरदारांचीं मनेंहि उल्हसित झालीं व त्यांनींहि उद्यांच्या लढाईची काळजी करूं नये; शत्रूचा पाडाव करण्याच्या प्रयत्नांत यत्किंचितहि कसूर होणार नाहीं असा धीर मिळून सभा संपली.

× × ×

याच वेळीं लालन सुजाउद्दौल्याचा निरोप घेऊन परत निघण्याच्या तयारींत होती. ती परत छावणींत येईपर्यंत मराठ्यांच्या गोटांत काय हालहवाल चालली होती तें पाहूं. खरें म्हणजे दुराणीशीं मुकाबला करावयाचा म्हणजे सडी फौजच यावयास हवी होती. परंतु मराठ्यांना विजयाची इतकी खात्री होती कीं फौजेसमवेत कुटुंबकबिला घेऊन काशीयात्राहि अनायासेंच करून येऊं अशा विचारानें बहुतेक सरदारमंडळींनीं आपापली घरचीं मंडळी घेतली होती. त्यामुळें फौजेबरोबरच, शागीर्द, कारकून, कुणबिणी इत्यादींची गर्दी उडाली होती. छावणींत लढाऊ फौजेबरोबरीनेंच बुणगेहि होते. त्यामुळें मराठ्यांच्या गोटांत जेव्हां दुष्काळ पडला तेव्हां सर्वांचेच अतोनात हाल झाले. भाऊसाहेबांनीं शेवटचा दरबार बरखास्त झाल्यावेळीं तमाम लोकांस खर्चास वांटून दिल्यामुळें लष्करांत चैनबाजी व धुमश्चक्री उडालेली आपण पाहिली आहे.

दरबार व रात्रीची खास सभा संपवून भाऊसाहेब व विश्वासराव आपा-पल्या डेऱ्यांत गेले खरे; परंतु उद्यांच्या विचारानें त्यांना झोंप येणें शक्य नव्हतें. दोन प्रहर रात्र उलटल्यानंतर त्यांना स्वस्थ पडून राहवेना-- त्यांनीं आपल्या सरदारांना तयार होण्याचे निरोप पाठविले व स्वतःहि रणसंग्रामावर जाण्याची सिद्धता करून सर्व आयुधांनिशीं सज्ज झाले.

याप्रमाणें सर्व सिद्धता होत असतांना भाऊसाहेबांचें चित्त एका गोष्टीकडे अगदीं वेढून गेले होतें. आपण सुजाकडे पाठविलेला वकील अद्यापि परत

कसा आला नाहीं ? त्याला इतका उशीर लागण्याचें कारण काय ? सुजानें बेइमानी करून त्याला शहाच्या स्वाधीन तर केलें नसेल ना ? का त्याची भेट घेण्याचेंच टाळलें असेल ? का भेट होऊन खालीं त्याचा जबाब आणतेवेळीं त्याला दगाफटका झाला असेल ? अशा नाना प्रकारच्या शंका त्यांच्या मनांत येऊन उभ्या राहिल्या. त्यांना असेंहि वाटलें कीं सुजाउद्दौल्यानें आपलें इमान राखून या लढाईंत जय मिळण्यासाठीं कांहीं मसलत सुचविली असेल आणि ती जर वेळेवर समजली नाहीं तर तिचा उपयोग काय, या गोष्टीचीहि त्यांच्या मनाला चुटपुट लागली. पुढें काय करावें तें सुचेना. रणवाद्यें वाजूं लागलीं होतीं. तीं बंद करवून लढाईचा हुकूम परत घेतां येईना. इतक्यांत त्यांना सुचलें कीं लालन परत आली असली तर ती प्रथम शिंद्यांच्याकडे जाईल. म्हणून त्यांनीं शिंद्यांकडे चौकशीस एक स्वार पाठविला, पण तिचे-बद्दल अजून तिकडे कांहींच बातमी नाहीं असें कळलें, तेव्हां निराश होऊन पुढें टाकलेला पाय मागें घ्यावयाचा नाहीं असें ठरवून परमेश्वरचिंतन करून त्यांनीं रणभूमीवर जाण्याचा निश्चय केला.

रणवाद्यांचा गजर होतांच सर्व सरदार आपापल्या सेनेसह भगव्या झेंड्या-पाशीं गोळा झाले, त्या वेळीं प्रत्येकाच्या मनांत एकच विचार होता. शिव-रायाची पुण्याई, रावसाहेब व चिमाजीअप्पा यांची कर्तबगारी आपल्या अंगीं यावी व त्यांनीं स्वर्गांतून आम्हांला शाबासकी द्यावी." अशा विचारानें भारून गेलेले सरदार आपापल्या जागीं जाऊन उभे राहिले.

भाऊसाहेब ज्या हत्तीवर बसणार होते त्याच्या अंबारीस चारी बाजूंस चार परशू बांधले होते. भाऊसाहेबांचा पराक्रमहि प्रति परशुरामासारखा होता. दुसऱ्या एका सुसज्ज हत्तीवर विश्वासराव जाऊन बसले.

भाऊसाहेबांच्या सैन्यामध्यें हौदे अंबाऱ्या घालून सजविलेले दहा हत्ती होते. इराणच्या बादशहानें नजर केलेला एक पांढरा हत्ती होता त्यावर जरीपटका चढविला होता. बाकीच्या हत्तींवर जनानखान्यांत पार्वतीबाई, लक्ष्मीबाई, नाना फडणीसांची आई वगैरे स्त्रियांनीं फार आक्रोश केला म्हणून त्यांनाहि बरोबर घेऊन चालले होते.

मराठ्यांची फौज घराबाहेर पडली त्या वेळीं रात्र दोन तीन घटका राहिली होती. दक्षिणेकडे अशुभसूचक शेंडेनक्षत्र आपला फरारा पसरून

उगवत होतें. त्याच्याकडे पाहिलें न पाहिलेसें करून सरदारांनीं आपआपली फौज ठरलेल्या जागीं दुराणीच्या छावणीसमोर उभी केली. भाऊसाहेब फौजेच्या मध्यभागीं येऊन उभे राहिले व आपल्या अफाट सेनासागरावर नजर टाकली, तेव्हां तो सागर कटाक्षमर्यादेबाहेर पसरला आहे असें त्यांना दिसलें. क्षणमात्र त्यांची वृत्ति थक्क होऊन गेली.

• • •

# प्रकरण २३ वें :

सुजाउद्दौल्यानें भाऊसाहेबांच्या खलित्यास दिलेला लेखी जबाब फाडून टाकून लालनबरोबर केवळ तोंडीं निरोप पाठविल्यावर तो दुराणीच्या डेऱ्याकडे घाईघाईनें निघून गेला, त्या वेळीं अहमदशहा नेहमीच्या परिपाठाप्रमाणें आपल्या छावणीचा बंदोबस्त व हालचाल पाहण्यास बाहेर पडला होता. तो परत आल्यानंतर त्यानें आपल्या नोकरास सांगून ठेविलें कीं पहाटे मला लवकर जागें करा व घोडा तयार करून ठेवा. शहा उठून पहाटेचा नमाज पढण्यास निघतो तोंच नवाब वझीर सुजाउद्दौला भेटीस आल्याची वर्दी त्याला मिळाली. शहानें त्यास आंत बोलावलें व 'काय खबर आहे ?' म्हणून विचारल्यानंतर सुजाउद्दौल्यानें मराठ्यांकडील हकीकत कळविली. शहाला प्रथम ती बातमी खोटी वाटली व आपल्या फौजेला चकविण्याकरितां कांहीं तरी व्यूह रचिला असावा असें वाटलें. परंतु सुजाउद्दौल्यानें भाऊसाहेबांकडून आलेला खलिताच त्यांस वाचावयास दिल्यानंतर त्याची खात्री झाली व त्यानें फौजेस तयार होण्याचे डंके वाजविण्याचा हुकूम दिला. आपल्या प्रमुख सरदारांना बोलावणें पाठविलें. त्यांतच छुतुफखानालाहि बोलावणें आलें.

बादशहा सरदारांबरोबर आपल्या छावणीमध्यें हिंडत असतांच पहाट झाली. आपल्या छावणींत लढाईच्या तयारीची गडबड व गलबला चालू आहे आणि मराठ्यांच्या छावणींत मात्र सामसूम दिसत आहे, हें पाहून त्याला थोडेंसें आश्चर्यच वाटत होतें. थोडा पुढें होतो न होतो तोंच त्याला घोड्यांच्या टापांचा खडखडाट ऐकू आला. त्याबरोबर त्यानें बरोबरच्या

लोकांना 'हुश्शार!' असा हुकूम दिला. कोणाच्या घोडेस्वारांच्या तुकडीचा आवाज आहे याचा विचार मनांत येतो न येतो तोंच, घोस महंमद–लुतुफखानाचा जमादार–पुढें आला. त्याच्या मागोमाग घोडेस्वार होते. त्यांच्या हातांत नुकतीच कापून आणलेलीं माणसांचीं ४१५ शिरें होतीं. घोड्यावर लूटहि बरीच दिसत होती व घोडेस्वारांच्या मागोमाग दावणीनें बांधलेलीं हिंदूंचीं बायकापोरें होतीं. त्यांच्या कलकलाटानें दुराणी-शहा रागावला. शांततेच्या काळांत बायकापोरें कैद केलीं तर शहा जबर शिक्षा करी; परंतु आजचा मायना सर्वच भिन्न होता. मराठे वीर आपल्यावर तुटून पडणार अशा वेळीं बायकांपोरांच्या कैफियती ऐकण्यापेक्षां त्याला सरदारांचे जबाबच जास्त मोलाचे वाटले. म्हणून तो घोसमहंमदला म्हणाला "काय खबर आहे?" बादशहाची शांत वृत्ति पाहून घोसमहंमदच्या जिवांत जीव आला व म्हणाला "काफर लोक छावणी सोडून करनोळाकडे पळत सुटले आहेत; त्यांच्या छावणीच्या पिछाडीला टेहेळणीसाठीं गेलों होतों तेव्हां करनोळच्या रस्त्याला पाण्याच्या लोंढ्यासारखा माणसांचा लोंढा लोटला आहे. त्यांच्यावर आम्हीं हल्ला केला व सांपडलीं तेवढीं माणसें कैद करून ही लूटहि आणली आहे."

बादशहा सुजाउद्दौल्याकडे वळून म्हणाला, "नबाबसाहेब, ही खबर ऐकलीत ना? तुम्ही म्हणतां, आज मराठे खात्रीनें लढाईला बाहेर पडणार. आणि ते तर कर्नोळकड पळूं लागले आहेत!" सुजाउद्दौला जरासा गडबडूनच गेला व म्हणाला, "मला जी खबर मिळाली ती मी आपणांस दिली." सुजाउद्दौल्यास अधिक खुलासा करण्याची गरजच राहिली नाहीं; कारण मराठ्यांच्या तोफखान्याचा धाड् धाड् आवाज तेवढ्यांतच कानावर आला. त्याबरोबर सुजाउद्दौला आवाज येणाऱ्या दिशेकडे हात करून म्हणाला, "हुजूर, मराठ्यांकडील हवा काय आहे ती आपणच समक्ष पाहावी."

"तुम्ही सांगितलेली खबरच बरोबर दिसत आहे. मराठे प्रथम आमचे-वर चालून आले हें फार चांगलें झालें. या वेळीं खुदा आपल्यालाच यश देणार."

दुराणी शहाचा वजीर शहावलीखान म्हणून होता. त्याचा मुलगा अताईखान रात्रीं गस्त घालण्यासाठीं छावणीबाहेर गेला होता तो आपल्या

छावणीकडे पळत सुटला होता. त्याच्या पिछाडीस रणखांब व खुलें मैदान होतें. त्याच्यापलीकडे एक उंचवट जागा होती तेथें गारद्यांच्या संगिनी चमकूं लागल्या. त्यांनीं अताईखानाच्या तुकडीवर तोफेच्या गोळ्यांचा पाऊसच पाडला.

शहानें ही सर्व परिस्थिति पाहून आपल्या सरदारांना जागा नेमून दिल्या व त्या सर्वांना एकदमच कूच करण्याचा हुकूम केला. मग येथून जेथून दोन्ही फौजांची मांडणी व हालचाल चांगली स्वच्छ दिसेल अशी एक उंचवट्याची जागा पाहून तेथें आपला गाशा टाकवला व ईश्वराची अनन्य-भावानें प्रार्थना केली.

× × ×

मराठ्यांच्या फौजेवर दोन्हींकडून मारा केल्याखेरीज ते यमुनेकडे वळणार नाहींत म्हणून दुराणी अबदाली खुलें मैदान धरून बसला होता. त्या मैदानांत आल्याखेरीज मराठ्यांना शहाच्या फौजेशीं मुकाबला करणें शक्य नव्हतें. लढाईतील विजयाची खात्री म्हणजे आपण निवडूं त्या रणक्षेत्रावर लढाई होणें हें तत्त्व शहाला या वेळीं अनुकूल होतें. कदाचित् आपल्याला रणमैदान सोडावें लागलें तर आपली तटबंद छावणी ढालीसारखी उपयुक्त ठरेल, असा शहाचा आडाखा होता. उजव्या अंगाला रोहिले, त्याच्याशेजारीं शहाबलीखान व त्यांच्या मागें नबाब सुजाउद्दौला अशी अबदालीच्या सैन्याची रचना होती. डाव्या अंगाला अफगाण फौज व नजीबउद्दौल्याचे घोडे व बाणांचे मोर्चे असे होते.

नजीब व सुजा यांच्यामागें अफगाण फौज होती; ते राखीव स्वारासारखे उपयोगांत आणावयाचे अशी अबदालीची कल्पना होती.

अफगाण फौज तयारींत उभी आहे असें पाहतांच मराठ्यांचा पहिला विचार फळी फोडून पलीकडे पार जाण्याचा होता तो सोडूनच द्यावा लागला. मराठी फौज पुढें पुढें येत उजवीकडे सरकत चालली होती. तोफखाना, उंटावरचे सुतरनाले, जेजाले वगैरे युद्धसामुग्री उजवीकडेच सरकत होती. अफगाण लोकांनीं मराठ्यांच्या तोफखान्यास उत्तर म्हणून आपलाहि तोफखाना सुरू केला. दोनहि सैन्यांमध्यें अंतर मात्र बरेंच असल्यामुळें गोळा नेमका लागू होत नव्हता. मराठी फौजेनें आपली छावणी सोडल्यावर

टाणीं धरून उभें राहण्याचा जो बेत होता तो फिसकटला व सर्व फौजच हळूहळू पुढें सरकत सरकत अफगाण फौजेपासून पांचसहाशें कदमांच्या अंतरावर आली. भाऊसाहेब व विश्वासराव यांचे हत्तीहि धिमेपणानें चालतच होते मराठ्यांनीं हल्ल्याची नवीन पद्धति स्वीकारली तरी अफगाण सैन्य आपली रांग सोडून मागें हटेना. इब्राहिमखानाच्या कवायती फौजेनें रोहिल्यांच्या रांगांमधून हाहाःकार उडवून दिला. त्यांच्या बंदुकीच्या फैरींनीं मुसलमान सैनिकांची फार हानि झाली. रोहिल्यांच्या ढालींचा व तलवारींचा इलाज चालेनासा झाला. शेवटीं गारद्यांचा मार असह्य झाल्या-मुळें ते सैरावैरा पळूं लागले. रोहिला सरदार हाफीज रहिमत व बरखुदार-खान यांनीं आपल्या लोकांना चेतविण्याची शर्थ केली तरीहि त्यांची वाताहात होऊन फौजेची रांग मोडली.

शत्रुसैन्याची फळी फुटलेली पाहतांच समशेरबहादूर व गायकवाड 'हरहर महादेव' अशी गर्जना करीत त्यांच्यावर घसरले व अंगावर कांटा उभा राहील इतकी शत्रूची कत्तल केली. रोहिल्यांचा सरदार हाफीज रहिमत जखमी होऊन मेण्यांतून पळून जाऊं लागला. गायकवाडी भालाइतांचा हा पराक्रम पाहून दुराणीशहानें आश्चर्यानें तोंडांत बोट घातलें! शहानें त्यांच्यावर हल्ला करण्या-करितां दोन टोळ्या दोन्ही बाजूकडून पाठविल्या, त्यांचाहि समाचार घ्यावयास इब्राहिमखान गारदींचीं पलटणें तयारच होतीं. अशी लढाईची धुमश्चक्री तीन तासपर्यंत सतत चालू होती. गारदी व गायकवाड यांचा इकडे हा पराक्रम चालू असतांना दुसरीकडे मराठ्यांनीं एकच आनंदाची आरोळी ठोकली.

शहावलीच्या अफगाण फौजेवर मराठ्यांच्या मुख्य सेनेनें हल्ला चढवून त्यांना बेजार केलें होतें. दुराणी फौजेची फळी फुटली होती, मराठ्यांच्या रणगर्जना विजयोत्साहाच्या उन्मादानें आकाश दणाणून टाकीत होत्या. शहावलीचा मुलगा अताईखान दोन वेळ मराठ्यांच्या फौजेचा मार सहन करून ठासून उभा होता तोहि फौजेस आवरूं शकला नाहीं. पळणाऱ्या सेनेच्या झुंडीच्या झुंडी एकामागून एक जाऊं लागल्या. लढाईच्या या धुमश्चक्रींत विश्वासरावांच्या अंबारीचा हत्ती गजानन गर्दींत शिरून धुळीनें व धुरानें

संपूर्णपणे माखून गेला होता. तोंडानें आपल्या वीरांना प्रोत्साहनपर गर्जना करीत विश्वासराव बंदुकींतून गोळ्यांच्या फैरी झाडीत होते. ते पुढें सरकत सरकत खुद्द शहावलीखान जखमी होऊन पडला होता तेथपर्यंत आले. शहाचा शूर मुलगा अताईखान आपल्या पित्यास वांचविण्यासाठीं त्यांस घोड्यावर बसवीत होता. त्यास विश्वासरावांची गोळी बरगडींत लागली. याच अताईखानानें गोविंदपंत बुंदेले यांचें शिर कापून नेऊन श्रीमंत भाऊसाहेबांना नजर म्हणून पाठविलें होतें. पुत्राची दुरवस्था पाहून शहावलीखान मूर्च्छित होऊन पडला. त्याला त्याच्या सैनिकांनीं उचलून नेण्याच्या घाईगर्दींत अताईखानाच्या शवाच्या चिंधड्या झाल्या.

मराठ्यांना विजयश्री मिळणार असा रंग दिसूं लागल्याला जणूं दृष्ट लागली. दुराणी अबदालीनें राखीव म्हणून ठेवलेल्या सैन्यापैकीं कांहीं ताज्या दमाच्या तुकड्या शहावलीखानाच्या सैन्याला मदत करण्यासाठीं धांवून आल्या. लढाईचा रंग बदलणार असें दिसूं लागलें. विश्वासरावाचा हत्ती बराच पुढें गेला होता. तो माघारा फिरून परत आपल्या सैन्यांत येऊन उभा राहिला. भाऊसाहेबहि हत्तीवरून उतरून आपल्या आवडत्या घोड्यावर स्वार होऊन लढूं लागले. अशी तुंबळ रणधुमाळी दोन प्रहरपर्यंत चालू होती. अबदालीचे दोन शूर पुत्र धारातीर्थीं पडले. त्याची वार्ता त्याला कळतांच त्याचा दुःखावेग अनावर झाला. अल्लाचें नामस्मरण करून निकराचा हल्ला चढविण्याचीं वाद्यें वाजविण्याचा त्यानें हुकूम दिला.

• • •

## प्रकरण २४ वें :

मराठे वीर शहावलीखानाचा पराभव करून विजयी झाले. यामुळें त्यांना यमुना नदीवर जाण्याचा मार्ग खुला झाला. मराठी सैन्य तसेंच नेटानें पुढें जातें तर दुराणीची ताजी फौज डावीकडेच राहिली असती. परंतु त्याच सुमारास विठ्ठल शिवदेव विंचूरकर अपार पराक्रम करीत धारातीर्थीं पडल्याची वार्ता मराठी सैन्यांत वायुवेगानें पसरली. त्याच वेळीं पंडित काशिराज सुना-

उद्दौल्याच्या पाटीशीं उभा असून त्याचा चेहरा उतरून गेला होता. दिवाण काशिराज इब्राहिमखान गारदाकडील बातमी आणण्यासाठीं जात असतांनाच अफगाण लोक परत फिरूं लागलेले त्याला दिसले होते. नबाब सुजाउद्दौल्यानें भाऊसाहेबांकडे निरोपहि पाठविला, 'आपली फत्ते पोहुर्ते [illegible] झाली आहे. माझ्या दोस्तीविषयीं आपण निश्चित असा.' निरोप दिल्यानंतर त्याला रणांगण सोडण्यास कांहींच हरकत नव्हती. परंतु तो पूर्ण धिमेपणानें वागणारा मुत्सद्दी थोड्याच वेळांत लढाईचा नूर पालटलेला पाहतांच त्या धूर्त कावेबाज मुत्सद्द्याला आपण धिमेपणानें वागलों हाच शहाणपणा झाला असें वाटलें. कारण...कारण...एकाएकीं एक विपरीत प्रकार घडत होता. मल्हारराव होळकरांची फौज आपली जागा सोडून मागें परतावयास लागली होती, ती सुजाच्या समोरून तिरप्या रेषेनें भाऊसाहेबांच्या पिछाडीस वळसा घालून पूर्वेकडे चालली. होळकरांवर हल्ला करावा असाहि विचार त्याच्या मनांत आला, परंतु होळकरांचा विचार नक्की कळेतोंपर्यंत त्यानें कांहींच करावयाचें नाहीं असें ठरविलें.

मराठी सैन्य एखाद्या वावटळीप्रमाणें चक्राकार फिरत फिरत पुढें चाललें होतें आणि दुराणी फौज त्यांचा आवेश पाहून मागें हटत होती. शहा अबदालीची राखीव फौज त्याच्या लाल बिचव्याजवळ चुळबुळ करीत उभी होती. धुराच्या व धुळीच्या लोटामुळें शहाची ही फौज मराठ्यांच्या दृष्टीस पडली नाहीं.

नवाब सुजाचा निरोप आल्याबरोबर भाऊसाहेबांनीं होळकरांना कळविलें कीं, तुम्ही सुजाच्या फौजेचा रोख सोडून देऊन शहाच्या ताज्या दमाच्या टोळ्या आमच्यापुढें येत आहेत त्यांच्याशीं सामना करावा.

दोन प्रहर दिवस उलटून गेल्यानंतर नवीन फौज वझिराच्या कुमकेस आली. त्याबरोबर त्याला नवीन दम येऊन तो परत घोड्यावर स्वार झाला व त्यानें भाऊसाहेबांच्या सैन्यावर हल्ला केला. त्याच्या दोन्ही बाजूस रोहिले व अफगाण सैन्य होतें, त्यामुळें मराठ्यांच्या बाजूस तडे गेले व परिणाम भयंकर होणार हें दिसूं लागलें.

भाऊसाहेबांनीं पिछाडीकडे नजर वळविली तरी होळकर आपल्या जागेवर नव्हते, येवढेंच नव्हे तर माघारी चालले होते; तें पाहून भाऊसाहेब त्रैतागानें

म्हणाले, " काकासाहेब, शेवटीं तुम्ही आम्हांला सोडून चालला ना ? तरी चिंता नाहीं. आतां इतकें तरी करा कीं आमच्या बायकांना बरोबर न्या व नानांस निरोप सांगा कीं, भाऊसाहेब व विश्वासराव फौजेसुद्धां इंद्रलोकास गेले आहेत ! तुमच्या हातून कबिल्याचें संरक्षण होत नसेल तर तुम्हीं आपल्या हातानें त्यांचा शिरच्छेद करा; परंतु शत्रूंच्या हातीं त्यांना देऊं नका." मल्हाररावांना असा निरोप देऊन जवळच जनकोजी शिंदे होते त्यांनाहि म्हणाले, " शिंदे, तुम्हांलाहि जावयाचें असल्यास जा. " जनकोजी शिंदे यांचे डोळे भरून आले. प्रतापी वीर भाऊसाहेब आपल्या सरदारांची प्रवृत्ति पाहून क्षुब्ध झालेले त्यांना दिसले. त्यांनीं मोठ्या आत्मीयतेनें जबाब दिला. " श्रीमंत, आमच्या हातून तसें व्हावयाचें नाहीं. जेथें तुमचा जोडा तेथें माझें शिर. यांत रतिमात्र अंतर पडणार नाहीं. "

होळकरांना निरोप पोंचून ते काय करतात हें पाहण्यासाठीं भाऊसाहेब आतुर झाले होते. होळकरांची फौज निघून गेली. पिछाडीस " दीन दीन "ची मुसलमानी गर्जना ऐकूं आली व भाऊसाहेबांची हुजुरात फौज जेथें लढत होती तिच्या उजव्या बाजूस विजेच्या लोळासारखी अकस्मात् येऊन आदळली.

होळकरांनीं रणांगण सोडलें. लालनच्या खानगापासून कांहीं फायदा झाला नाहीं. भाऊसाहेबांच्या सभोंवतीं शत्रूच्या सैन्याचा गराडा पडला. आतां या संग्रामावरच आपली पूर्णाहुति पडणार असें त्यांना वाटलें.

त्यांनीं आपला हत्ती विश्वासरावांच्या हत्तीजवळ नेला. ते दोघे एकमेकांना कडकडून भेटले. ही आपली शेवटचीच भेट हें त्यांनीं मनोमन ओळखलें होतें. लढाईच्या धुमश्चक्रींत ते सामील झाले होते. येवढें होतें तोंच एका युसुफभाई स्वाराच्या बंदुकींतून सुटलेली एक गोळी विश्वासरावांना लागली. विश्वासराव जगण्याची आशा नाहीं असें पाहतांच त्यांना तशाच स्थितींत अंबारींत चढविलें.

भाऊसाहेब रणमदानें बेभान होऊन युद्धाच्या खाईत घुसले, ते पुन्हां कोणाला जिवंत दिसले नाहींत !

शिंद्यांनीं हरप्रयत्नांनीं आपले स्वार थोपवून धरून रणक्षेत्र सोडलें नव्हतें. या वेळीं त्यांच्याहि फौजेंत जर घबराट उत्पन्न होऊन पळापळ झाली असती,

म. ग्रं. सं. ... वाचनालय शाखा.
दा. क्र. १४६०२ नों. दि.
वि.


तर अहमदशहा त्यांच्या मागोमाग धावून येऊन सुरजमल जाटाच्या राज्यावर येऊन धडकला असता व जे कांहीं थोडे लोक पानिपतची हकीकत सांगण्यास माघारे आले त्यांचाहि मागमूस राहिला नसता. नशिबाचें पारडें फिरलें म्हणूनच केवळ पानिपतावर पराभव पत्करावा लागला. शिंद्यांच्या फौजेच्या डावीकडे एकाएकीं प्रचंड गर्जना होऊन सर्वांच्या कानठळ्या बसल्या. त्या गर्जनेनें सर्वांस निराशासागरांत नेऊन दडपलें. महादजी शिंदे रिकिबीवर उभे राहून पाहूं लागले, तों फौजेच्या मध्यभागीं हत्तीसारखे धुळीचे प्रचंड लोट चालले होते. त्या धुळीच्या अगडबंब वावटळींत भाऊसाहेब व त्यांची हुजुरात पागा गडप झाली. तें धूळिचक्र मागेंपुढें हेलकावे खात हळूहळू फाटत चाललें व पसरत पसरत अदृश्य झालें, तेव्हां भाऊसाहेब व त्यांची पागा याऐवजीं तेथें मोंगलाई बख्त्यारी लोक व लखनऊच्या नबाबाचें सिंहाच्या आकृतीचें हिरवें निशाण दिसूं लागलें.

पराभवाची वार्ता ऐकतांच लोक पळूं लागले.

तो प्रसंग पाहून महादजी व जनकोजी शिंदे यांनीं माना खालीं घालून प्राक्तनापुढें शिर नमविलें.

" जनकोजी, ग्रंथ आटोपला. तूं आणि मी दोघेच येथें राहून काय करणार ? आतां माघारें फिरावें हेंच बरें. "

" काका, मागें फिरून तरी आतां जाणार कोणीकडे ? पानिपताकडे ? "

" पानपताकडे ? म्हणजे दुराणीला खाशीच शिकार सांपडली. तो आपल्याला गट्ट केल्याखेरीज राहणार नाहीं. आतां यापुढें पानपतचें नांव नको. डाव्या बाजूनें वळसा घेऊन आपण रस्ता सुधारूं. परमेश्वराची कृपा असली तर दिल्लीच्या रस्त्याला लागूं. "

महादजीचें बोलणें ऐकून त्याप्रमाणें शिंद्यांच्या फौजेनें आपलें तोंड वळविलें. मराठी फौजेचा लोंढा पानिपताकडे चालला होता. त्यांतून वाट काढून शिंद्यांना यमुनातीर गांठावयाचा होता. जातांना त्यांनीं पुष्कळ लोकांना सांगितलें पानिपतकडे कशाला पळतां ? यमुनेच्या तीरानें दक्षिणेकडे वळा. कित्येकांस तो इशारा मानवून ते त्यांच्या फौजेंतच मिसळले.

• • •

# प्रकरण २५ वें :

लालन व महिपतराव सुजाउद्दौल्याच्या छावणींतून परत येण्यासाठीं निघाले त्यांना आडवाटेनें परत येणें प्राप्त होतें. राजमार्गानें परत आली असती तर कदाचित् भाऊसाहेब छावणींतून बाहेर पडण्यापूर्वी ती भेटूं शकली असती. भाऊसाहेबांनींहि तोच अंदाज केला होता. सुजाचें मन आपल्याविषयीं कसें आहे हें कळण्याची त्यांना फार उत्कंठा लागली होती व शेवटच्या आशेचा आधारहि तोच होता. परंतु रात्र संपत आली तरी लालन व तिच्या संरक्षणासाठीं दिलेल्या शिपायांचा पत्ता कळला नाहीं तेव्हां तिला कोठेंतरी अडथळा किंवा हरकत झाली असावी, असें वाटून त्यांचें मन निराशेंत बुडून गेलें.

मराठी फौज आतां शेवटचा हल्ला करणार अशी सुजाची खात्री होतांच त्यानें लालनला घाईघाईनें आपल्या गोटांतून काढून लावलें. लालन राजमार्गानें परत येऊं शकली असती तर ती वेळवर मराठ्यांच्या लष्करांत दाखल झाली असती. परंतु लालनला सुजाचा निरोप लवकर मिळाला नाहीं व लढाईचें विघ्नहि त्यांच्या आड आलें.

लालन व तिच्याबरोबरीच्या शिपायांना लढाईचा समय इतका जवळ येऊन भिडला आहे हें ध्यानांतहि आलें नाहीं. लालन व महिपतराव यांचीं मनें उद्विग्न झालीं होतीं व त्यांना निष्कारणच हुरहूर लागली होती. त्यांना भीति वाटत होती ती, दुराण्यांच्या टोळ्या रात्रीची गस्त संपवून परत येण्याचीच! मोठ्या अंधारांतून व कडाक्याच्या थंडींतच ते एका मोठ्या रस्त्यांतून आडमार्गानें चालले होते.

लालन उदासीन व चिंतामग्न झाली होती. जी कामगिरी तिच्यावर सोंपविली होती ती बजावून येण्यासाठीं तिच्या मनाला प्रथम तरतरी व उत्साह वाटत होता, पण तो नाहींसा झाल्यावर तिचें मन व शरीर शिथिल झालीं. तिच्या पाहण्यांत व ऐकण्यांत जें आलें होतें त्याचा निष्कर्ष तिला पूर्णपणें कळून चुकला होता. आपली कामगिरी सफाई बुडाली आहे. मोठ्या कामगिरीच्या अयशस्वीपणाचा परिणाम एकाच व्यक्तीला भोगावा लागत नसून त्याचे दूरवर घोर परिणाम होतात. या विचारानें तिची निराशा व अपमान

शत्रुप्रिय झाले होते. आपल्या प्रिय व्यक्तीचें काम यशस्वी करावयाचें या ईर्ष्येनें ती कामाला बाहेर पडली होती. परंतु आतां दारुण निराशा दिसतांच तिला परत महादजी शिंद्यांची सारखी आठवण होत होती. 'माझें काय व्हावयाचें तें प्रियकराबरोबरच व्हावें; जगायचें तर त्यांच्या सहवासांत—मरावयाचें तर त्यांचें काम यशस्वी करण्याकरिता. माझा सर्व जीव तुमच्या चरणीं अर्पण केला आहे.' असेच विचार तिच्या मनांत सारखे येत होते

माहेपतराव लालनच्या मागोमागच येत होते वेणीमाधवसिंग पुढें चालला होता. तो आपल्या घोड्याची लगाम खेंचून धरून एकदम ओरडला, "अरे बापरे! अरे रामा! हें पाहिलेंत का पुढें काय दिसत आहे तें!" त्याबरोबरच सर्वांची नजर तिकडे लागली. समोर लढाईची धुमश्चक्री चालली होती. अताई-खानाच्या दुराणी स्वारावर इब्राहीमखान गारदीचा तोफखाना आग ओकत होता.

आतां पुढें कसें करावें याचा सर्वांना विचार पडला. मराठ्यांकडील तोफांची सरबत्ती चालू झाली होती. वेणीमाधवसिंग म्हणाला, "आतां उजाडलें आहे. तुमची फौजहि सावध होऊन लढाईला तयार झाली आहे. तेव्हां तुम्ही एक लांब चक्कर घेऊन आपल्या फौजेची पिछाडी गांठा. आम्ही आपल्या धन्याकडे परत जातों." लढाई सुरू झालेली पाहताच त्याच्या अंगात शौर्याचें वारें भरलें होतें. लालनला व तिच्या सहप्रवाशांना अजून तो हवा होता. पण अशा वेळीं तूं जाऊं नको म्हणणें माहिपतरावांना बरें दिसेना. शिवाय लढाईला तोंड लागलेंच आहे अशा वेळीं शत्रूच्या माणसावर किती विश्वास ठेवावयाचा असाहि विचार त्यांच्या मनांत आला व त्यांनीं वेणीमाधवसिंगाला परत जाण्यास संमति दिली.

मराठ्यांची फौज उभी होती तिकडे जावयाचें कीं पानिपतची छावणी गांठावयाची असा महिपतरावांनीं प्रश्न करतांच लालन म्हणाली, "मला माझ्या धन्याकडे घेऊन चला." ती टोळी जसजशी पुढें जाऊं लागली तसतसा लढाईचा गलबला अधिकाधिक वाढू लागला. त्या गर्दीत आपण सांपडूं नये म्हणून मोठ्या सावधगिरीनें ते मराठ्यांच्या उजव्या बाजूच्या पिछाडीस येऊन पोंहोचले. त्याच बाजूस जनकोजी शिंदे व त्यांची फौज होती. लालननें शिंद्यांच्या फौजेकडे नजर फिरविली तों स्वारांच्या टोळ्या जिकडे तिकडे दौडत

आहेत असें तिच्या दृष्टीस पडलें. शिंद्यांची फौज दुराणीच्या गोळीबाराला जाब देत होती. पण त्याचा फारसा परिणाम होत नव्हता. लालन उभी होती त्या बाजूस शिंद्यांचे कडवे व एकांडे शिपाई उभे होते. त्यांचें मुख्य हत्यार म्हणजे भाला. त्यांनीं लढण्याची पराकाष्ठा केली होती, परंतु मराठी फौज पाण्याचा लोंढ्यासारखी पळत सुटली तेव्हां त्यांचीहि दाणादाण उडाली. महिपत-रावांनीं हें दृश्य पाहिलें तेव्हां त्यांच्या अनुभवी नजरेला पराभव दृष्टीस पडला

आतां पुढें काय करावें अशी लालनला व तिच्या मंडळींना काळजी लागली. घोडी पुढें घालून जेथें महादजी शिंदे असतील तेथें जावें असें लालनच्या मनांत होतें. परंतु महिपतरावांना तो विचार पसंत नव्हता. त्यांनीं शेवटीं असें ठरविलें कीं, भाऊसाहेबांचा तळ कोठें असेल तेथें जावयाचा प्रयत्न करावयाचा. महिपतरावांचा विचार शेवटीं लालनलाहि मानवला. लढाई सुरू होण्यापूर्वी सुभ्याचा निरोप तोंडींच पोंचवावयाचा होता तो आतां काम येवढें बिकटाला गेल्यानंतर कळविला काय किंवा न कळविला काय, सारखेंच. शेवटीं एक स्वार भाऊसाहेब जेथें असतील त्यांना भेटून आपण परत आल्याचें कळवावयाचें ठरवून महिपतराव व लालन शेजारच्या एका झाडींत विश्रांती-साठीं उतरलीं.

• • •

## प्रकरण २६ वें :

पानिपतवर मराठ्यांचा पराभव झाला तरी शिंद्यांची कीर्ति मात्र निष्कलंक राहिली. सेनानायकामध्यें जे गुण असावे लागतात ते सर्व त्यांच्या ठिकाणीं होते. पराभव दिसत असतांहि त्यांनीं एक शेवटचा जोराचा प्रयत्न करावयाचा म्हणून त्यानीं पायदळ सैन्यास जोरानें पुढें घुसावयाचा आदेश दिला व घोडे-स्वारांच्या टोळ्या त्यांच्या लागोपाठ उजव्या डाव्या बाजूस धांवल्या. शिंद्यांचा निकराचा हल्ला यावेळीं येईल अशी दुराणीच्या फौजेची कल्पना नव्हती यामुळें या हल्ल्यानें त्यांचें फारच नुकसान झालें. परंतु महादजी शिंद्यांचा विचार दुराणी फौज फोडून पलीकडे जाण्याचा होता तोहि यशस्वी झाला नाहीं. याच सुमारास भाऊसाहेब धारातीर्थी अदृश्य झाले ही बातमी महादजींना

समजली, त्याबरोबर साक्षात् मृत्यूनें आपल्या कानांत कसला तरी भयानक घंटारव केला आहे असें त्यांना वाटलें. महादजी जनकोजी शिंद्यास म्हणाले, " जनकोजी, चला, साराच ग्रंथ आटोपला. आपण दोघेच मागें राहून काय करणार ? आतां माघारी परतावें हें बरें. "

" होय, काकासाहेब; पण माघारी म्हणजे कोणीकडे ? पानपताकडे ? म्हणजे दुराणीस आपली चांगलीच शिकार सांपडेल. आतां आपण मुसलमान लोक लढण्यांत गुंतले आहेत तोंच डाव्या बाजूस वळून निघून जावें. परमेश्वराची कृपा असेल तर आपण दिल्लीस पोहोंचू. नाहींतर इब्राहीमखानाच्या कंपूस जाऊन मिळूं "

दोघां शिंद्यांनीं आपल्या घोड्यांना टांचा देऊन अनीना ढिल्या सोडल्या आणि 'हरहर महादेव' अशी मोठ्यानें गर्जना करून आपल्या लोकांना घेऊन झपाट्यानें रणमैदान तुडवीत चालले. दक्षिणी फौज पानिपतकडे पळत सुटली होती, त्यांना मागें टाकून शिंद्यांना यमुनेकडे जावयाचें होतें. शिंद्यांची फौज जातां जातां सर्वांना इशारा देत चालली होती. " यमुनेकडे चला—दिल्लीकडे चला. " कित्येकांस त्यांचा इशारा पटून त्यांच्या टोळ्या शिंद्यांच्या फौजेंत मिसळल्या. ज्यांना हा इशारा पटेना, त्यांना बाजूस सारून शिंदे पुढें चालले होते. पळाची आरडाओरड व पाठीमागें लागलेल्या मुसलमानी सैन्याचा 'दीन दीन 'चा आवाज यांनीं वातावरण धुंद होऊन गेलें होतें.

लढाईमुळें उठलेला धुरळा, श्रम व संताप यांनीं महादजींचा आवाज अगदीं बसून गेला होता. घशाला कोरड पडली होती. तरीदेखील चालून येणाऱ्या दुराणी टोळीवर हल्ला करून त्यांची फळी फोडून मराठी शिंदेशाही सैन्य पुढें चाललें होतें. मुसलमानी फौज मराठ्यांचा पराभव झाला अशा घमेंडींत चालली होती. त्यांना चांगलाच धक्का बसला. शिंद्यांची फौज आपली फळी फोडून पार निघून गेली. हा प्रकार एका निमिषार्धांत झाला. तेवढ्यांत शत्रूकडील एका घोडेस्वारानें आपल्या रुंद पात्याच्या तलवारीनें महादजीवर वार टाकला तो शिंद्यांच्या मांडीला लागला. घोडेस्वाराकडे पाहतांच महादजी शिंद्यांनीं त्यास ओळखलें. तो वेणीमाधवसिंग होता ! महादजी शिंद्यांची आरोळी ऐकतांच शिंद्यांचे घोडेस्वार त्याच्याभोंवतीं जमले व त्याचा एका क्षणांत निकाल लावला. अशा रीतीनें शिंद्यांची फौज आपलें अवसान सावरून

घरीत यमुनेकडे जात असतां त्यांना एका अफगाण घोडेस्वारांच्या टोळीनें गांठलें. त्यांनीं आपली टोळी लगेच अर्धचंद्राकार पसरवून शिंद्यांच्या फौजेला गराडा दिला.

परंतु या अफगाण टोळींची डाळ शिजली नाहीं. शिंद्यांच्या मागें इतर मराठी सेनेच्या टोळ्या होत्या त्यामुळें शिंद्यांच्या फौजेला मागें सरून हल्ला करतां येईना व अफगाणांच्या साहाय्यास जेव्हां पठाणी टोळया आल्या तेव्हां तर शिंद्यांच्या फौजेचाहि धीर सुटला. काळ्या पोशाखाचा अफगाण रिसाला मराठ्यांवर घसरला तेव्हां हातघाईची लढाई सुरू झाली, त्यांतच महादजी व लुतुफखान यांची दृष्टादृष्ट झाली. दोघांना परस्परांची चांगली ओळख पटली. मूळच्या वैरांत व्यक्तिविषयक वैराची भर पडल्यामुळें दोघांनींहि एकमेकांवर घोडे फेकले. दोघांचें जणूं द्वंद्व युद्धच जुपलें.

लुतुफखान लढाईच्या कैफांतच होता. मिशांवर ताव देत तो महादजी शिंद्यांच्या अंगावर धावून येत असतांनाच ओरडला, " काफीर ! आतां मात्र तुझीं शभर वर्षे भरलीं. माझा अपमान केल्याचें उसनें आतां मी फेडून घेणार आहे. तुझ्यावर फिदा झालेली ती गोसाव्याची पोरगीच नव्हे तर तुझा इतर जनानखानाहि मी आता कैद करून नेतों व त्या सर्वांना गुलाम करतों."

" ए सुव्वर, माझ्या माणसांची काळजी तुला नको. हा तुझा काळ तुझ्यापुढें उभा आहे. समशेरीच्या टप्प्यांत आलास कीं तुला दाखवितोंच इंगाटा."

त्या दोघांची हातघाईची झुंज चालली असतांनाच घोसमहमदहि तेथें येऊन पोंहोचला. त्याला आपल्या मदतीस येण्याची मनाई करण्यासाठीं लुतुफखान म्हणाला, " मिया घोसमहंमद, याचा समाचार मी घेणार आहे. तूं मागें सरक."

मागें एकदां याच दोघांचें द्वंद्व घोसमहंमदानें पाहिलें होतें व त्यांत महादजींची झालेली सरशीहि त्याला आठवत होती. म्हणून त्या दोघांच्या मध्येंच उभा राहून त्यानें शिंद्याशीं लढण्यास सुरवात केली. घोसमहंमद व लुतुफखान दोघेजण एकदम महादजींशीं झगडत असलेले पाहून जनकोजी शिंदे त्वरेनें पुढें झाले व त्यांनीं घोसमहंमदावर हल्ला केल्याबरोबर तो गतप्राण होऊन पडला. लुतुफखान येवढ्या अवधींत पुढें होऊन महादजींशीं लगट करू

लागला. महादजींनीं तलवारीनें एक सपाटा उगारला. त्याचा प्रतिबंध लुतुफखानानें आपली तलवार मध्येंच घालून केला. त्याबरोबर महादजींची तलवार मोडून पडली. लुतुफखानास अधिकच चेव येऊन धांवतच तो महादजींच्या जवळ आला व म्हणाला, "काफर, आतां कोणाचीं शंभर वर्षे भरलीं आहेत हें पाहून घे." त्यांच्या तीक्ष्ण तलवारीचा आघात झेलण्यासाठीं महादजींनीं आपली मोडकी तलवार पुढें केली, त्याबरोबर लुतुफखानाच्या तलवारीनें महादजींच्या हृदयाऐवजीं मांडीचा लचका तोडला. मांडीतून भळभळ रक्त वाहू लागलें. क्षणमात्र मूर्च्छित होऊन त्यांनीं बिजलीच्या मानेवर आपलें डोकें टेकलें. आतां आणखी एक वार कीं आपला निकाल लागणार असा विचार त्यांच्या मनांत आला.

येवढ्यांत एक चमत्कार झाला. लुतुफखानानें उगारलेल्या तलवारीस मागून कोणीतरी हिसका दिला. लुतुफखान वळून पाहणार तोंच त्याचा घोडा बिचकला व दोन पायांवर उभा राहिला. त्याबरोबर लुतुफखान घोड्यावरून खालीं कोसळला व घोड्याखालीं पडला. तेथून बाहेर पडण्याचें अवसान त्याला राहिलें नाहीं. ही संधि साधून एक पठाण शिपाई पुढें सरकला व त्यानें लुतुफखानाला गच्च दाबून धरलें व एक गुडघा जमिनीवर टेकून लुतुफखानाच्या छातीवर तो ओणवा झाला.

लुतुफखानानें सर्वांग चिलखतानें झांकून घेतलें होतें, त्यांत कोठें जंबिया खुपसण्यास जागा आहे हें पाहण्यासाठीं तो पठाण निरखून पाहूं लागला, तेव्हां लुतुफखानास त्याची ओळख पटली. तो दाऊद होता. "खानसाहेब, ज्या कंगाल काफर पोरीसाठीं मला शहाकडून कडक शिक्षा करवून छावणी-भर धिंड काढवली, तो हा तुझा दुस्मान दाऊद तुझ्या छातीवर बसला आहे." याच दाऊदला लालनला धरून आणल्याबद्दल लुतुफखानानें शिक्षा करविली होती ही गोष्ट तो विसरला नव्हता. दाऊद सूडाची संधि पाहात होता. ती संधि त्याला या वेळेस मिळाली. महादजींचें व लुतुफखानाचें युद्ध जुंपलें होतें. त्यांतच लुतुफखानाला सुऱ्यानें भोसकण्याची तो संधि पाहात होता. दाऊद लुतुफखानाला ठार करणार इतक्यांत लुतुफखानाचा विश्वासू शिद्दी नोकर झमरूड पुढें झाला. त्याबरोबर खानास सोडून देऊन दाऊदनें पोबारा केला.

महादजी शिंदे मूर्च्छित होऊन पडले असतां लुतुफखानावरील प्राणसंकट टळलें असें पाहतांच ख्वाजारोशन महादजींचा पूर्ण निकाल लावावा म्हणून त्यांच्या अंगावर धावत गेला, तोंच त्यास एका मराठा शिपायानें अडविलें. दुसरा एक शिपाई महादजींच्या विजली घोड्याचा लगाम धरून आवळून व त्यावर उडी मारून बेशुद्ध महादजींना आपल्या हाताचा विळखा घालून त्यांना घोड्यावर नीट बसते केले आणि हळूच कानांत म्हणू लागला—"सरकार, तुम्हांस काय झालें ? आपल्या पायाची दासी आपणाजवळ आहे. जरा डोळा उघडून पाहा तरी." हे शब्द ऐकतांच महादजी जणूं कांहीं झोंपेंतून जागे झाल्याप्रमाणें खडबडून जागे झाले व स्वाराकडे पाहू लागले. तो स्वार म्हणजे आपली प्राणप्रिया लालनच आहे अशी त्यांची खात्री झाली. अर्धवट ग्लानींतच ते म्हणाले, "लालन तूं इकडे कशी ? इकडे कशाला आलीस ? लवकर, या घोड्यावर स्वार होऊन पळ."

"सरकार, आपणास येथें या अवस्थेंत टाकून देऊन मला कसें जाववेल ?"

"लालन, माझ्यावरचा बिकट प्रसंग आलेला तूं पाहिलासच ! माझ्या हातांत शस्त्र राहिलें नाहीं. भाऊसाहेब व विश्वासराव धारातीर्थीं पडले. मी आतां हें काळें तोंड घेऊन कोठें जावें ?"

"आपल्या हातानें माझी काय ती वाट लावावी, मग तुम्हीं आपल्या जिवाचें काय हवें तें करा. पण मला आतां सोडून जाऊ नका." हें भाषण ऐकतांच महादजींचे डोळे अश्रूंनीं भरून आले. लालननें आपल्या डोईचा फेटा सोडला, महादजींच्या मांडीची जखम बांधली व आपली तरवार त्यांच्या हातांत दिली.

"लालन ! खरोखरीच तूं एक असामान्य स्त्री आहेस ! तुझें शौर्य, प्रसंगावधान व धारिष्ट पाहिलें म्हणजे धन्य वाटतें. तुझ्या या वेषानें मला परत जीवदान दिलें आहे." असें म्हणत त्यांनीं विजलीवर आपलें आसन स्थिर केलें व आसपास काय चाललें आहे तें पाहूं लागले. महिपतराव झमरूडशीं अजूनहि लढतच होता. लुतुफखानास त्याच्या स्वारांनीं शुद्धीवर आणलें होतें. महादजी व लालन पाहतांच तो ओरडला, "अरे, ही तर काफर बैरागीण. आतां खासच मी हिला सोडणार नाहीं." महिपतराव लढता लढतां महादजींना म्हणाले, "सरकार, आतां या घोडीवर उडी मारा आणि पार निघून जा."

महिपतराव व त्याच्याबरोबरचे तीन चार स्वार होते, त्यांना महादजी म्हणाले, " तुम्हीहि आतां येथें राहूं नका. आमचेमागून चला. "

महादजी व लालन बिजलीवर बसले व तोंड फिरवून त्यांनीं तिला जोरानें चलण्याचा इशारा करतांच तिनें झपाट्यानें उडी मारून पळ काढला.

० ० ●

## प्रकरण २७ वें :

लालन आणि महादजी बिजलीवर बसून पळून जाऊं लागले त्याबरोबर लुतुफखानाची टोळी त्यांच्यामागें 'दीन दीन' आरोळ्या ठोकीत पाठलाग करूं लागली. दिवसभराच्या श्रमानें व पळापळीनें बिजली अगदीं थकून गेली होती. लुतुफखान व त्याची टोळी हळूहळू त्यांच्या जवळ येत होतो. लुतुफखानाच्या आरोळ्या त्यांना स्पष्टपणें ऐकू येऊं लागल्या. त्याचा शब्द ऐकतांच महादजींनीं आपली तरवार सांवरून धरली. बिजलीची मान एकदां कुरवाळली व लवकर चलण्याचा इशारा केला. बिजली म्हणजे एक तेजदार हिरकणी होती. तिनें आपल्या धन्याचा मनोदय ओळखला आणि एकवार हिसून चौखुरी उडया टाकीत तीरासारखी निघाली. त्याबरोबर महादजीच्या आशला पुन्हा अंकुर फुटला. लढाईच्या श्रमानं अंग गरम झालं हात त हळू हळू थंड होऊं लागले व पुढील विचार करविण्यास त्यांना हुरूप आला.

बराच वेळ धांवल्यानें खरें म्हणजे बिजली थकून गेली होती. एकाच ठिकाणीं दोन स्वार वाहून नेण्याच्या श्रमामुळें तिच्या पोटाचा नगारा झाला होता. मधून मधून तिला विसावा देण्यासाठीं महादजी लगाम जरा आंखडून धरीत, परंतु या सर्व उपायांचा कांहींच परिणाम होत नव्हता. लुतुफखान हळूहळू जवळच येत होता.

पाठीवरच्या भारानें बिचारी बिजली वांकून गेली तरी तिनें आपल्या मालकास दगा दिला नाहीं. तिला दम छाटत नव्हता. हींव आल्यासारखें कांपरें तिला भरलें. नाकातोंडांतून फेस गळूं लागला. एखाद्या दुखणेकऱ्या-प्रमाणें ती कण्हूं लागली. तिला मधून मधून महादजी चुचकारून धीर देत

होते म्हणूनच ती पळत होती. लुतुफखानाच्या घोड्याचाहि दम कायम नव्हता. परंतु तो अस्सल तुर्की नर आपल्या जिवाची पर्वा न करतां पाठलाग करीत होता. त्यांच्यामधील अंतर हळूहळू कमी पडूं लागलें होतें.

शिंद्यांना वाटेंत अनेक मराठे स्वार पळतांना दिसत होते. त्यांना ते आपल्या पाठीवरील मुसलमानांना अडवून धरा म्हणून ओरडून सांगत होते. परंतु सर्वजण जिवाच्या आशेनेंच पळत असल्यामुळें त्यांच्याकडे कोणी फारसें लक्ष देत नव्हतें.

लुतुफखानाचें सारें लक्ष लालनकडे लागलें होतें. संध्याकाळपर्यंत पाठलाग चालू ठेवल्यानंतर मात्र लुतुफखान आतां अगदीं जवळ आला आहे— त्याच्या स्वारांची आरडाओरड स्पष्टपणें ऐकूं येऊं लागली म्हणून महादजींनीं मागें वळून पाहिलें. लुतुफखान धुरळ्यानें माखून गेला होता, त्यांच्याप्रमाणेंच तोहि अतिश्रमानें थकून गेला होता. अतिशय तहान लागल्यामुळें त्याचा आवाज बसला होता. तरी घोगऱ्या आवाजानेंच तो हातवारे करीत ओरडला— आतां संभाळ — तू माझ्या सपाट्यांत सांपडला आहेस."

इकडे लालनला महादजीशिवाय कोणीच दिसत नव्हतें. बिजलीला दोघांना घेऊन पळण्याचें त्राण राहिलें नाहीं. हें पाहून लालन शेवटीं म्हणाली, "सरकार, मला मारून टाकून खालीं फेकून द्या व तुम्ही तसेंच पुढें पळा, म्हणजे निदान तुमचा तरी बचाव होईल." महादजींच्या डोळ्यांत पाणी आलें. ऊर भरून आल्यामुळें त्यांना स्पष्टपणें बोलवेना. "लालन, मेलों तर आपण दोघें मरूं. वांचलों तर दोघें वांचू." येवढेंच ते कसेबसे उद्गारले.

एवढ्यांत बिजलीला ठोकर लागली त्याबरोबर लालनजवळ एक कट्यार होती ती उपसून तिनें महादजींनीं तिला आवळून बांधलेला शेला कांपून अलग झाली व तिने जमिनीवर उडी मारली. उडी मारल्याबरोबर प्राण जाईल अशी कल्पना होती.. परंतु ती केवळ मूर्च्छित झाली. शिंद्यांना पुढें काय करावें हें सुचेनासें झालें. त्यांनीं बिजलीला थांबवण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यांत ती दहावीस हात पुढें गेली. बिचारी लालन एका ओढ्याच्या उतरणीला अस्ताव्यस्त पडली.

महादजींच्या घोड्यावरून लालन खालीं पडलेली पाहतांच लुतुफखानाला

आनंद झाला. ज्या वस्तूसाठीं त्यानें एवढा आटोकाट प्रयत्न केला, ती आतां ताब्यांत मिळालीच म्हणून त्याला कृतार्थता वाटूं लागली.

महादजींची बिजली उभी राहतांच त्यांनीं लालनला हांका मारल्या. परंतु ती बेशुद्धावस्थेंत असल्यामुळे त्यांच्या हांका तिला ऐकू गेल्या नाहींत. ऐवढ्या अवधींत लुतुफखान घोड्यावरून उडी टाकून लालनपुढें जाऊन उभा राहिला. ती जरी निपचित पडली होती तरी श्वासोच्छ्वास चालू आहे असें पाहतांच त्यानें तिचा हात धरला व तशीच उचलून घोड्यावर घेऊन तत्काळ पळविली !

महादजींनीं हा सर्व देखावा पाहिला व आपली व बिजलीची काय अवस्था आहे याचा विचार न करतां बिजलीवर उडी मारून तिला टांच मारली. बिजलीनें खालीं मान घालून एक उडी मारली. परंतु...परंतु ती एकदम तोंडावर कोलमडून पडली ती उठलीच नाहीं वरचा स्वार मानेवरून खालीं घसरला. त्याच्या डोळ्यांसमोर एकदम अंधारी आली. बिजली स्वामिसेवेंत शांत झाली ! महादजी बेशुद्ध होऊन पडले.

शिंद्यांच्या सैन्यांतील भिस्ती राणेखान बैल हांकीत तेथें आला. त्यानें कोण पडलें आहे, हें पाहण्यासाठीं खालीं डोकावलें व आपले मालक आहेत हें ओळखून त्यांना बैलावर घालून कसातरी पळ काढून दिल्ली गांठली.

• • •

## प्रकरण २८ वें :

लुतुफखानानें लालनला पळवून नेलें तेव्हां ती शुद्धीवर नव्हतीच. तशाच स्थितींत त्यानें तिला आपल्या तंबूंत नेऊन ठेविलें व तिच्यावर आपला विश्वासू नोकर झमरूड याचा सक्त पहारा ठेवला. लालन शुद्धीवर आली म्हणजे हळूहळू तिच्याशीं गोड बोलून व सौम्यपणानें वागून तिला आपण वश करून घेऊं असें त्याला वाटत होतें लालन मात्र शुद्धीवर आल्यापासून आपण वाघाच्या जबड्यांत सांपडलों आहोंत असें कळून चुकली. लुतुफखानानें तिच्या खाण्यापिण्याची व्यवस्था उत्तम ठेवली होती. परंतु तिचें मनच जाग्यावर नव्हतें, म्हणून तिला त्याचें कांहींच वाटत नव्हतें. देहभानावर

आल्यापासून तिच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह अविरत वाहत होता. आपला प्राणेश्वर आतां कोठें असेल, त्याची अवस्था काय झाली असेल, आपल्याला लुतुफखानानें कैद केलें, म्हणजे त्यांच्या लढाईचा शेवट भीषण असाच लागला असेल असे विचार तिच्या मनांत येऊन तिचें अंतःकरण शतशः विदीर्ण होऊन जात असे. क्षणभर डोळा लागला तरी महादजींची मूर्ति तिच्यापुढें उभी राही, जागे झाल्यावर आपली दीन अवस्था पाहून ती अधिकच खिन्न होत असे.

लुतुफखानानें लालनच्या सेवेसाठीं दोन रजपूत माणसें ठेवलीं होतीं, त्यांच्यामार्फतच तो लालनचा शोध घेत असे. पण तिची अवस्था ऐकून त्याला कोणतीच आशा दिसेना. तिनें अन्नपाणी वर्ज्य केलें, कोणाशी बोलेना, अशी तिची अवस्था होऊन गेली. खानाला तिची वृत्ति कळली. परंतु इतक्या कष्टानें व मेहनतीनें मिळविलेल्या स्त्री-रत्नाची त्याला कोठून दया येणार! त्यानें निश्चय केला कीं, एकवार आपण स्वतःच तिची भेट घेऊन तिची समजूत करावी व ती राजीखुशीनें आपल्याबरोबर येईलसें करावें.

लुतुफखानानें मोठ्या उमेदीनें व डौलानें तिच्या खोलींत प्रवेश केला, त्या वेळीं लालन परमेश्वराचें चिंतन करीत होती. पावलें कुणाचीं वाजतात म्हणून तिनें डोळे उघडून मान वर करून पाहिलें तों लुतुफखान दिसला. त्याला पाहतांच तिचा देह थरथरा कांपू लागला आणि "अरे राम! आतां माझें काय होणार! कोणता दुर्धर प्रसंग माझ्यावर ओढवला आहे! देवा, आतां तुझ्यावांचून मला या संकटांतून सोडवणारा दुसरा कोणी नाहीं." असे उद्‌गार तिच्या तोंडांतून बाहेर पडले. ते ऐकतांच लुतुफखान तिला म्हणाला—

"प्यारी, असें काय फार मोठें संकट तुझ्यावर ओढवलें आहे? ज्या देवाचा तूं धांवा करीत आहेस त्यानेंच मला पाठविलें आहे."

लालननें आपलें तोंड दोन्ही हातांनीं झांकलें व मूकस्वरानें देवाची प्रार्थना चालविली. नंतर जरा वेळानें म्हणाली—

"खानसाहेब, माझ्यासारख्या अनाथ अबलेला कां बरें छळतां? मी एक यःकश्चित् वैराग्याची पोर. तुम्ही खानदानी सरदार. तुमचा व माझा धर्म निराळा. या भिकारणीवर पापदृष्टि ठेवण्यांत तुमच्या जातिवंतपणालाच

कलंक लागेल. तुम्ही माझा नाद सोडून मला येथून जाण्याची परवानगी द्यावी. देव तुमचें भलें करील."

" वेडे, काय तुझे विचार ! कंगाल असलीस तरी अल्लानें तुला खुबसूरत बनविलें आहे तें कांहीं दारोदार भीक मागण्यासाठीं नाहीं. माझें मन तुझ्यावर आषक्त झालें आहे. तूं ऐन तारुण्यांत आहेस. माझ्याकडे निरखून बघ. मीहि तुझ्यासारखाच तरुण आहे. माझा अधिकार व वैभवहि तसेंच उत्तम प्रतीचें आहे. नीट विचार कर. मी तुला स्वदेशीं घेऊन जाऊन माझ्या जनानखान्यांत ठेवीन. तुझ्या धर्माच्या आड मी येणार नाहीं. मग तर झालें ना ?"

लालनला वाटलें, खान सामोपचारानें बोलत आहे तर आपण आपलें मन उघडें केलें असतां त्याच्यावर परिणाम होईल. म्हणून ती म्हणाली, " खानसाहेब, तुम्ही म्हणतां तसल्या कोणत्याच सुखाची मला इच्छा नाही. शिवाय माझा देह मी दुसऱ्यास अर्पण करून चुकलें आहे. त्याच्यासाठीं प्राण गेला तरी मी दुसऱ्यास वरणार नाहीं."

" समजलों, समजलों, तो काफरच ना ? तुझ्यासारख्या सुंदर तरुणीला का तो काळा महादजी शोभणार आहे ? तुला त्याच्यापासून 'काय सुख मिळणार ? मी तुला इकडे घेऊन आलों त्या वेळीं तो जखमी होऊन पडला होता तो एव्हांना मरण पावला असेल."

" खानसाहेब, मी तुम्हांला एकदां निक्षून सांगितलें आहे, मला तुमचे ऐषाराम नकोत. असल्या साखरपेरणीला भुलून जाऊन मी आपल्या धर्मापासून भ्रष्ट होणारी अजागळ बाई नव्हे हें पक्कें समजा. मला विनाकारण छळूं नका."

तिचे हे धिक्कारयुक्त उद्गार ऐकून लुतुफखान खजील झाला. परंतु आतांच गय केली तर आपलें पौरुष काय राहिलें, अशा अवास्तव इभ्रतीला बळी पडून तो जराशा दटावणीच्या स्वरांत बोलूं लागला, " तुझ्या इतक्या विनवण्या केल्या, परंतु तूं ऐकत नाहींस, तर तुला आतां खचितच जबरदस्तीनें नेल्याखेरीज राहणार नाहीं. कोण तुझा त्राता आहे तें पाहूं दे."

लालनला त्याचें हें बोलणें ऐकून भयंकर संताप आला व त्याला पूर्णपणें

( ग्रंथालय )

चिटकारण्याआधीं ती म्हणाली, " मागें एकदां असाच मागें लागला होतास त्या वेळीं मला शाहा अबदालीनें वांचविलें, आतांहि कोणीतरी येईलच."

तिचें बोलणें संपतें न संपतें तोंच एक पठाण हातांत नंगी तरवार घेऊन त्या ठिकाणीं धांवत आला. तिला वाटलें आपणांस कोणीतरी सोडविण्यास आला. परंतु तो दाऊद–ज्यानें तिला प्रथम पकडलें होतें व ज्याच्या लुतुफखानानें अवमान करून लालनला आपल्या तंबूंत पळविलें होतें तो पठाण होता

लुतुफखान लालनच्या अंगावर धाऊन जाणार तोंच दाऊद पुढें झाला " खबरदार या औरतेला हात लावाल तर. पहिल्यापासून तुम्हांस माहीत आहे कीं, ही माझी शिकार आहे. मजपासून हिला हिरावून घेण्यासाठीं तुम्हीं पुष्कळ खटपट केली व मला पुष्कळ त्रासहि दिला. पण खुदाच्या मेहेरबानीनें आज तुम्हीं माझ्या हातांत सांपडला आहां. एक पाऊल पुढें टाकाल तर तुमच्यावर वार करणें भाग पडेल. "

दाऊदचें हें त्वेषाचें भाषण ऐकून लुतुफखान चरापलाच, परंतु लगेच सांवरून त्यानें चित्त्यासारखी झेंप टाकून दाऊदला जमिनीवर पाडलें. त्य. गडबडींत त्याची कट्यार गळून पडली, ती लालननें उचलून घेतली. लुतुफखानानें सफाईनें दाऊदचा हल्ला परतविला व त्याला एकाच घावांत ठार करून तो लालनकडे वळून म्हणाला, " लालन, पाहिलेंस ना ? तुझ्यासाठीं मी जिवावर उदार होऊन लढलों. तु माझें ऐक आणि झाल्या गोष्टींचा बोभाटा होण्यापूर्वीं येऊन मजबरोबर चल."

लालन त्वेषानें व निराशेनें बेभान झाली, " खान, तें शक्य नाहीं. दाऊदचा प्राण घेतलास तसा माझाहि घे. पण मी जिवंत असेपर्यंत तुझ्या आधीन होईन ही कल्पनाहि मनांत आणूं नकोस.

लुतुफखान जवळ येत आहे असें पाहतांच ती शेवटचें निकरानें म्हणाली, " माझ्या अंगाला मी तुझा स्पर्शहि होऊं देणार नाहीं हें पक्कें समज. तुला अजूनहि कळत नसेल तर पाहा." असें म्हणून तिनें कमरेंत लपवून ठेवलेली कट्यार उपसली व 'रामा' अशी एकच आरोळी मारून आपल्या पोटांत भोसकून घेतलें. तें तीक्ष्ण शस्त्र हृदयांत शिरतांच ती भडभडा रक्त ओकून जमिनीवर पडली व लालनचा पवित्र आत्मा त्या शरिरांतून निघून गेला ! !

● ● ●

# प्रकरण २९ वें :

श्रीमंत भाऊसाहेब पानपतास पेंचांत सांपडल्याच्या दुष्ट वार्ता दक्षिणेंत येऊं लागल्या. तेव्हां पुण्याहून नानासाहेब पेशवे पन्नास हजार सैन्य घेऊन त्यांच्या मदतीसाठीं निघाले होते. त्यांच्या स्वारीचा तळ नर्मदा तटाकीं पडला होता. मकरसंक्रमणास फार अवधि नव्हता म्हणून नर्मदेवर सण करून पुढें जाण्याचा त्यांनीं विचार ठरविला.

एके दिवशीं त्यांना फारच अनिष्ट स्वप्न पडलें. त्यांना स्वप्नांत दिसलें कीं, नर्मदेच्या पलीकडील किनाऱ्यावर दोन अक्राळविक्राळ स्त्रिया उभ्या होत्या. पायापर्यंत केंस मोकळे सोडलेले, कपाळाला शेंदराचे मळवट भरलेले, गळ्यांत नागसर्पांचे हार व ताज्या नररुंडमाळा होत्या. त्यांतून रक्ताचा शिडकाव त्यांच्या अंगावर उडालेला, जिभा लाल लाल असून तोंडाबाहेर लोंबत असलेल्या, इंगळीसारखे लाल डोळे केलेले व केशरी रंगाचे पोषाख पाहून ते अगदीं घाबरून गेले. त्यांच्या. आगेमागें धिप्पाड यवनांचे तांडे होते व विश्वासराव व भाऊसाहेब त्यांच्या पुढें माना करून उभे होते. त्यांचे दंड दोरानें आंवळले होते व दोहों बाजूंस दोन दोन यवन नंग्या तरवारी घेऊन उभे होते. इतक्यांत त्या दोन स्त्रिया पुढें झाल्या व त्यांनीं त्या दोघांचीं शिरें उडविलीं. तीं नर्मदेंत पडून वाहात गेलीं व धडें त्यांच्या अंगावर पडत आहेत; तें पाहून नानासाहेब किंचाळी फोडीतच जागे झाले.

सकाळीं जागे झाल्यानंतर नानासाहेब अतिशय उद्विग्न मनःस्थितींतच होते. जरा वेळानें एक अगदीं थकून गेलेला जासूद आला व त्यानें एक लखोटा पेशव्यांच्या हातीं दिला. त्यांत एकच वाक्य होतें—

**" दोन मोतीं गळालीं...सत्तावीस मोहोरा हरवल्या...खुर्दा व रुपये किती सांडले याची गणतीच नाहीं. "**

पत्र वाचून झाल्यानंतर नानासाहेबांनीं जासुदाला हकीकत विचारली, त्या वेळीं सर्व भीषण हकीकत ऐकतांच नानासाहेबांच्या मनाला काय व्यथा झाल्या असतील याची कल्पनाच करवत नाहीं.

नानासाहेब पेशवे तेथूनच पुण्यास यण्यास निघाले. वाटेंत त्यांना परत येणारे सरदार भेटत असत. त्यांची पूसतापास करीत ते कसेबसे पुण्यास आले. महादजी शिंदे दिल्लीस गेले होते, तेथें त्यांच्या जखमा बऱ्या झाल्या. पण मांडीवरील जखमेमुळें ते कायमचे लंगडे झाले. महादजींचा पूर्वीचा सर्व सरदारी रुबाब नाहींसा झाला होता. लालनचें स्मरण होऊन त्यांचे डोळे वारंवार भरून येत असत. तिच्या मृत्यूची वार्ता त्यांना कळली नाहीं. ती कोठेंतरी जिवंत असेलच असेंच त्यांना वाटत असे. तिचा तपास लागेनासा झाल्यावर त्यांनीं आपलें दुःख धैर्यानें गिळलें. तरी रात्रीं बिछान्यावर पडले असतांना त्यांना लालनचें स्मरण झाल्याखेरीज दिवस जात नसे !!

०   ०   ०

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 30206
विभाग आ.वा.
क्रमांक 2366
नों. दि.
ग्रंथालय

म. प्रो. ठाणे, वाचनालय शाखा.
IRBK-0115972

कॉन्टिनेन्टल प्रकाशन